
# मंथन
## २००४



# महाराष्ट्र फाउण्डेशन
# समाजकार्य पुरस्कार
# प्रदान समारंभ

**मंथन** सन्मानचिन्ह षांताराम पवार
संकल्पना : अवघ्या प्राणिमात्राचा सन्मित्र, करुणाकर

अध्यक्ष
**कुमार केतकर**

प्रमुख पाहुणे
**गोविंद निहलानी**

सूत्रसंचालन
**दत्ता बाळसराफ**

**समारंभ**
शनिवार दिनांक १ जानेवारी २००५ सायंकाळी ४ वाजता
रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

७६१४
2.1.2005

## २००४चे मानकरी

**समाज विज्ञान अकादमी**, पुणे        **मासूम'**, पुणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **तिस्ता सेटलवाड**<br>मुंबई<br>विजय झारापकर<br>यांच्या स्मृत्यर्थ | **रमेश हरळकर**<br>मुंबई | **पोपटराव पवार**<br>अहमदनगर | **डॉ. मोहन देशपांडे**<br>पुणे | **विलास भोंगाडे**<br>नागपूर |

ग्रंथमोजणी
२००४-०५: २९/३/५
२००५-६: १४.२.६
२००७-८: २०/२/८
२००८-९: १२/१२/८
२००९-१०
२०१०-११: १०/२/११

**मुखपृष्ठ**
सुनील महाडिक
**छायाचित्रण**
राजू शुक्ल
**अक्षररचना**
आदित्य जोशी
**डिजीटल प्रक्रिया**
प्रवीण वर्मा



**छायाचित्रे**
श्याम मणचेकर

**संपादक**
रवी देवगडकर

**प्रकाशक**
रवी देवगडकर
निमंत्रक
महाराष्ट्र फाउण्डेशन
समाजकार्य पुरस्कार समिती
केशव गोरे स्मारक ट्रस्ट, 'स्मृती'
आरे रोड, गोरेगाव (पश्चिम)
मुंबई ४०० ०६२

**मुद्रक**
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

७६१४ २.१.२००८

# निवेदन

१९९६ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने (अमेरिका) 'समाजकार्य पुरस्कारांची योजना' सुरू केली आहे. महाराष्ट्रात परिवर्तनवादी सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचे मोल जाणून घेऊन त्याबद्दल त्यांचा कृतज्ञापूर्वक सन्मान करावा, या हेतूने अमेरिकेतील 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने ही योजना सुरू केली. या योजनेची कार्यवाही 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने केशव गोरे स्मारक ट्रस्टकडे सोपविली आहे.

समाजप्रबोधन, स्त्रियांचे प्रश्न व पर्यावरण-संतुलन/संरक्षण या तीन क्षेत्रांपैकी कोणत्याही क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थेला दीड लाख रुपयांचा पुरस्कार व मानचिन्ह देऊन गौरविण्यात येते. तसेच या तीन क्षेत्रांबरोबरच जातीय सलोखा आणि परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य या दोन क्षेत्रांचा समावेश करून एकूण चार व्यक्तींना प्रत्येकी पंचवीस हजार रुपयांचा पुरस्कार व मानचिन्ह देण्यात येते.

या पुरस्कारांबरोबरच या वर्षी श्री. सुहास वराडकर आणि श्रीमती संगीता वराडकर यांच्या देणगीतून संस्थेसाठी एक 'समाजकार्य सन्मान पुरस्कार' दिला जात आहे.

या योजनेची कार्यवाही करण्याकरिता 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने वरील क्षेत्रांत काम करीत असलेल्या दहा जाणकार व्यक्तींची 'निवड-सल्लागार समिती' गठित केली. समितीने महाराष्ट्राच्या विविध भागांतील पत्रकार, प्राध्यापक, कार्यकर्ते यांच्याकडून कोणत्या संस्थेला/व्यक्तीला पुरस्कार द्यावेत, यासंबंधी अभिप्राय मागविले. तसेच, महाराष्ट्राच्या विविध भागांत प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रांतून या आशयांचे आवाहन करण्यात आले. असे अभिप्राय आल्यावर आवश्यक त्या बाबतीत अधिक माहिती मिळवून 'समिती'ने प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस अमेरिकेतील 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या निवड समितीकडे केली. निवडीसाठी साहाय्यभूत होतील, अशा तऱ्हेच्या संस्था व व्यक्तींच्या कार्यासंबंधीची विस्तृत टिपणेही त्यासोबत पाठविण्यात आली. निवड-सल्लागार समितीत मृणाल गोरे, पन्नालाल सुराणा, अर्जुन डांगळे, पुष्पा भावे, उल्हास राणे, नागेश हटकर, कुमार शिराळकर, गजानन खातू, प्रभाकर नारकर, चंद्रकांत केळकर व रवी देवगडकर यांचा अंतर्भाव आहे. निवड-सल्लागार समितीने शिफारस केलेल्या नावांमधून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या निवड समितीने अंतिम निर्णय घेतला. या गौरव पुरस्कारांसाठी संस्था व व्यक्ती यांच्या नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या :

१) ज्या सामाजिक संस्था व व्यक्ती आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी व सामाजिक न्याय ही मूल्ये रुजविण्यासाठी सातत्याने प्रबोधनाचे कार्य करीत आहेत;

२) पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यांसारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरिता ज्या व्यक्ती अविरत कार्य करीत आहेत;

३) ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य यांविषयीच्या जाणिवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांची ईर्षा जागृत होत आहे.


महाराष्ट्र फाउण्डेशनच्या 'पुरस्कार योजने'च्या पूर्वनिश्चित कार्यकक्षेमुळे समाजकार्याची काही क्षेत्रे अथवा व्यक्ती पुरस्कार योजनेच्या बाहेर राहातात. तसेच काही वेळा अशा व्यक्ती शासकीय सेवेत असल्यास त्यांना पुरस्काराने सन्मानित करणे काही तांत्रिक कारणांमुळे शक्य होत नाही. त्यामुळे केशव गोरे स्मारक ट्रस्टने असा निर्णय घेतला की, अशा व्यक्ती किंवा संस्था यांचा दर वर्षीच्या पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या प्रसंगी समाजाला त्यांच्या कामगिरीविषयी वाटत असलेली कृतज्ञता त्यांचा 'सत्कार' करून व्यक्त करावी. त्या निर्णयानुसार अशा व्यक्ती वा संस्था यांचा सत्कार करण्यास २००४ या वर्षापासून सुरुवात करण्यात येत आहे.

पुढील वर्ष हे महाराष्ट्र फाउण्डेशनच्या या पुरस्कार योजनेचे दहावे वर्ष असणार आहे. या दहाव्या वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या सामाजिक प्रश्नांविषयी ठिकठिकाणी जागर कार्यक्रम आखावा असा विचार आहे. महाराष्ट्रातील कोकण, विदर्भ, मराठवाडा, खानदेश व पश्चिम महाराष्ट्र या विभागांमध्ये प्रत्येकी किमान चार किंवा पाच तालुक्यांच्या ठिकाणी सबंध दिवसभर 'जागरा'चा असा कार्यक्रम करावा, की ज्यामुळे समाजापुढील या प्रश्नांचे भान शक्य तितके सार्वत्रिक होईल. 'महाराष्ट्र जागर' या नावाने होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये जनसंघटना, पत्रकार, महाविद्यालयीन तरुण, शिक्षक, अल्पसंख्य समाजामध्ये कार्य करणारे समाज-कार्यकर्ते सामील व्हावेत अशी अपेक्षा आहे. दिंड्या, सभा, चर्चासत्रे, वृत्तपट, पथनाट्ये, प्रदर्शने, निबंध स्पर्धा यांसारखे कार्यक्रम या जागराचे माध्यम असतील.

'समाजकार्य पुरस्कार' निवडीच्या प्रक्रियेत अनेकांचे साहाय्य झाले, या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

**रवी देवगडकर**
निमंत्रक

# समारंभाचे अध्यक्ष



**कुमार केतकर**

सव्यसाची विचारवंत, लेखक, पत्रकार आणि वक्ते म्हणून कुमार केतकर हे महाराष्ट्राच्या सर्व विभागांत परिचित आहेत; तसेच ते देशातील इंग्रजी पत्रकारितेत आणि बौद्धिक उच्च वर्तुळात इतिहासाचे व चालू घडामोडींचे मार्मिक विश्लेषक व भाष्यकार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. इंग्रजी व मराठी भाषांवरील प्रभुत्व, बहुस्पर्शी व्यासंग, विचारांची सखोलता, तसेच गांभीर्य, व्युत्पन्नता, लालित्य, विनोद आणि माहिती यांचे मनोहारी मिश्रण असलेले त्यांचे मर्मस्पर्शी व प्रसन्न वक्तृत्व इत्यादी गुणांमुळे तत्त्वज्ञ व आध्यात्मिक गटांपासून ते राजकारण, विज्ञान, साहित्य, संगीत, अर्थकारण वगैरे विविध क्षेत्रांतील वर्तुळांकडून त्यांच्याशी संवाद करण्याची मागणी असते. स्वत:च्या ठाम राजकीय व सामाजिक मतांशी यत्किंचितही तडजोड न करता त्यांच्या मतांचा तिरस्कारयुक्त अव्हेर करणाऱ्यांशीदेखील ते मनात किल्मिष न बाळगता मोकळा व पारदर्शी संवाद साधू शकतात. विषय निवडणुकांचे अंदाज असोत की विश्लेषण, आइन्स्टाईन, जिद्दू कृष्णमूर्ती, मर्ढेकर असोत की किशोरी आमोणकर किंवा आजची राजकीय स्थिती—केतकरांची कित्येक भाषणे भल्याभल्यांनी कायम स्मरणात ठेवावीत अशी असतात. महाराष्ट्राच्या कोणत्याही कोपऱ्यात त्यांच्या भाषणांना जमणारी गर्दी महाराष्ट्रातील नवी पिढीदेखील वैचारिक खाद्याची किती भुकेली आहे याची साक्ष देते. त्यामुळे आज महाराष्ट्रातील तरुण पिढीला हव्याशा वाटणाऱ्या आवडत्या व्यक्तिमत्त्वांमध्ये त्यांचा वरचा क्रमांक लागू शकेल.


केतकर सध्या राजकीय भाष्यकार म्हणून गाजत असले तरी त्यांचे मूळ अभ्यासाचे विषय तत्त्वज्ञान, समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र हे आहेत. एकीकडे समाजशास्त्रात पीएच्.डी.साठी तयारी करीत असताना आय.आय.टी.सारख्या ठिकाणी त्यांनी तंत्र-सहायकाचीदेखील चाकरी केली आहे. वृत्तपत्रक्षेत्रात येण्यापूर्वी त्यांनी समाजशास्त्रीय संशोधन, ग्रंथालयीन कामकाज, प्रबंधन व मार्केटिंग वगैरे क्षेत्रांतही भराऱ्या मारून घेतल्या आहेत. शिस्तबद्ध अभ्यासाची आणि प्रत्येक माहितीचा कण वैश्विक आवाक्यातून तपासून पाहण्याची त्यांची सवय त्यांना मार्क्सवादाच्या अभ्यासातून मिळाली असावी. त्या चरकातून ते गेले असले आणि अजूनही स्वत:ला ते ठाम मार्क्सवादी मानत असले तरी त्यांची विचारांची लवचीकता आणि सर्वसमावेशकता त्यांनी मार्क्सपासूनच घेतली असावी. अर्थात, कोणत्या पक्षात अडकवून घेण्याची वृत्ती नसल्याने तेव्हा आणि सध्याही त्यांच्यावर राजकीय पक्षपाताचे बुद्धिपुर:सर आरोप होत असले तरी त्यांनी आपले विचारस्वातंत्र्य कधी सोडले नाही.

मुख्य प्रवाही पत्रकारितेत जाण्यापूर्वी त्यांनी चालविलेली 'राजकारण' आणि 'सत्यचित्र' ही नियतकालिके त्यांमधील विचक्षक लेख, मार्मिक समीक्षणे, विषयवैविध्य आणि स्वतंत्र बाणा यांसाठी अजूनही अनेकांच्या लक्षात राहिली आहेत. 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या ग्रंथालयात संशोधन अधिकारी म्हणून काही वर्षे काम केल्यावर त्यांना 'इकॉनॉमिक टाइम्स'मधे वार्ताहर म्हणून जागा मिळाली. लवकरच ते त्या पत्राचे विशेष वार्ताहर व महाराष्ट्राचे अर्थ-राजकीय मीमांसक म्हणून गाजू लागले. 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादकपद स्वीकारण्याआधी त्यांनी इंग्रजीतील 'कॉमर्स' या नियतकालिकाचे संपादन केले आणि 'ऑब्झर्व्हर ऑफ बिझनेस अँड पॉलिटिक्स' या दैनिकाचे मुंबई संपादक म्हणूनही काम केले.

महाराष्ट्राला केतकरांचा खरा परिचय झाला तो १९९५ साली 'महाराष्ट्र टाइम्स'च्या संपादकपदी आल्यावर. तोवर या वृत्तपत्रावर गोविंदराव तळवलकरांची छाप होती. काही महिन्यांच्या अवधीतच आशय, विचार, बातम्या आणि पत्रीय धाटणी या सर्व बाबतीत त्यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'वर स्वत:चा ठसा उमटवला. तदनंतर 'लोकमत' या दैनिकात अल्पकाल काम करून ते आता 'लोकसत्ता'चे मुख्य संपादक म्हणून स्थिरावले आहेत. कोणत्याही नियतकालिकात व दैनिकात संपादक म्हणून काम करताना केतकरांनी आपले राजकीय विचार कधीच लपवून ठेवले नाहीत; एवढेच नव्हे तर प्रशासकांचा वा राजकीय सत्ताधाऱ्यांचा रोष पत्करून निर्भयपणे ते प्रकट करण्यास ते कधीच कचरले नाहीत. तीक्ष्ण स्मरणशक्ती, अफाट जिज्ञासा, विचारसृष्टीचे वैश्विक परिप्रेक्ष्य, विज्ञाननिष्ठा, विचारांची अर्थगर्भ व सडेतोड मांडणी करताना त्यांच्या भाषेची लवचीकता व त्यातून प्रकट होणारा त्यांचा विस्तृत व्यासंग, तसेच सर्वांना सहजपणे आपलासा करणारा प्रसन्न व लाघवी स्वभाव यांमुळे कुमार केतकर सांप्रत महाराष्ट्रातील बहुतेक क्षेत्रांत एक महत्त्वाचे विचारवंत व्यक्तिमत्त्व म्हणून गणले जातात यात शंका नाही.

**अरुण साधू**

# समारंभाचे प्रमुख पाहुणे



**गोविंद निहलानी**

गोविंद निहलानी आज सव्यसाची व चोखंदळ कथांवर काम करणारे दिग्दर्शक म्हणून सुपरिचित आहेत. मुळात ते एक छायाचित्रकार होते. १९६२ साली त्यांनी बंगलोर येथील जयचामराजेंद्र पॉलिटेक्निकमधून छायाचित्रणाची पदविका घेतली व त्यानंतर त्यांनी आपल्या चित्रपटसृष्टीतील कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांनी छायाचित्रण केलेला प्रथम चित्रपट होता, 'शांतता कोर्ट चालू आहे.' विजय तेंडुलकरांच्या नाटकावर आधारित असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शक होते सत्यदेव दुबे. ज्यात निहलानी दुबेंसोबत सहनिर्मातेदेखील होते. सुरुवातीच्या त्यांच्या महत्त्वपूर्ण काळात त्यांना श्याम बेनेगल ह्यांच्यासोबत छायाचित्रणाचे काम करावयास मिळाले. त्यांच्यासोबत निहलानी यांनी अनेक माहितीपट, तसेच दहा चित्रपट चित्रित केले. त्यांपैकीच एक असलेल्या 'जुनून' या चित्रपटासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट छायाचित्रणासाठी राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. त्याच सुमारास त्यांनी गिरीश कर्नाड यांच्या गाजलेल्या 'काडू' या चित्रपटाचे छायाचित्रण केले.

नंतर निहलानी यांची दिग्दर्शक म्हणून वाटचाल सुरू झाली. १९८१ साली त्यांनी 'आक्रोश' या चित्रपटाचे दिग्दर्शन केले. या चित्रपटामुळे त्यांना प्रतिभावंत व महत्त्वपूर्ण दिग्दर्शक अशी मान्यता मिळाली. या चित्रपटाला १९८१ सालचा दिल्लीचा 'सुवर्ण मयूर' हा सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठी असलेला पुरस्कार मिळाला. या चित्रपटानंतर त्यांनी रिचर्ड अटनबरो यांच्यासाठी 'गांधी' चित्रपटाचे छायाचित्रण केले. निहलानी यांचा दुसरा चित्रपट म्हणजे 'विजेता.' तो १९८२ साली प्रदर्शित झाला. गोविंद निहलानी यांच्या १९८३ साली आलेल्या 'अर्धसत्य' ह्या चित्रपटाने एक नवाच इतिहास रचला. अनेकार्थांनी हा चित्रपट मैलाचा दगड ठरला. 'आर्ट फिल्म' असूनही या चित्रपटाने व्यावसायिकदृष्ट्या बऱ्यापैकी यश मिळवले. या चित्रपटाला राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. त्यांच्या 'पार्टी' या चित्रपटासाठी रोहिणी हट्टंगडी यांना सर्वोत्कृष्ट साहाय्यक अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. 'कालोंवी वेरी' चित्रपट महोत्सवात ओम पुरी यांना अभिनयासाठी पुरस्कार मिळाला. आशिया पॅसिफिक चित्रपट महोत्सवात विजया मेहता यांना 'पार्टी' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार प्राप्त झाला. १९८५ सालच्या 'आघात' या चित्रपटाला मॉन्ट्रीयल जागतिक चित्रपट महोत्सवात स्पर्धात्मक चित्रपट म्हणून प्रवेश मिळाला. 'तमस' या पाच तास लांबीच्या अतिभव्य अशा चित्रपटाची निर्मिती निहलानी यांनी केली. या चित्रपटास तीन राष्ट्रीय तसेच अनेक पुरस्कार प्राप्त झाले. नंतर हा चित्रपट दूरदर्शनवर मालिकेच्या स्वरूपात दाखवण्यात आला. मॉन्ट्रीयल जागतिक चित्रपट महोत्सवात १९८९ साली निहलानी यांना ज्युरी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. हेन्रीक इब्सेन यांच्या 'लिटल इयॉल्फ' नाटकावरून त्यांनी दूरर्शनसाठी चित्रपटनिर्मिती केली होती. १९९१ ते २००४ या कालखंडात त्यांनी एकूण नऊ चित्रपटांची निर्मिती केली. त्यात 'पिता' व 'रुक्मावती की हवेली' या चित्रपटांचा समावेश आहे. हे अनुक्रमे ऑगस्टस स्ट्रिंडबर्ग यांच्या 'द फादर' व फेडरीको गार्सिया लोर्का यांच्या 'द हाऊस ऑफ बर्नार्डा अल्बा' या नाटकांवर आधारित होते. त्यांच्या 'दृष्टी' या चित्रपटास राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्या चित्रपटाने (१९९०) मद्रास येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात भारताचे प्रतिनिधित्व केले. १९९५ साली प्रदर्शित झालेल्या 'द्रोहकाल' या चित्रपटाला दमास्कस महोत्सवात उत्कृष्ट दिग्दर्शकाचे पारितोषिक मिळाले. नंतर त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'हजार चौरासीकी मां' (१९९७) या महाश्वेतादेवी यांच्या कादंबरीवर आधारित चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला व त्याला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवास भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. 'देहम' (२००१) या चित्रपटाला गोटेबोर्ग चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट आशियाई चित्रपट म्हणून नेटपॅक पारितोषिकाने पुरस्कृत करण्यात आले. त्यांचे इतर चित्रपट म्हणजे 'तक्षक' (१९९९) व 'देव' (२००४) हे होत. २००२ साली त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने गौरवले गेले.

शुभा पिपळापुरे

# स्मृतीस अभिवादन



विजय झारापकर
(१९४२-२००४)

आजच्या आयुर्मानाचा विचार करता विजय झारापकर आपल्यातून अकालीच गेले. त्यांचा पिंड आध्यात्मिक होता. कदाचित त्यामुळेच त्यांनी समाजकार्यात गुंतलेल्या 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या कामात स्वत:ला झोकून दिले होते. गेली पंचवीस वर्षे न्यूयॉर्कमधून ते महाराष्ट्र फाउण्डेशनला मोठा निधी उभा करून देत आले.

त्यांच्या मागे त्यांच्या पत्नी संध्या, मुलगी मोनाली व मुलगा समीर ही आपापल्या व्यवसायात सुस्थिर आहेत.

त्यांच्या स्मृतीस अभिवादन.

या वर्षीचा श्रीमती तिस्ता सेटलवाड यांना दिलेला पुरस्कार विजय झारापकरांच्या स्मृतीस अर्पण.

# पर्यायी समाजव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान

विद्युत भागवत

मानवी समाजाच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकला तर लक्षात येते की जेव्हा जेव्हा नवी उत्पादनपद्धती, नवे ज्ञानविज्ञान आणि त्यायोगे नवे तंत्रज्ञान येते तेव्हा धर्मसंस्था, कुटुंबसंस्था तसेच मूल्यव्यवस्थेविषयीचा विचारही झपाट्याने बदलू लागतो. समाजामध्ये घुसळण सुरू होते. अनेक प्रश्नांच्या कोंड्या निर्माण होतात. परंतु त्याचबरोबर नव्या विचारांना धुमारे फुटतात. समाजातील विद्रोह सतत पर्यायी समाजाच्या कल्पना मांडण्याचा प्रयत्न करतो आणि स्त्रिया नावाचा व्यवस्थेच्या पातळीवर दुय्यम ठरवला गेलेला घटक या इतिहासाचा भाग असतो. इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला दिसते की नव्याने उदयाला येणाऱ्या पर्यायी समाज-कल्पनांशी संवाद साधणाऱ्या स्त्रिया आपल्या दैनंदिन जीवनाच्या वास्तवाशी या कल्पना जोडून ते वास्तव संवेदनशील बनवण्याचा प्रयत्न करतात. आज आपण विज्ञानाच्या, तंत्रज्ञानाच्या एका नव्या टप्प्यावर उभे आहोत. माहिती-तंत्रज्ञान, संगणक, इंटरनेट आणि जागतिकीकरणाच्या झंझावातात आपण पाहतो आहोत की 'वेगळे जग शक्य आहे' असे म्हणत अनेक पर्याय ठामपणे उभे राहू पाहत आहेत. या पर्यायांमध्ये स्त्रियांचे स्थान कसे असेल हा विचार करताना आपण थोडे मागे जाऊन इतिहास पाहूया.

मध्ययुगातील भक्तीचा काळ हा संपूर्ण भारतातच अशाच प्रकारच्या घुसळणीचा काळ होता. महाराष्ट्रात १३व्या ते १७व्या शतकापर्यंत वारकरी संप्रदायाच्या रूपाने आलेला पर्यायी समाजाचा विचार पाहिला तर समाजातली उत्पादकता, निर्मितिक्षमता वाढली पाहिजे असे सांगत असतानाच सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यातील दैन्य, दुःख दूर करण्यासाठी प्रस्थापित कर्मठ विचारांना शह देण्याचाही प्रयत्न इथे दिसतो. ज्ञानेश्वरांसारख्या, संन्याशाच्या पोटी जन्मलेल्या, परिघाबाहेर फेकल्या गेलेल्या, संताने *जो जें वांछिल तें तें लाहो* असा उदात्त विचार दिला आणि वक्ता-श्रोता संवादाचे महत्त्व सांगून नवा वारकरी समुदाय निर्माण करण्याच्या शक्यता खुल्या केल्या. याच ज्ञानेश्वरांच्या पाठीवर जन्मलेल्या मुक्ताबाईने *मुंगी उडाली आकाशी। तिने गिळिले सूर्यासी।* असा भव्य अनुभव आपल्या शब्दातून व्यक्त करताना, स्त्रियासुद्धा स्थितप्रज्ञ होऊ शकतात हे दाखवून दिले. विश्वरहस्याचा ध्यास घेऊन जगणारी मुक्ताबाई विपरीत परिस्थितीत आपले संरक्षण आपणच करीत असतो असा आत्मविश्वासात्मक विचार मांडते. *अहो आपण जैसे व्हावे। देवे तैसेची करावे।* किंवा *आपणा शोधुनी घ्यावे। विवेक नांदे त्यांच्यासवे।* या उक्ती वाचल्या की लहानग्या पोरक्या मुक्ताबाईला गवसलेल्या सत्याचे महत्त्व लक्षात येते. कर्मठ, संकुचित धार्मिकतेविरुद्ध बंड उभारणारा वारकरी संप्रदाय नवी भाषा, जनांशी संवाद साधण्याच्या नव्या रीती आत्मसात करीत होता आणि विठोबाला कष्टकऱ्यांचा देव बनवताना जनावरांना बळी देणे अथवा नमस्कार-चमत्कार या साऱ्यांनाच मोडीत काढत होता. अशा ह्या विठोबाला जनाबाई आपल्या दळणकांडणाच्या रोजच्या कष्टकरी जगण्याचा विसावा मानते आणि विठ्ठलालाच आपल्या जगात खेचून प्रश्न विचारते. ईश्वराला ईश्वरपण आपल्यामुळेच प्राप्त होते हे जाणून ती म्हणते, *रागा येऊनि काय करिसी। तुझें बळ आम्हांपासी।।* जनाबाई विठोबाला संतापाच्या भरात शिव्याही देते. मूळ मायेचा कार्टा असेही म्हणते आणि *पोट भरुनी व्यालासी। मज सांडुनी कोठें जासी?... ज्याचा जार त्याचा भार। मला नाहीं आणिक यार।।* अशी विठ्ठलाला धमकीही देते. जनाबाईच्या परिस्थितीच्या कोंडीतून शूद्र आणि स्त्री म्हणून तिच्या लक्षात आले होते की तिचेही ईश्वराशी नाळेचेच नाते होते. एक शूद्र स्त्री म्हणून सत्य सांगण्याचा तिचाही अधिकार होता. त्या काळातील भोवतीच्या समाजाला हे सारे कळत नाही. पण ज्या विठ्ठलाला सखा, माय-बाप, भाऊ अशा रूपात ती पाहते त्यालाही आपली तळमळ का कळू नये असे प्रश्न तिला पडलेले दिसतात. जनाबाईने जाहीर केले की प्रत्यक्ष विठ्ठलच तिला



न्हाऊ-माखू घालतो, सुखाने झोप यावी म्हणून जोजवतो. मी शूद्र स्त्री आहे आणि माझ्या स्पर्शसुखासाठी ईश्वर प्रत्यक्ष अवतरतो असे जनाबाई ठणकावून सांगते. तसेच ईश्वराला परपुरुष वा परमपुरुष मानून एक फार मोठी आधुनिक स्त्रीवादी दृष्टी मांडते. स्त्रीचे नाते जर इहलोकात पुरुषांना एका निष्ठेने वा आदराने घेता येत नसेल तर आम्हाला अभिप्रेत असणारा खरा पुरुष आम्ही ईश्वराच्या रूपात कल्पू, त्याच्या ध्यासात पर्यायी जगू असे तर संत स्त्रिया सांगत नव्हत्या ना? तुकारामाची शिष्या बहिणाबाई हिने तर वैदिक शाक्त-पंथीय नवऱ्याला बदलून भक्तीच्या संप्रदायापाशी आणले. 'वज्रसूची' या संस्कृत ग्रंथाचे चिकित्सक समतोल पद्धतीने मराठीत भाषांतर केले. तुकारामाला गुरू करणारी ही ब्राह्मण बाई ब्रह्मत्व हरवलेल्या ब्राह्मण्याविरुद्ध तर झगडा देतेच पण बाईपणाच्या अवमूल्यनालाही शह देऊन पतिव्रताधर्म या शब्दाचा व्यापक अर्थ लावते. *अखंडित ध्यास भगवंताचा चित्ता। तेचि पतिव्रता*

*तिन्ही लोकां* — म्हणजे ज्या संसारी बाईला आपण कोण आहोत हे समजते आणि आपल्या श्रेयाचा ध्यास — मग तो पतीला, मुलांना वा समाजाला न पटणारा का असेना — लागतो आणि जी प्रपंचात राहूनही तो प्रपंच वाकवून, व्यापक करून त्या श्रेयाचा ध्यास न सोडता मार्ग आक्रमते, तीच खरी पतिव्रता असे बहिणाबाई खुबीने सांगते.

थोडक्यात भक्तीपूर्व काळातील एतद्देशीय धर्मासमोर जेव्हा नव्या शेतीव्यवस्थेने प्रश्न उभे केले, तेव्हा भक्तीच्या चौकटीत एक पर्यायी समाजव्यवस्थेचे स्वप्न मांडले गेले. श्रुतिस्मृतींचे वर्चस्व नाकारून, भक्तांचे ईश्वराशी प्रत्यक्ष नाते जोडून समतेचे मूल्य आणणाऱ्या या पर्यायी विचारात स्त्री-संतांनी मांडलेला विचार भारतातील अगदी सुरुवातीच्या आधुनिकतेशी जोडलेला आहे. स्त्री-संतांची अभिव्यक्ती फक्त स्त्रियांची दु:खे वा गाऱ्हाणी सांगण्यासाठी नव्हती तर विशिष्ट समुदायांमध्ये स्त्रिया म्हणून जगताना होणारी कोंडी आणि त्यातून निर्माण होणारी स्वातंत्र्य आणि समतेची आकांक्षा व्यक्त करणारी होती. त्यामधील विश्वात्मकता महत्त्वाची आहे.

१९व्या शतकाच्या सुरुवातीला वसाहतवादाचा घाला आला आणि भांडवलशाहीचा नवा टप्पाही भारतीयांच्या वाट्याला आला. या काळात पुन्हा एकदा नवे विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेची प्रक्रिया गतिशील
८
झाली. आधुनिकता आणि भांडवली अर्थव्यवस्था स्थिरावताना वासाहतिक राष्ट्र म्हणून कृषी, व्यापार, उत्पादक क्षेत्रांमध्ये परिवर्तन झाले. एकीकडे जमीन आणि श्रम यांचा व्यापार आणि संघटन नव्या बाजारपेठेच्या ओझ्याखाली आले तर दुसरीकडे कारखाने, खाणी, नव्या लागवडी अशी क्षेत्रे खुली झाली. या काळात गोऱ्या साहेबांनी भारतीय स्त्री नावाचा दडपलेला गट आहे असे मानून आपले नैतिक वर्चस्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला, तर भारतीय इंग्रजी विद्याविभूषित सुधारकांनी आधुनिकीकरणासाठी खाजगी कौटुंबिक जगात सुधारणा झाल्या पाहिजेत यावर भर दिला. स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते या काळात पुन्हा एकदा स्त्रीप्रश्नाचे पुनर्साचीकरण झाले. त्यामुळे १८२९ मध्ये सतीबंदी कायदा आला, परंतु १८३९ मध्ये त्यात 'ऐच्छिक सती'चे कलम घुसडले गेले. १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा आला तेव्हा ब्राह्मणेतर जातींमध्ये पाटाच्या विवाहाची जी पद्धत होती त्याची दखल घेतली गेली नाही. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आधुनिकीकरण प्रत्यक्षात आणण्यासाठी ज्या नव्या ज्ञानविज्ञानाधिष्ठित शिक्षणाची पायाभरणी झाली त्यामध्ये स्त्री-शिक्षणाचा विचार मात्र स्त्रिया, कुटुंब, बालसंगोपन, सेवा-शुश्रूषा अशा चौकटीतच झाला. नव्याने इंग्रजी विद्या शिकणाऱ्या पुरुषांना साथसंगत देऊ शकणारी, समुद्र किती खोल आहे, पृथ्वी कशी गोल आहे, अशा तऱ्हेच्या माहितीचे संवाद लीलया करणारी सहधर्मचारिणी निर्माण करणे एवढेच शिक्षणाचे प्रयोजन मानले गेले. महात्मा जोतीराव



फुले यांनी मात्र स्त्रीशिक्षण समाजपरिवर्तनासाठी पायाभूत महत्त्वाचे आहे हे ओळखून दडपलेल्या जातींमधील स्त्रियांनी ज्ञानाच्या मार्गाने जावे म्हणून सक्रिय प्रयत्न केले. वसाहतवाद्यांनी आणलेली खंडितता आणि केलेली लूट या प्रक्रियेला शह द्यायचा तर ज्ञानाच्या मार्गाने जायला हवे आणि त्यासाठी स्त्रीपुरुषांचे नाते अधिक सख्यत्वाचे, समान पायावरचे असले पाहिजे असा आग्रह सत्यशोधक चळवळी करीत होत्या. सत्यशोधकांच्या या पर्यायी समाजव्यवस्थेच्या मांडणीच्या काळात पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे यांनी या पर्यायी समाजव्यवस्थेतही स्त्रियांच्या वाट्याला दुहेरी नीतिमूल्ये कशी येतात किंवा येऊ नयेत म्हणून आपला विचार मांडला. या वसाहतवादाच्या गुलामगिरीच्या काळात 'आपलेच सगळे चुकले' या न्यूनगंडाच्या भावनेच्या छायेखाली सुधारणा, धर्मचिकित्सा, आधुनिकतेचा जो विचार आला त्यात स्त्रियांची प्रतिमा मात्र एकसत्त्वीकरणाच्या छायेखाली घडवली गेली असे दिसते. ब्रिटिशांच्या काळात नव्याने उदयाला येणाऱ्या मध्यमवर्गीय कुटुंबाची आंग्लाळलेली आवृत्ती निर्माण करणाऱ्या मवाळ, सुंदर, सौम्य स्त्रिया स्त्रीशिक्षणातून आल्या. सत्यशोधकी विद्रोही वारसा घेऊन पंडिता रमाबाई किंवा ताराबाई शिंदे यांनी आपले विचार मांडले. 'स्त्री-पुरुष तुलना'सारख्या निबंधातून ताराबाई शिंदे भारतातील सर्व स्त्रियांच्या वतीने प्रश्न उभे करीत होत्या. स्त्रियांच्या हातून भ्रूणहत्येसारखे जे गुन्हे घडतात त्यामागे वसाहतकाळातील सतत वाढत जाणारे आर्थिक आणि सांस्कृतिक दारिद्र्य आहे हे ताराबाई दाखवून देतात. त्या पुरुषांना बजावतात की *या तुमच्या भिकार चाळ्यांनीं सर्व प्रकारचे आपले स्वदेश रोजगार बुडून, हरएक प्रकारचे व्यापारी व कसबी लोक उपाशी मरूं लागले... तर तुह्माला विधवा स्त्रियांचा*

*व या गरीब कारागीर लोकांच्या मुलाबाळांची कनवळा येऊन तुह्मी आपल्या देशाकडे पुन: पहिल्यासारखी नजर फिरवून आपापले धर्म, चाली, देशरिवाज न सोडतां स्वदेशाभिमानी व्हावे व सर्व प्रकारें स्त्रियांस दोषमात्र करून रसातळीं न घालावें ह्मणून हा एक लहानसा निबंध तुह्मापुढें सादर केला आहे.* ताराबाई किंवा रमाबाई यांच्या भविष्याचा वेध घेण्याच्या अंतर्दृष्टीमध्ये स्त्रीपुरुषांच्या निरोगी नात्याची, समान पायावरील संबंधांची स्वप्ने तर दिसतातच पण जातींच्या चौकटीतील उतरंडीच्या रचनेत ब्राह्मण किंवा खानदानी मराठा स्त्रियांना एक शब्द बोलण्याची अगर चिमटीभर दाण्याची सत्ता नसते याबद्दलची चीडही आहे. पंडिता रमाबाईंचे धर्मांतर आणि त्यानंतर केडगावला त्यांनी निर्माण केलेला आश्रम याबद्दल आजही त्यांच्यावर टीकेची झोड उठवली जाते. परंतु बारकाव्याने पाहिले तर हिंदू आणि ख्रिस्ती या दोन्ही धर्मांच्या कर्मठ बंदिस्तींना त्या प्रश्न विचारत होत्या. तसेच एका लोकशाहीवादी आधुनिक समाजाचे देशपातळीवरील स्वप्नही पाहत होत्या. केडगावच्या आश्रमात स्त्रिया गवंडीकाम, सुतारकाम शिकत होत्या. खुद्द रमाबाईंनी त्यापूर्वी हंटर कमिशनपुढे दिलेल्या निवेदनात स्त्रियांना वैद्यकीय ज्ञान येण्यासाठी उच्च शिक्षणाची दारे खुली केली पाहिजेत असे मत मांडले. इतकेच नाही तर भारतीय स्त्रियांचे विवाहाचे वय वीस असले पाहिजे असा काळाच्या पुढचा विचार मांडला.

गांधीयुगाकडे आपण जेव्हा वळून पाहतो तेव्हा महात्मा गांधींनी स्त्रियांकडे आत्मभान असलेले माणूस म्हणून पाहूनच पर्यायी समाजव्यवस्थेची मांडणी केली. महात्मा गांधींनी प्रत्येक स्त्रीला कुटुंबामध्ये व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा आणि स्वायत्तता मिळाली पाहिजे असा आग्रह धरला. स्त्रीपुरुष विषमतेचा पाया स्त्रीपुरुष लैंगिक संबंधांमध्ये आहे याकडे लक्ष वेधण्याचे मोठे ऐतिहासिक काम म. गांधींनी केले. गांधीवादी चळवळीतही गंगाबेनसारख्या सामान्य स्त्रियांचे नेतृत्व जसे घडले तसेच प्रेमा कंटकांसारख्या अनेक स्त्रिया स्वतंत्र विचारवंत म्हणून उभ्या राहू शकल्या. म. गांधींनी स्त्रियांना कर्तेपण दिले आणि स्त्रियांमध्ये एक जन्मजात शांत प्रतिकाराची शक्ती असते असे मानून पुरुषांना आपल्या नैसर्गिक हिंसाचारातून बाहेर पडण्यासाठी स्त्रियांचे अनुकरण करण्यास सांगितले. हे काळाच्या दृष्टीने फार पुढचे पाऊल होते.




१९४७ नंतर भारत नावाचे राष्ट्र-राज्य जन्माला आले. तेव्हा वसाहतवादी राज्यसंस्थेचा भारतीय जनतेकडे पाहण्याचा अलिप्त दृष्टिकोन नाकारून वसाहतवादाला पर्यायी अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. भारतीय घटनेने जेव्हा समानतेचे मूलभूत हक्क आणि सार्वत्रिक प्रौढ मतदानाचे हक्क मान्य केले तेव्हा एका अर्थी भारतीय स्त्रियांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. असे होऊनही भारतीय स्त्री नावाचे जे प्रारूप कल्पिले गेले ते मूलत: मातृत्व याच चौकटीशी निगडित होते. त्यामुळे स्त्रिया, मुले, अपंग यांचा समावेश 'कल्याणकारी' चौकटींमध्ये केला गेला. गरीब घरातील कष्टकरी स्त्रिया किंवा मध्यमवर्गीय स्त्रिया घरात आणि घराबाहेर जी संगोपक, संवर्धक कामे करीत होत्या त्या कामांकडे उत्पादक काम या दृष्टीने पाहिले गेले नाही. नव्या पर्यायी घडणीच्या भारतीय समाजात स्त्रीचे श्रेय कुटुंबाशीच जोडले गेले. इतकेच नाही तर कुटुंब कायदे, व्यक्तिगत कायदे या नावांखाली नागरी कायद्यांशी जोडले गेले. विवाह, घटस्फोट, पोटगी, मुलांचे पालकत्व, दत्तक, वंशपरंपरागत तसेच स्वकष्टार्जित संपत्तीविषयक वारसाहक्क ह्यांचा आशय अशा कायद्यांमधून ठरला. भारतातील चार प्रमुख धार्मिक समूहांसाठी स्वतंत्रपणे व्यक्तिगत कायदे तयार केले गेले. म्हणजे वसाहतवादाला पर्याय देणाऱ्या आपल्या राज्यसंस्थेनेही कोणत्याही धार्मिक समूहांच्या नागरी जीवनात, दैनंदिन व्यवहारात एका मर्यादेपलीकडे हस्तक्षेप करू नये असे धोरण आखले. या सर्वांचा परिपाक म्हणजे भारतातील स्त्रिया कुटुंबांतर्गत कायद्याच्या संदर्भात भिन्न धार्मिक गटांमध्ये विभागल्या गेल्या. स्त्रिया नावाचा घटक कृतिशील माणूस असतो या नव्या विचाराकडे त्यामुळे दुर्लक्ष झाले. परिणामत: स्वतंत्र भारतातील स्त्रिया वर्ग, धर्म, जात, कुटुंब या चौकटीत विभागल्या जाऊन गरती, वेश्या, विवाहित, अविवाहित इत्यादी अनेक अंतर्विरोधांना तोंड देत भांडवली अर्थव्यवस्थेत एकमेकींशी जीवघेणी स्पर्धा करू लागल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या संपत्तीतील अधिकाराविषयी आणि पं. नेहरूंनी व आंबेडकरांनी सुरुवातीला समान नागरी कायद्याविषयी आग्रह धरला होता. परंतु फाळणीचे कटू, रक्तबंबाळ वास्तव लक्षात घेता अल्पसंख्याकांविषयीची निष्ठा अभिव्यक्त करण्याचे व्यक्तिगत कायदा हे

एक महत्त्वाचे क्षेत्र ठरले. अशा तऱ्हेने औपचारिक पातळीवरील धर्मभिन्नता राखताना स्वतंत्र भारतातील बहुसंख्य स्त्रिया निर्भयपणे नागरिक म्हणून भारतीय राज्यसंस्थेशी आणि न्यायव्यवस्थेशी प्रत्यक्ष नाते जोडू शकल्या नाहीत. इतकेच नाही तर, हिंदू कोड बिलासंदर्भातला कडवा विरोध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सोसला आणि शेवटी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. हा इतिहास स्त्री-प्रश्नाच्या दृष्टीने अभूतपूर्व आहे; तसेच हा इतिहास लक्षात घेता वसाहतवादाला पर्याय म्हणून जो राष्ट्र-राज्य निर्मितीचा प्रकल्प होता त्यामध्येही धर्म, जात आणि लिंगभाव ह्यांची कर्मठ वीण सैलावण्याची ताकद नव्हती हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

भारतातील नियोजनबद्ध विकास कार्यक्रमांमध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच स्त्रियांना–विशेषत: गरीब स्त्रियांना–राज्यसंस्थेवरील ओझे असेच मानले गेले. त्यामुळे असंघटित क्षेत्रात, असुरक्षित वातावरणात, ग्रामीण भागात शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या असंख्य स्त्रिया शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता या सर्व दृष्टींनी वंचित राहिल्या. १९६४ ते ७५ या काळात दलित आदिवासी चळवळींच्या बरोबरच स्त्रियांचा असंतोषही स्फोटक स्वरूपात व्यक्त होऊ लागला. १९६० ते ७० या दशकात भांडवली अर्थव्यवस्थेला आणि जात्यधिष्ठित समाजव्यवस्थेला शह देणाऱ्या अनेक चळवळी उभ्या राहिल्या. तेलंगण आणि तेभागा चळवळींमध्ये स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. परंतु एकूणच चळवळींमध्ये स्त्रियांनी कार्यकर्त्यांच्या पोटापाण्याची, सेवाशुश्रूषेची जबाबदारी घ्यावी असेच राजकारण अधिक होते. स्त्रीवादी अभ्यासकांनी अशा चळवळींमध्ये आपल्या खऱ्या सहभागाची नोंद केली. पर्यायी समाजव्यवस्थेचा विचार मांडणाऱ्या दलित, आदिवासी युवकांच्या चळवळीत १९६०च्या दशकात नव्या पिढीतील मुलींचा सहभाग होता. परंतु निर्णय घेणे, विचारप्रणालीच्या चर्चाविश्वात योगदान करणे अथवा रणनीती ठरविण्यात सहभागी होणे ह्यापेक्षा कार्यकर्त्या मुलींनी संघटनेमध्ये संगोपक, संवर्धक कामे करावी अशीच अपेक्षा होती. दलित पँथर्ससारख्या संघटनेने जी उग्र अरेरावीची डरकाळ्या फोडणारी भाषा वापरली किंवा शिवसेनेमधून जी झुंडशाही आली तिला उत्तर द्यायला स्त्रीवादी चळवळींना स्वतंत्र, स्वायत्त आविष्कार करणे भाग पडले. ह्या काळात सर्व स्त्रियांच्या समस्या पुरुषसत्ताक व्यवस्थेत समान स्वरूपात निर्माण होतात, म्हणून स्त्रियांचे पर्यायी अवकाश निर्माण करणे शक्य आहे, आवश्यक आहे असा विचार मांडला गेला. परंतु रुपकुंवरचे सती जाणे वा शहाबानो खटला अशा घटनांमधून जी वादळे आली त्यातून भारतातील 'स्त्री-प्रश्नां'ची गुंतागुंत जाणवू लागली. भारतीय स्त्रियांचे बाईपण धर्म, जात आणि वर्ग ह्या चौकटीत घडविले जाते आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतही ह्या चौकटी पुन:पुन्हा नव्याने बांधल्या जातात तेव्हा त्या त्या गटातील स्त्रियांचे एकसत्त्वीकरण केले जाते, हे वास्तव स्त्रियांच्या चळवळींच्या दृष्टीने आव्हान म्हणून पुढे ठाकले.

भारतीय स्त्रियांच्या रोजच्या जगण्यातील ही गुंतागुंत लक्षात घेता जे पर्याय शोधले गेले त्यात पर्यावरणीय स्त्रीवादाचा विचार प्रामुख्याने करावा लागेल. वंदना शिवा ह्यांनी निसर्गावरील हिंसाचार हा मूलत: औद्योगिक विकासात्मक प्रारूपामध्ये आणि पाश्चात्य जगातून आलेला वसाहतवादी दडपणुकीमध्ये अनुस्यूत आहे असे मांडले. भारतातील पारंपरिक दृष्टिकोणामध्ये निसर्गाकडे प्रकृती आणि शक्ती म्हणजेच विश्वातील स्त्रीसुलभ, सर्जनशील तत्त्व असा अर्थ सामावला आहे. प्रकृती आणि पुरुष तत्त्वांच्या संयोगातून विश्वाची निर्मिती होते. पाश्चिमात्य विचारांमधील निसर्गाला वस्तू मानण्याच्या रीतीमुळे औद्योगिक उत्पादन पद्धतींमधून निसर्गावरील प्रभुत्व, स्त्रियांवरील प्रभुत्व निर्माण होते. पर्यावरणवादी स्त्रीवादी विचारवंतांनी स्त्री चळवळीला अभिप्रेत असणारी लोकशाहीवादी उद्दिष्टे आणि पर्यावरणवादी चळवळीला अभिप्रेत असणारी पर्यायी जीवन पद्धती ह्यांचा मेळ घालून नवी मूल्ये, नवा समाज, पर्यावरणीय समतोल टिकवून धरणारी उत्पादनपद्धती शक्य आहे असे विचार मांडले. परंतु ह्याही विचारांमध्ये तिसऱ्या जगातील, ग्रामीण भागातील स्त्रियांचे एकसाचीकरण, एकसत्त्वीकरण केले जाते. जणू काही तिसऱ्या जगातील स्त्रिया निसर्गाशी इतक्या 'एकरूप' असतात की त्यांचे निसर्गाशी मूलत: 'खास' नाते असते. भारतातील स्त्रीतत्त्वाची पायमल्ली इतिहासात कोणत्या टप्प्यावर झाली किंवा स्त्रिया आणि निसर्ग ह्यांच्या परस्परावलंबी, परस्परपूरक नात्याचा पाया कोणता, स्त्रिया निसर्गाविषयी एक वेगळेच भान कुठून कसे कमावतात अशा प्रश्नांना ह्या पर्यायी स्त्रीवादातून



उत्तरे मिळत नाहीत. ह्याला शह देणारा स्त्रीवादी पर्यावरणवाद बीना अगरवाल ह्यांनी प्रामुख्याने मांडला. त्यांच्या मते स्त्रिया आणि पुरुषांचे निसर्गाशी असणारे नाते समजून घ्यायचे तर त्यांचे भौतिक वास्तव लक्षात घ्यायला हवे. जोपर्यंत लिंगभेदावर आणि वर्ग-जात-भेदावर आधारित श्रमविभागणी असते, संपत्तीचे व सत्तेचे वाटपही तसेच होते, तोपर्यंत लिंगभेद आणि वर्गीय विषमता यातूनच माणसांचे निसर्गाविषयीचे असणारे नातेही ठरते. पर्यावरणात होणाऱ्या बदलांचे परिणामसुद्धा या विषमतेतून घडतात आणि त्याविषयी येणारे प्रतिसादही तसेच असतात. श्रमविभागणी, संपत्ती आणि सत्ता यातूनच निसर्गाचा अनुभव आणि निसर्गाविषयीचे ज्ञान घडते हे लक्षात घेता ग्रामीण भागातील स्त्रिया एकाच वेळी निसर्गाच्या विनाशामुळे भोगावे लागणारे चटके सोसत असतात आणि तरीही त्यांच्याकडे निसर्गाविषयीच्या ज्ञानाचा साठा असतो. त्यांच्या घरातील, जातीतील, वर्गातील पुरुषांपेक्षा त्यांची जाणीव भिन्न असते. म्हणून अशा स्त्रिया मूलभूत संसाधने अथवा न्यायव्यवस्थेचा खरा अर्थ अधिक जोरदारपणे आपल्या कृतीतून व्यक्त करू शकतील असा हा विचार आहे. ज्यांच्याकडे संपत्ती, सत्ता, मूलभूत संसाधनांचे नियंत्रण व शैक्षणिक संस्था आणि माध्यमांमधून आलेला ज्ञानाचा मक्ता असतो, त्यांना पर्यायी जीवनदृष्टी कशी असावी हे सांगण्याचे काम करता येईल. त्याचबरोबर स्त्रीवादी पर्यावरणवादाला एवढ्यावरच न थांबता प्रत्यक्षातील लैंगिकतेवर आधारित श्रमविभागाला शह देऊन जमीन, पाणी अशा संसाधनांवरही हक्क सांगता येईल, असा हा विचार आहे. या विचारामध्ये प्रमुख प्रवाही विकासाला पर्यायी परिवर्तनवादी प्रवाहात आणण्यासाठी विचार आणि कृती करताना, स्त्रिया केवळ स्त्रिया म्हणून पर्याय निर्माण करणार नाहीत, तर मुख्य प्रवाहातल्या राजकीय अर्थव्यवस्थेला शह देऊ पाहणाऱ्या विकास प्रक्रियेत परिघाबाहेर फेकल्या गेलेल्या अनेक गटांच्या बरोबर सहकारी म्हणून त्या पर्यायी समाजव्यवस्था निर्माण करू पाहतील.

गेल्या दशकामध्ये जागतिक भांडवलशाहीला पर्याय शोधण्याचा प्रयत्न जागतिक व स्थानिक पातळीवर केला जात आहे. जगभरातले गरीब एकत्र येऊन भांडवली बाजारपेठी व्यवस्थेच्या विरोधात साम्राज्यवादी महासत्तांच्या राजकारणाला शह देण्याचा प्रयत्न करीत आहेत. जिथे युद्धे नसतील, उपासमार नसेल, अन्याय नसेल असे वेगळे जग शक्य आहे, अशा विश्वासातून जन-आंदोलने, जनसंघटना, नागरी समूहांच्या कृती घडवल्या जात आहेत. विकास प्रक्रियेत विस्थापित होणाऱ्यांच्या बाजूने उभे राहणारे अनेक मंच जगभरातून 'जागतिक सामाजिक परिषद' म्हणून २००४ साली एकत्र आले. जागतिक आर्थिक मंचासमोर जागतिक सामाजिक मंचाचे आव्हान उभे राहिले. एका अर्थी संपूर्ण जगातील लोकशक्ती न्याय, निसर्गाशी संवादी, लोकशाहीवादी मानवी समाजाच्या शोधात आहे असे दिसते. हा प्रयत्न



स्त्रीप्रश्नाच्या दृष्टीने फार मोलाचा आहे. परंतु अनेक दलित कष्टकरी चळवळींना ज्याप्रमाणे अशा मंचाबद्दल मनात अनेक प्रश्न आहेत त्याप्रमाणेच स्त्रियांच्या न्याय्य स्थानाविषयी विचार करणाऱ्यांनाही प्रश्न उभे करावे लागतील आणि कटाक्षाने काही फसवे सापळे टाळावे लागतील. साम्राज्यवादी गट जागतिक सामाजिक मंचाशी संवाद साधून वरवर सुधारणा करून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला 'मानवी चेहरा' देतील आणि असे मंच कोणतीही अर्थपूर्ण कृती करू शकत नसल्याने जनतेचा विद्रोह दडपतील, अशी भीती व्यक्त केली जाते.

स्त्रीप्रश्नाचा आजवरचा इतिहास लक्षात घेता अशा पर्यायी समाजव्यवस्थेत स्त्रीपुरुष विषमतेलाही शह बसावा म्हणून काही काळज्या घेतल्या जाव्यात असे वाटते.


१) स्त्रीप्रश्नाची सोडवणूक साम्राज्यशाहीचा पाडाव आणि जागतिक भांडवलशाहीचा पाडाव झाल्यानंतर करावी हे स्त्री चळवळीला अमान्य आहे.

२) स्त्रीप्रश्न हा फक्त दृष्टिकोनात बदल करून सोडवता येतो हे गृहीत चुकीचे आहे. तसेच नव्या पर्यायी समाजव्यवस्थेत सहभागी होऊन स्त्रिया आपोआपच दडपणुकीपासून मुक्त होतील, हेही चुकीचे आहे.



३) जर पर्यायी समाजव्यवस्था निर्माण करताना वर्चस्वाच्या सर्व संरचनांमध्ये परिवर्तन आवश्यक असेल तर त्यात लिंगभेदावर आधारित वर्चस्वाचा आढावा लक्षात घेता जगभरातील स्त्रियांनी जेव्हा जेव्हा पर्यायांचा विचार मांडला तेव्हा तेव्हा त्यांनी खाजगी विरुद्ध सार्वजनिक, सामाजिक विरुद्ध राजकीय, भौतिक विरुद्ध सांस्कृतिक, वैयक्तिक विरुद्ध राजकीय अशा विभेदनालाच शह देऊन पर्यायाच्या दिशा सुचवल्या.

थोडक्यात, पर्यायी समाजव्यवस्थेमध्ये जगभरातील स्त्रीप्रश्नाला न्याय मिळायचा असेल तर स्त्रिया प्रत्येक समाजाच्या इतिहासात घडत असतात, त्यानुसार त्यांच्या न्याय्य हक्कांविषयीचे अग्रक्रम ठरत असतात, हे लक्षात घेतले पाहिजे. जागतिकीकरणाच्या झंझावातात स्त्रिया एक आकर्षक मालमत्ता ठरत आहेत. वेगवेगळ्या मार्गांनी वेश्या व्यवसायाला उत्तेजन दिले जात आहे. जागतिकीकरण आणि बाजारपेठ स्त्रियांना निवडीचे स्वातंत्र्य देत आहे असे भासवले जाते. परंतु निवड म्हणून काही स्त्रियांनी वेश्या व्यवसाय स्वीकारणे किंवा काही स्त्रियांनी गृहिणी होऊन संस्कृतिरक्षणाची चौकट स्वीकारणे घातक आहे, हे पर्यायी समाजव्यवस्थेसाठी झगडणाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवे. खुल्या बाजारपेठेमध्ये जेव्हा जुगारी पैसा आणि हिंसाचार यांना मान्यता मिळू लागली आहे, तेव्हा भारतीय स्त्रीजीवन अनेक अंतर्विरोधांना



तोंड देत चिरफाळले जात आहे, याचे भान ठेवावे लागेल. या परिस्थितीत राज्यसंस्था दमदार इच्छाशक्ती असणारी, चिकित्सक दृष्टी असणारी, लिंगभाव-संवेदनक्षम आणि सर्वसामान्य माणसांशी नाते, निष्ठा सांगणारी असली पाहिजे.

जागतिकीकरणाचे आव्हान इतके मोठे आहे की आपल्या समोरील समस्या जटिल आणि व्यापक आणि म्हणूनच न सोडवता येण्यासारख्या वाटू शकतील. सर्वच समस्यांचे स्वरूप जगभरातील देशादेशांमधील माणसांशी जोडलेले आहे, म्हणून त्याअर्थी सामूहिक आहे. आपल्या परिस्थितीला तोंड देताना आपण पर्याय म्हणून 'सांस्कृतिक' भिन्नतेला महत्त्व देऊन आपलेच लहानसे बेट करून जगू पाहणे ही दिशा घातक वाटते. तसेच जागतिकीकरणाच्या झंझावातात भंजाळून जाऊन मनोरुग्ण अथवा व्यसनासक्त होणे किंवा निराश होऊन विनाश अटळ मानणे हा तर मार्ग चुकीचाच आहे. विज्ञानाच्या क्षेत्रात स्टीफन हॉकिंगसारखा शास्त्रज्ञ आपल्याला आता सांगतो आहे की अवकाशात असणाऱ्या कृष्णविवरांमधून काहीच वाचू शकणार नाही, हे आपले सिद्धांतन चुकीचे होते. निर्मितिक्षम माणसांच्या नव्या संकल्पना, माहिती, ज्ञान हे सारे कृष्णविवरातूनही बाहेर येऊन पुन्हा नवे विश्व उभे राहणे शक्य आहे. महात्मा फुले यांनी ज्याप्रमाणे 'निर्मिका'ची संकल्पना मांडली आणि पर्यायी समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहिले, तसेच स्वप्न पाहणे न नाकारता, ज्ञानाचा मार्ग न सोडता वाटचाल केली तर कधीतरी स्त्रियांच्या स्थानाचा वेगळा विचारही करावा लागणार नाही अशी खात्री वाटते. ❐

# पर्यायी समाजरचनेचे आर्थिक स्वरूप

प्रयास, संसाधने व उपजीविका गट, पुणे

## प्रस्तावना

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सत्तावन्न वर्षांनंतरही देशाची स्थिती आपण अभिमान बाळगावी अशी निश्चितच नाही. मानवी जीवनासाठी आवश्यक त्या किमान सुविधा देशातील अर्ध्यापेक्षा जास्त जनतेपर्यंत आजदेखील पोहोचलेल्या नाहीत. 'शायनिंग इंडिया'च्या पातळ अस्तरामागे विविध निकषांवर जोखून पाहिल्यास देशाच्या लाजिरवाण्या स्थितीचे दर्शन घडते. त्यातच उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यांच्या अंमलबजावणीनंतर वंचित घटकांची स्थिती अधिक खालावली आहे. गेल्या एक दशकाहून अधिक काळ जमातीकरणाचा प्रभाव अधिकच तीव्रतेने व वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पर्यायी समाजरचनेच्या आजवर केल्या गेलेल्या मांडण्या नव्या संदर्भात तपासून घेत, आजच्या आव्हानांना तोंड देऊ शकेल अशी पर्यायी समाजरचनेची सखोल मांडणी करण्याची आत्यंतिक गरज आहे. या लेखामध्ये पर्यायी समाजरचनेच्या आर्थिक अंगाबाबत विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिक काळातील समाजांमध्ये आर्थिक व्यवस्थेला मिळणाऱ्या केंद्रीय स्थानाचा विचार करता पर्यायी समाजरचनेत आर्थिक व्यवस्थेचा विचार हा अत्यंत कळीचा मुद्दा ठरतो. पर्यायी आर्थिक व्यवस्थेबद्दल आपल्याला जितकी जास्त स्पष्टता असेल तितक्या जास्त प्रमाणात आपल्या मांडणीत, व्यूहनीतीत आणि कार्यक्रमात ठाशीवपणा येईल व त्यांची विश्वासार्हता वाढेल. विविध संदर्भात अशा प्रकारे व्यापक मांडणी व त्यावर विचारविनिमयाची प्रक्रिया घडणे आवश्यक आहे असे वाटते.

## भाग १ : पूर्वचर्चा

### युटोपिआ व संक्रमण


पर्यायी समाजरचनेबद्दल विचार करताना दोन टप्प्यांत हा विचार करायला हवा. एक टप्पा म्हणजे युटोपिआ किंवा आदर्श स्थिती. समाजाची आदर्श स्थिती कशी असावी याचे आपल्या मनात असणारे स्वप्न म्हणजे युटोपिआ होय. परंतु आपल्या आजच्या वास्तव परिस्थितीचा आणि आव्हानांचा विचार करता अशा युटोपिआची मांडणी अनेकदा अशक्य व अप्राप्य वाटू शकते. त्यामुळे पर्यायी समाजरचनेकडे जाण्याच्या वाटेवरचा आणखी एक मधला टप्पा विचारात घेणे आवश्यक आहे. या टप्प्याला 'संक्रमणाचा टप्पा' असे म्हणता येईल. संक्रमणाचा टप्पा असा असेल की जिथे पोहोचणे आजच्या परिस्थितीत अतिशय कठीण, दम काढणारे वाटेल, पण अशक्य, अप्राप्य आणि अव्यवहार्य वाटणार नाही. मात्र या टप्प्यावर गेल्यावर युटोपिआ गाठणे अधिक शक्य वाटू शकेल. यामुळे संक्रमण टप्पा व त्याआधीचा संक्रमणकाळ यांविषयीचे विवेचन महत्त्वाचे ठरते.

पर्यायी समाजरचनेबाबत विचार करताना अनेकदा ह्या टप्प्यांचा स्पष्टपणे विचार न करता मांडणी केली जाते. खरेतर, पर्यायांचा, त्यांच्या शक्याशक्यतेचा विचार करताना संक्रमणाच्या या टप्प्याबद्दल सखोल व विस्तृत मांडणी केली जाणे गरजेचे आहे. ध्रुव ताऱ्याप्रमाणे दिशादर्शन करणे व वाटचालीला प्रेरणा देणे हे युटोपिआतल्या स्वप्नचित्राचे काम आहे. मात्र पर्यायावरील चर्चा गंभीरपणे करण्यासाठी संक्रमणाच्या टप्प्याबाबत नेमकेपणाने बोलणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर व्यवस्थेचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

### गाभ्यातील मूल्यधारणा

सदर लेखात आपण जरी आर्थिक अंगाबाबत विचार करणार असलो तरी त्यामागील मूल्यात्मक गाभा महत्त्वाचा आहे. या लेखाच्या मर्यादेत मूल्यात्मक गाभ्याविषयी विस्तृत विवेचन करणे शक्य नसले तरी आपल्या पर्यायी रचनेच्या गाभ्यातील किमान मूल्यधारणा प्रथम स्पष्ट करून त्याआधारेच पुढील मांडणी करणे योग्य ठरेल. त्या दृष्टीने, 'जात, वर्ग, लिंगभाव, निसर्ग या सर्व प्रकारांच्या शोषणाचा अंत' होईल, अशा प्रकारच्या समाजरचनेकडे वाटचाल करणे हे आपले उद्दिष्ट असायला हवे असे म्हणता येईल. (ही किमान मूल्यधारणा स्पष्ट असली तरी या लेखाच्या मर्यादेत शोषणाच्या या सर्व रचनांचा विचार, विश्लेषण व त्याला पर्याय याचे विवेचन करणे शक्य नसल्याने फक्त आर्थिक अंगावरच सर्व भर दिलेला आहे.)





### अंतिम उद्दिष्ट

या किमान मूल्यधारणेच्या आधारे जी आर्थिक व्यवस्था उभी करायची तिचे उद्दिष्ट काय असावे? हेही स्पष्ट करायला हवे. सध्याच्या आर्थिक व्यवस्थेचे एकमात्र महत्त्वाचे उद्दिष्ट 'बृहत् आर्थिक वाढ' (मॅक्रो इकॉनॉमिक ग्रोथ) साध्य करणे हे असल्यामुळे त्याचे अनेक गंभीर आर्थिक-सामाजिक-राजकीय परिणाम आपण भोगत आहोत. पर्यायी समाजरचनेचे अंतिम उद्दिष्ट 'सर्वांना सर्वार्थाने स्वतंत्र, समृद्ध व सन्मानपूर्ण जीवन जगता येणे' असे असावे असे म्हणता येईल. यानुसार, आर्थिक व्यवस्थेचे उद्दिष्टदेखील याला पूरक असे असावे लागेल. त्या दृष्टीने पर्यायी आर्थिक व्यवस्थेचे उद्दिष्ट 'समाजातील सर्वांच्या, पण प्राधान्याने वंचित घटकांच्या वांछनीय अशा सर्व भौतिक गरजा पूर्ण करणे तसेच त्यांच्या इतर गरजांसाठी आवश्यक त्या भौतिक वस्तू व सेवा निर्माण करणे व पुरविणे' असे असेल. अर्थात, आपण येथे फक्त आर्थिक आयामाचा विचार करीत असलो तरी पर्यायी समाजरचनेकडे जाताना राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक असे सर्वच आयाम महत्त्वाचे असून या इतर आयामांवरही काम करण्याची गरज आहे हे विसरून चालणार नाही.

### संक्रमणकालीन उद्दिष्ट



पर्यायी समाजरचनेच्या संक्रमणकालीन टप्प्यावर आपण भर देणार असल्याने 'समाजातील सर्वांच्या सर्व वांछनीय भौतिक गरजा पूर्ण करणे' या अंतिम उद्दिष्टाच्या आधीचे उद्दिष्ट निश्चित करावे लागेल. 'सर्व वंचितांना उपजीविकेची सुरक्षितता अथवा खात्री देणे' हे संक्रमणकालीन आर्थिक व्यवस्थेचे सर्वात प्राधान्याचे उद्दिष्ट असावे असे म्हणता येईल. येथे 'उपजीविका' म्हणजे 'किमान गरजा भागविणे' ही व्याख्या गृहीत धरलेली नाही. त्याऐवजी उपजीविका म्हणजे 'सुरक्षित, समाधानी व सन्मानपूर्ण जीवन' अशी व्याख्या केलेली आहे. अशा जीवनात पुरेसे व पौष्टिक अन्न; त्या ठिकाणच्या भौतिक व सामाजिक परिस्थितीनुसार पुरेसे वस्त्र; पिण्याचे शुद्ध व स्वच्छ पाणी; सर्व ऋतूंमध्ये पूर्ण निवारा देईल असे घर; योग्य, पुरेशी व वेळेवर मिळणारी वैद्यकीय मदत आणि घरातील सर्व मुलांना पुरेसे शिक्षण यांचा समावेश व्हायला हवा. या साऱ्या गरजा पूर्ण होणे म्हणजे उपजीविकेची पूर्ती होणे असे म्हणता येईल.

यापुढील पायरी म्हणजे उपजीविकेची सुरक्षितता होय. वंचित घटकांवर त्यांच्या विविधांगी दुर्बलतेपायी अस्मानी, सुलतानी व शारीरिक संकटांचे सतत आघात (उदा. आजारपण, अपघात, मृत्यू, अवर्षण, पूर, दंगली इ.) होत असतात. ह्या आघातांच्या काळात ह्या कुटुंबांना किमान गरजादेखील पूर्ण करणे कठीण होऊन बसते. त्यामुळे मिंधेपणा व वंचिततेचे चक्र अव्याहत चालू राहाते. स्वत:वरील अन्याय, अत्याचारांचा मुकाबला करणे या चक्रात अडकलेल्या वंचितांना अशक्य होऊन बसते. कित्येकदा ह्या आघातांच्या काळात कुटुंबाची पूर्णत: वाताहत होते. हे लक्षात घेऊन 'उपजीविकेच्या सुरक्षिततेचा' विचार केला आहे. ह्या आघातांच्या काळातही उपजीविकेच्या सर्व (किमान नव्हे) गरजा भागतील अशी परिस्थिती असणे म्हणजे 'उपजीविका सुरक्षितता' असणे. यासाठी संकटाच्या काळात विकता येईल अशी मालमत्ता (ॲसेट) अथवा वापरण्यासाठी बेगमी (स्टॉक) वंचित कुटुंबाकडे असायला हवी. मात्र अशी मालमत्ता वा बेगमी तयार होण्यासाठी संकट नसतानाच्या काळात त्यांच्या उपजीविकेतून त्यांच्या तत्कालीन गरजा भागून वाढावा (सरप्लस) निर्माण होईल एवढे उत्पन्न त्यांना मिळायला हवे.

### 'आर्थिक व्यवस्था' म्हणजे नेमके काय?

अशा तऱ्हेने पर्यायी आर्थिक व्यवस्थेच्या उद्दिष्टांची निश्चिती झाल्यानंतर अशा व्यवस्थेच्या स्वरूपाबाबतच्या चर्चेत शिरण्याआधी आर्थिक व्यवस्था म्हणजे नेमके काय याची सोपी व्याख्या करूया. अर्थशास्त्राच्या व्याख्येचा आधार घेऊन असे म्हणता येईल की आर्थिक व्यवस्था म्हणजे समाजातील वस्तू व सेवांचे उत्पादन, वितरण व उपभोग ही कामे करणारी व्यवस्था. तेव्हा आर्थिक स्वरूपाबाबत विवेचन करताना आपल्याला प्रामुख्याने पुढील घटकांविषयी विचार करावा लागेल.

१) उत्पादनाचा भौतिक पाया व उत्पादनाचे स्वरूप (शेती उत्पादन, औद्योगिक उत्पादन व सेवा या क्षेत्रांचे स्वरूप)

२) उत्पादनाची साधने (भांडवल, कच्चा माल, तंत्रज्ञान, श्रम इ.) व या साधनांवरील मालकी, वापर, तसेच व्यवस्थापन व संवर्धनाची जबाबदारी

३) बाजारपेठेचे स्वरूप

४) संस्थात्मक रचना व त्यातून निर्माण होणारे आर्थिक संबंध

## भाग २ : पर्यायी आर्थिक व्यवस्थेची रचना

ह्या भागात पर्यायी आर्थिक व्यवस्थेची रचना कशी असावी याबाबत ठोस मांडणी करणाऱ्या काही सूत्रांची चर्चा केली आहे. या चर्चेमधून अशा पर्यायी आर्थिक व्यवस्थेचे एक चित्र वाचकाच्या मनामध्ये उभे करण्याचा उद्देश आहे. अर्थात हे चित्र संक्रमण टप्प्यावरचे आहे. ह्या चित्रातील टप्पा गाठणे हे सध्याच्या परिस्थितीमध्ये कठीण वाटले तरी आर्थिक, तांत्रिक, राजकीय, सामाजिक दृष्टीने अशक्य वा अप्राप्य असे त्यात काहीही नाही हे लक्षात घ्यायला हवे. त्याचप्रमाणे ह्या चित्राची उभारणी आधीच्या भागातील

मूल्यधारणा व उद्दिष्टे यांनुसार केली आहे हे नमूद करायला हवे.

ह्या भागातील चर्चेची मांडणी तीन उपविभागांत केली आहे. (अ) उत्पादनाचा भौतिक पाया व स्वरूप, (ब) उत्पादनाची साधने आणि (क) बाजारपेठ, संस्थात्मक रचना व आर्थिक परस्परसंबंध. ह्या प्रत्येक उपविभागात काही सूत्रे मांडली आहेत.


ह्या विविध सूत्रांच्या चर्चेमध्ये शिरण्याअगोदर व्यवस्थेच्या स्तरावरील एक मुद्दा मांडायला हवा. पर्यायी आर्थिक रचनेचा विचार करताना खनिज पदार्थ व ऊर्जासाधनांवर आधारित असणाऱ्या रूढ उद्योगांना व शहरांना प्रधान (किंवा) केंद्रीय स्थान देऊन चालणार नाही. त्याऐवजी नैसर्गिक संसाधनांवर आधारित उद्योग व त्याभोवताली उभी राहणारी ग्रामीण बाजाची अर्थव्यवस्था उभी करावी लागेल. याचे पहिले महत्त्वाचे कारण म्हणजे रूढ 'शहरी-औद्योगिक' व्यवस्थेतील (शहरे व रूढ उद्योगांना प्रधान स्थान देणाऱ्या) अनेक गंभीर त्रुटी पाहता सर्व लोकांच्या 'उपजीविके'च्या गरजा पुरवण्याचे उद्दिष्ट ही व्यवस्था साध्य करू शकेल अशी परिस्थिती नाही. या व्यवस्थेत मर्यादित साठे असणाऱ्या खनिज पदार्थ व ऊर्जासाधनांचा वापर फार मोठ्या प्रमाणात करणे गरजेचे असल्याने पर्यावरणीय शाश्वततेच्या निकषांवर ही व्यवस्था टिकू शकत नाही. याबाबतचा दुसरा मुद्दा म्हणजे वंचितांच्या वाढत्या परिघीकरणाचा. या व्यवस्थेत वस्तू-उत्पादनाच्या क्षमतेत प्रचंड वाढ होते. मात्र आधुनिक तंत्रज्ञान व पूरक व्यवस्था अधिकाधिक लोकांना आर्थिक व्यवस्थेच्या परिघावर सतत ढकलत राहतात. त्यामुळे बहुसंख्य लोकांना गरजेच्या वस्तू व सेवांचा उपभोग घेणेही अशक्य बनते. त्याच वेळी काही थोड्या लोकांकडे मात्र संपत्तीचे व त्यामुळे आर्थिक-राजकीय सत्तेचे केंद्रीकरण होते. या टोकाच्या विषमतेमुळे राजकीय व सामाजिक स्तरावरदेखील ही व्यवस्था टिकाऊ (शाश्वत) बनू शकत नाही.

या महत्त्वाच्या कारणांमुळे सध्याच्या आर्थिक व्यवस्थेचे हे शहरी व रूढ उद्योगप्रधान असे स्वरूप कायम ठेवून आपल्याला पर्यायी समाजरचनेकडे जाता येणार नाही हे स्पष्ट आहे. मूल्यधारणा व उद्दिष्टांच्या निकषांवर वांछनीय ठरणाऱ्या पर्यायी आर्थिक व्यवस्थेचे स्वरूप कसे असेल ह्याची चर्चा या पुढील भागात केली आहे.

## अ) उत्पादनाचा भौतिक पाया आणि उत्पादनाचे स्वरूप

*१) जैवमाल हा मूळ व मुख्य भौतिक आधार*

मुख्यत: खनिजांपासून मिळणाऱ्या (त्यातही मुख्यत: खनिजतेलापासून मिळणाऱ्या) व इतर मानवनिर्मित पदार्थांवर सध्याची 'शहरी-औद्योगिक' व्यवस्था आधारित आहे. हे पदार्थ ह्या रूढ अर्थव्यवस्थेचे मुख्य भौतिक



आधार (मटेरिअल बेस) आहेत. विविध प्रकारची प्लॅस्टिक व पॉलिमर्स, खनिजतेलजन्य इतर पदार्थ, विविध धातू व धातुसंयुगे ह्यांचा वापर जास्तीत जास्त वाढवण्याकडे या व्यवस्थेचा कल आहे. जगातील खनिजांचे साठे मर्यादित असून ज्या वेगाने त्यांचा वापर केला जात आहे ते पाहता या पदार्थांवर आधारित व्यवस्था शाश्वत स्वरूपाची असू शकणार नाही, हे उघड आहे. ह्या पदार्थांपैकी बहुतेक पदार्थ ज्यापासून मिळवले जातात त्या खनिज स्रोतांवरदेखील आपला घट्ट ताबा ठेवण्याचा प्रयत्न जगातील बलवान राष्ट्रे व बहुराष्ट्रीय कंपन्या सतत करत असतात. तेव्हा वंचितांच्या दृष्टीने पाहता या पदार्थांवर पर्यायी व्यवस्थेतील उत्पादनांचा मुख्य भौतिक आधार म्हणून अवलंबून राहणे चुकीचे ठरेल.

या पार्श्वभूमीवर खनिजांपासून मिळणाऱ्या पदार्थांऐवजी तसेच इतर मानवनिर्मित पदार्थांपैकी जैवमाल (बायोमास) हा साऱ्या पदार्थांचा मूळ व मुख्य भौतिक आधार (ओरिजिनल मटेरिअल बेस) म्हणून स्वीकारणे योग्य ठरेल. याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे (पृथ्वीवरील बहुसंख्य ठिकाणची) स्थानिक नैसर्गिक व्यवस्था जैवमालाची निर्मिती पुन्हा पुन्हा करू शकते. जैवमालाच्या पुनर्निर्मितीच्या क्षमतेमुळे त्यावर आधारित व्यवस्था शाश्वत स्वरूपाची बनू शकेल. वंचिताभिमुख विकासाच्या दृष्टीने स्थानिक पातळीवर, स्थानिक पर्यावरणातून निर्माण होणारा जैवमाल विविध कारणांनी अत्यंत उपयुक्त आहे. एकतर, तो वंचितांना स्थानिक स्तरावर उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे खनिजांपासून मिळणाऱ्या पदार्थांचे उत्पादन व वितरण या प्रक्रियांवर काहीही नियंत्रण नसल्याचा जो अनुभव वंचित गटांना आज येतो तसा पर्यायी व्यवस्थेत येणार नाही. दुसरे म्हणजे स्थानिक जैवमाल ज्यातून निर्माण होतो त्या स्थानिक नैसर्गिक संसाधनांवर वंचित गटांना पूर्वी अधिकार होते व आजही अनेक ठिकाणी मर्यादित तरी अधिकार आहेत. त्यामुळे विकास-प्रयत्नांची सुरुवात स्वतंत्रपणे सुरू करणे शक्य होईल. तिसरे म्हणजे स्थानिक नैसर्गिक संसाधनांपासून विविध प्रकारचा जैवमाल मिळवण्यासाठी आवश्यक ते तांत्रिक ज्ञान स्थानिक वंचितगटांकडे आजही उपलब्ध आहे.

*२) उत्पादनाचे स्वरूप : शेती उत्पादन*

या सर्व गोष्टी लक्षात घेता पर्यायी अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी जैवमाल असेल. म्हणजेच आज खनिजांपासून मिळणाऱ्या पदार्थांवर आधारित विविध वस्तू निर्माण करण्यावर जो भर दिला जातो त्याऐवजी जैवमालाच्या उत्पादनात विविधता आणून जैवमाल-आधारित वस्तूंची संख्या वाढवणे आवश्यक आहे. अन्न, सरपण, चारा यांबरोबरच रोजच्या इतर विविध वस्तू तयार करण्यासाठी जैवमाल वापरला जाईल. एवढेच नव्हे तर, स्थानिक स्तरावरील पायाभूत संरचनेसाठी (इन्फ्रास्ट्रक्चर) आवश्यक अशा अनेक गोष्टींत जैवमालाचा प्राधान्याने व मोठ्या प्रमाणात वापर करणे गरजेचे आहे. त्यामुळे आजच्या व्यवस्थेतील खनिज पदार्थांवरील अतिरिक्त भर कमी होऊन त्या जागी स्थानिक स्तरावर उपलब्ध असणारा व वंचितांच्या आवाक्यातील व पर्यावरणस्नेही अशा जैवमालाचा वापर करण्यात येईल. यासाठी जैवमालाचे उत्पादन वाढविणे व त्यातील विविधता व त्याचा दर्जा वाढविणे यावर भर द्यावा लागेल. (अर्थात जैवमालाव्यतिरिक्त इतर पदार्थांचा वापर ताबडतोब व संपूर्णत: थांबवणे शक्य नाही. संक्रमणकाळात एका बाजूने जैवमालाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढवताना त्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी व त्रुटींवर मात करण्यासाठी आवश्यक तेथे, तारतम्याने व नेमक्या प्रमाणात या इतर प्रकारच्या पदार्थांचा वापर करत राहावे लागेल.)

अशा तऱ्हेने जैवमाल हा उत्पादनांचा मुख्य भौतिक आधार बनल्याने पर्यायी व्यवस्थेत शेतीचे स्वरूप बदलेल. अन्नधान्ये, गळित धान्ये, फळफळावळ, भाज्या आणि नगदी पिके यांच्या उत्पादनाबरोबरच विशेषत: पायाभूत संरचनेसाठी कच्चा माल म्हणून लागणाऱ्या विविध प्रकारच्या जैवमालाचे उत्पादन हाती घ्यावे लागेल. (उदा. बांबू, छोटे लाकूड देणारी विविध प्रकारची झाडे, विविध प्रकारचे दोर (फायबर) देणाऱ्या वनस्पती, रेझीनसारखी रसायने देणाऱ्या वनस्पती इ.) थोडक्यात पर्यायी रचनेत शेतीची व्याख्या 'विविध प्रकारच्या जैवमालाचे उत्पादन' अशी करावी लागेल.

*३) उत्पादनाचे स्वरूप : औद्योगिक व सेवा क्षेत्र*

शेतीप्रमाणेच औद्योगिक क्षेत्राचेही (मूलभूत अवजड उद्योग, यंत्रोत्पादन, उपभोग्य वस्तूंचे उत्पादन) स्वरूप पर्यायी रचनेत आमूलाग्र बदलेल. पायाभूत संरचनेच्या उभारणीमध्ये तसेच विविध उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात जैवमाल-आधारित व्यवस्था जशी केंद्रस्थानी येत जाईल तशी मूलभूत अवजड उद्योगांची गरज कमी होत जाईल. पर्यायी व्यवस्थेतही त्यांची गरज भासेल. परंतु त्यांच्या वाढीकडे एक स्वतंत्र उद्दिष्ट (अथवा साध्य) म्हणून न पाहता आर्थिक व्यवस्थेच्या उभारणीकरता गरज असेल तशी (साधन म्हणून) त्यांची वाढ होईल. जैवमाल-आधारित व्यवस्थेत स्थानिक पातळीवरील जैवमाल उत्पादनाला कळीचे स्थान असल्याने वाहतुकीची गरज आणि व्याप्ती यांचे स्वरूप बदलेल. वाहतुकीमध्ये आज खर्च होणाऱ्या प्रचंड ऊर्जेची यामुळे बचत होऊन खनिज तेलावरील अवलंबन कमी होईल. संक्रमणकाळात अवजड उद्योगांबरोबरच आर्थिक व्यवस्थेच्या वाढीसाठी इंजिनिअरिंग उद्योगांची गरज लागेल. कमी शिक्षण असलेल्या वंचित गटातील लोकांना या क्षेत्रातून मोठा रोजगार निर्माण होऊ शकतो. उपभोग्य वस्तूंचे

उत्पादनही आजच्याप्रमाणे केंद्रित पद्धतीने न होता स्थानिक पातळीवर, स्थानिक कच्चा माल वापरून होईल.

याचबरोबर जैवमाल-आधारित रचना उभी करण्यासाठी जैवमालाचे उत्पादन व त्यावर प्रक्रिया यावर संबंधित विविध उद्योग उभे राहतील. यामुळे आज बेरोजगारीची जी तीव्र समस्या भेडसावत आहे ती बऱ्याच प्रमाणात सुटण्यास मदत होईल. जैवमाल-आधारित अर्थव्यवस्था उभी करताना जैवमालाच्या उत्पादनात, दर्जात व वैविध्यात मोठ्या प्रमाणावर वाढ करावी लागेल. अशा जैवमालाच्या उत्पादनासाठी रासायनिक खते व कीटकनाशके यांचा वापर टाळून सेंद्रिय खते व औषधे यांचा वापर करावा लागेल. या सेंद्रिय खते, औषधे, स्थानिक बियाणे यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे हा एक मोठा जैवमाल-उद्योग असेल. तसेच जैवमालाचे सार्वत्रिकरीत्या व मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी आवश्यक त्या पाण्याच्या स्थानिक स्रोतांचे व साठवणुकीचे व्यवस्थापन व पुरवठा हादेखील महत्त्वाचा 'जैवमाल-आधारित सेवाउद्योग' होऊ शकेल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे जैवमालाचा रोजच्या जीवनामध्ये व पायाभूत संरचनेमध्ये वापर करता यावा म्हणून त्या जैवमालावर विविध प्रक्रिया करणारे उद्योग मोठ्या प्रमाणात उभारावे लागतील. त्या प्रक्रिया केलेल्या जैवमालापासून पायाभूत संरचनांसाठीच्या इमारती व इतर बांधकामासाठी लागणारे विविध घटक व वस्तू बनवणे हादेखील मोठा उद्योग असेल.

अशा तऱ्हेने स्थानिक जैवमाल-आधारित उत्पादनांचा मोठ्या प्रमाणावर वापर करणारे प्राथमिक उद्योग, त्या प्राथमिक उत्पादनांचा वापर करून स्थानिक स्तरावर नवनवीन उत्पादने करणारे उद्योग, या साऱ्या उत्पादनांची स्थानिक स्तरावर विक्री व पुरवठा करणारे व्यवसाय, त्या उद्योगांना इतर आदाने वा कच्चा माल/सेवा पुरवणारे व्यवसाय या साखळीतून स्थानिक अर्थव्यवस्थेची उभारणी करता येईल. (येथे 'स्थानिक अर्थव्यवस्था' या संज्ञेचा अर्थ बदलता घ्यावा लागेल. त्यात वाड्यांची/पाड्यांची, अनेक पाड्यांची एकत्रित, गावांची, पंचक्रोशींची, तालुक्यांची व जिल्ह्यांची अशी उतरंडीची रचनाही करता येईल.)


### ब) उत्पादनाची साधने

उत्पादनाच्या साधनांमध्ये उत्पादनासाठी आवश्यक कच्चा माल, भांडवल, तंत्रज्ञान, श्रम इत्यादींचा समावेश होतो. आजच्या आर्थिक व्यवस्थेत उत्पादनाच्या साधनांवर समाजातील संख्येने छोट्या पण प्रबळ समाजगटांची मालकी आहे. त्यातूनच आर्थिक, राजकीय सत्तेच्या केंद्रीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळते. आजच्या भांडवलसघन उत्पादन प्रक्रिया, उच्च तंत्रज्ञानाचा विकास यांमुळे मानवी श्रमांची गरज कमी होत जाते आणि नैसर्गिक संसाधनांचीही अक्षम्य अशी नासाडी होते.

पर्यायी आर्थिक व्यवस्था जैवमाल-आधारित असल्याने आज उत्पादनासाठी आवश्यक मानल्या जाणाऱ्या अनेक गोष्टींना त्यात 'महत्त्वाचे' स्थान असणार नाही. (उदा. खनिज साधने, ऊर्जेचे रूढ स्रोत, उच्च व आधुनिक तंत्रज्ञान, भांडवल संचय इत्यादी) परंतु उत्पादन-साधनांच्या मालकीचा प्रश्न तरीही कळीचा असेल. युटोपिआमधील पर्यायी समाजरचनेत उत्पादन-साधने सामुदायिक मालकीची बनतील आणि त्यावर कोणत्याही एका वर्गाची मक्तेदारी नसेल असे म्हटले जाते. मात्र, संक्रमणकाळात खाजगी मालकीचा पूर्ण बीमोड होणे कठीण आहे. तेव्हा त्याही परिस्थितीमध्ये या उत्पादन-साधनांचा वापर अधिकाधिक प्रमाणात वंचितांच्या उपजीविका-सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यासाठी काही ठोस पावले उचलावी लागतील. जैवमाल-आधारित अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक अशा काही उत्पादनसाधनांची चर्चा पुढे केली आहे.

*१) नैसर्गिक संसाधनांचा प्राधान्याने वापर व त्यांचे संवर्धन*

जैवमाल-आधारित अर्थव्यवस्थेत जैवमालाचे उत्पादन करणाऱ्या स्थानिक नैसर्गिक संसाधनांचे (जमीन, जंगल, पाणी) महत्त्व केंद्रीय असेल. तेव्हा स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर स्थानिक वंचितांच्या उपजीविका-सुरक्षिततेच्या दृष्टीने प्राधान्याने व्हायला हवा. नैसर्गिक संसाधनांच्या गैर



वापराला आळा घालण्याबरोबरच स्थानिक नैसर्गिक संसाधनांवरील स्थानिक वंचितांच्या कायदेशीर, पारंपरिक, तसेच सामूहिक वापराच्या हक्कांचे संरक्षण करणे हा कळीचा मुद्दा ठरेल. या दृष्टीने जमीन मालकीच्या केंद्रीकरणाचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. गेल्या काही दशकांमध्ये जमीन पुनर्वाटपाचा मुद्दा मागे पडल्यासारखा झाला आहे. पर्यायी व्यवस्थेचा विचार करताना पुनर्वाटपाचा कार्यक्रम महत्त्वाचा ठरेल. तसेच जमिनीबरोबर जंगल, पाणी यांवरील वंचितांचा हक्क व हक्कदारीचा (एन्टायटलमेंट) मुद्दाही महत्त्वाचा ठरतो. पाणी व जंगले यांवर मालकी अथवा वापराचे हक्क वंचितांना मिळणे गरजेचे आहे.

या हक्कांबरोबर स्थानिक नैसर्गिक संसाधनांची प्राथमिक उत्पादकता वाढविणे हादेखील महत्त्वाचा घटक आहे. (प्राथमिक उत्पादकता म्हणजे स्थानिक नैसर्गिक व्यवस्थेबाहेरील कोणतेही पदार्थ–उदाहरणार्थ, पाणी, खते, इत्यादी– न वापरता साधलेली जैवमालाचे उत्पादन करण्याची अंतर्गत क्षमता). ही प्राथमिक उत्पादकता वाढविण्यासाठी स्थानिक नैसर्गिक संसाधनांची धारणक्षमता व दर्जा वाढविणे महत्त्वाचे ठरते. अर्थात याचा अर्थ जैवमालाची निर्मिती करण्यासाठी बाहेरचे कोणतेही पदार्थ अथवा आदाने वापराची नाहीत असा नव्हे. मात्र बाहेरील आदाने वापरताना त्यांचा वापर तारतम्याने, नेमका व आवश्यक तेथेच केला जाईल, त्यांच्यावर दीर्घ पल्ल्याचे अवलंबित्व निर्माण होणार नाही व इतरांवर अन्याय करून त्यांची आयात केली जाणार नाही अशा सर्व पथ्यांचे पालन करावे लागेल.



*२) समान पाणी वाटपाचे सूत्र*

जैवमालवृद्धीसाठी भारतासारख्या हवामानामध्ये पाणी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. विशेषत: दक्षिण भारतात पाण्याची टंचाई हा जैवमालाच्या उपलब्धतेच्या दृष्टीने एक मोठा अडसर ठरतो.

या पार्श्वभूमीवर 'पाण्याचे क्षमतेच्या तत्त्वावर सर्वांना वाटप' ही महाराष्ट्रातील पर्यायवादी चळवळीची मागणी पर्यायी समाजरचनेसाठी दिशादर्शक ठरेल. समान पाणी वाटपाच्या तत्त्वामध्ये प्रत्येक कुटुंबाला त्याच्या उपजीविका-सुरक्षिततेला आवश्यक तेवढे उत्पादन करण्यासाठी आवश्यक तेवढ्या पाण्याची हमी देण्याची कल्पना आहे. यामुळे सर्वांना समान पाणी मिळेल व त्यामध्ये भूमिहीनांसकट गावातील सर्व कुटुंबे सामील असतील असा हा विचार आहे. काही अभ्यासकांच्या मते जमिनीप्रमाणेच पाणी हे देखील उत्पादनाचे महत्त्वाचे साधन असल्यामुळे पाण्याचे समान वाटप करणे म्हणजे उत्पादन साधनांचे पुनर्वाटप करणे आहे. समान पाणी वाटपाचे तत्त्व वंचित घटकांसाठी अनेक दृष्टींनी क्रांतिकारक बदलाचे साधन ठरू शकते.

*३) पुनर्निर्मितिक्षम ऊर्जासाधनांना प्राधान्य*

उत्पादनासाठी वापरली जाणारी ऊर्जासाधने हा आर्थिक व्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे. आजच्या व्यवस्थेत ऊर्जेच्या रूढ स्रोतांचा (कोळसा, खनिज तेल, अणुऊर्जा, मोठी धरणे इ.) वापर फार मोठ्या प्रमाणावर होतो. या स्रोतांचे तीव्र व धोकादायक वाटावेत असे पर्यावरणीय दुष्परिणाम आता पुरेसे स्पष्ट झालेले आहेत. या रूढ ऊर्जासाधनांचे स्रोत पृथ्वीवर विशिष्ट ठिकाणीच उपलब्ध असल्याने त्या स्रोतांवर मक्तेदारी निर्माण केली जाते. त्यामुळे ही ऊर्जासाधने गरीब देश व त्यातील वंचित समाजघटकांना परवडेल अशा किंमतीत व पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणे कठीण असते. तेव्हा पर्यायी समाजरचनेचा विचार करताना या ऊर्जासाधनांवर अवलंबून चालणार नाही.

पर्यायी व्यवस्थेत सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जैवमालापासून मिळणारी ऊर्जा, प्राणीज ऊर्जा अशा प्रकारचे पुनर्निर्मितिक्षम (रिन्युएबल) ऊर्जास्रोत वापरण्यावर मुख्य भर राहील. हे ऊर्जास्रोत वापरावयाच्या तंत्रज्ञानाचा विकास वेगाने करण्यासाठी व्यापक व प्रामाणिक प्रयत्न करावे लागतील. हा विकास करताना त्यातून निर्माण होणारे तंत्रज्ञान निसर्गस्नेही, स्थानिक अर्थव्यवस्थेला गती देणारे, स्थानिक जैवमाल-आधारित उत्पादनांचा जास्तीतजास्त वापर करणारे असेल ही काळजी घ्यावी लागेल.

*४) अनुरूप तंत्रज्ञान व रोजगार निर्मितीला प्राधान्य*

पर्यायी आर्थिक व्यवस्थेत भांडवलसघन उद्योगांऐवजी श्रमसघन उद्योगांची वाट धरावी लागेल. या सूत्राचा वापर केवळ जैवमाल-आधारित उद्योगातच नव्हे तर इंजिनिअरिंग उद्योगातही करावा लागेल. भांडवल जास्त लागणाऱ्या संगणकीय, स्वयंप्रेरित यंत्रांपेक्षा कामगारचलित यंत्रे वापरण्यावर भर द्यावा लागेल. मात्र, रोजगारनिर्मितीच्या प्रश्नाचे उत्तर रूढ विचारप्रणालीप्रमाणे केवळ संघटित इंजिनिअरिंग उद्योगात किंवा सेवा उद्योगांमध्ये शोधून चालणार नाही, तर त्यासाठी जैवमाल-निर्मिती व संबंधित क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मितीसाठी मोठी गुंतवणूक करावी लागेल.

स्थानिक जैवमाल वापरणारी अर्थव्यवस्था उभी करण्यासाठी लागणारे उद्योग उभारण्यासाठीचे तंत्रज्ञान हा एक कळीचा मुद्दा आहे. स्थानिक जैवमाल, स्थानिक ऊर्जासाधने व स्थानिक मजूर, कारागीर यांचा वापर करणारे अनुरूप तंत्रज्ञान विकसित करण्यावर पर्यायी रचनेत भर द्यावा लागेल. हे तंत्रज्ञान कार्यक्षमता, उत्पादनक्षमता, उत्पादनांची विश्वासार्हता या निकषांवरदेखील पुरेपूर उतरेल याची काळजी घ्यावी लागेल.

## क) बाजारपेठ, संस्थात्मक रचना व आर्थिक संबंध

*१) बाजारपेठ*

बाजारपेठेचे आजच्या व्यवस्थेतील स्वरूप व भूमिका पर्यायी समाजरचनेत अर्थातच कायम ठेवता येणार नाही. आजच्या बाजारपेठेत मक्तेदारी, साठेबाजी, अवास्तव किमती, अवास्तव नफा, आर्थिकेतर लाभांसाठी अडवणूक असे अनेक गैर प्रकार आढळतात.

पर्यायी रचनेत बाजारपेठेतील सर्व सक्रिय घटकांवर शासनाद्वारे जनतेची सक्त निगराणी अथवा नियमन असावे लागेल. त्याचबरोबरीने खाजगी घटकांच्या अर्थव्यवहाराचे अप्रत्यक्ष/प्रत्यक्ष नियंत्रण नियोजनयंत्रणेमार्फत करता येईल. संक्रमण काळात बाजारपेठेची गरज असली तरी हळूहळू बाजारपेठेतील खाजगी घटकांच्या ताकदीवरील बंधने वाढवत न्यावी लागतील व अशाप्रकारे बाजारपेठेचे स्वरूप बदलण्याकडे लक्ष पुरवावे लागेल. उदाहरणार्थ, स्थानिक बाजारव्यवस्थेच्याद्वारे झाला तरी घाऊक स्तरांवरील विनिमय पूर्णपणे मुक्त बाजाराच्या माध्यमातून न होता 'उत्पादन व वितरणाचा समन्वय' करणाऱ्या लोकनियंत्रित अशा खास संस्थांच्या माध्यमातून अथवा मार्गदर्शनाखाली होऊ शकेल.

क्षेत्राक्षेत्रांतील गरजा व परिस्थिती यांना अनुसरून त्या त्या क्षेत्रात बाजारपेठेला किती व कसा वाव द्यायचा हा निर्णय बदलत जाईल व त्याप्रमाणे त्या क्षेत्रातील नियोजनाची खोली व आवाकाही बदलत जाईल. काही क्षेत्रांत अगदी तपशीलवार नियोजन केले जाईल. काही क्षेत्रांत केवळ दिशादर्शनापुरते नियोजन असेल, तर काही क्षेत्रांत नियोजन नसेल.

*२) संस्थात्मक रचना व नवे आर्थिक परस्परसंबंध*

स्थानिक अर्थव्यवहारात समर्थपणे सामील होण्यासाठी समान आर्थिक हितसंबंध असणाऱ्या वंचितांच्या नव्या आर्थिक संस्था उभ्या कराव्या लागतील. या संस्थांची बांधणी सहकारी संस्था, स्वयंसेवी संस्था, पतपेढ्या, कंपन्या किंवा इतर नावीन्यपूर्ण अंतर्रचना असणाऱ्या संस्थांच्या रूपाने करावी लागेल.

या नव्या संस्थांमध्ये भूमिहीनांच्या जैवमालनिर्मिती सहकारी संस्था, वंचित वर्गातील स्त्रियांचे भाजीपाला उत्पादक गट, स्त्रियांच्या सरपण निर्मिती सोसायट्या, बरड जमीन 'पालकां'ची (मालक नव्हे) वृक्षलागवड कंपनी अशांसारख्या जैवमाल उत्पादनामध्ये भाग घेणाऱ्या संस्था असतील. त्याचप्रमाणे भूमिहीनांच्या व स्थानिक कारागीरांच्या लाकूडप्रक्रिया सोसायट्या, जैविक खत निर्मिती संघ यांसारख्या आर्थिक संस्था उभ्या करणेदेखील उपयोगी ठरेल. वंचित घटक अशा आर्थिक संस्थांच्या माध्यमातून स्थानिक



गरजा पुरवण्यासाठी व स्थानिक पायाभूत संरचनेसाठी लागणारी उत्पादने बनविण्यामध्ये समर्थपणे भाग घेऊ शकतील.

अशा तऱ्हेने नैसर्गिक संसाधनांवर प्राधान्याचा हक्क (वापराचा वा मालकी) हा वंचितांच्या नियंत्रणाखालच्या आर्थिक संस्थांकडे असेल. प्रत्यक्ष कायदे व नियम करून वा वित्तपुरवठ्यातील अटींच्या अप्रत्यक्ष मार्गाचा वापर करून शासनयंत्रणा त्यासाठी प्रयत्न करू शकेल.

वंचितांच्या आर्थिक संस्थांची बांधणी केल्यावर या आर्थिक संस्था, स्थानिक स्तरावरील इतर बलवान गट व विविध सरकारी संस्था यांच्यात नवीन आर्थिक परस्परसंबंध निर्माण करावे लागतील. उदाहरणार्थ, वंचितांची लाकूडप्रक्रिया सोसायटी, गावातील जमीनमालकांची वृक्षलागवड सोसायटी व सरकारी वित्तीय संस्था यांच्यातील त्रिपक्षी करारानुसार जमीनमालकांना वनलागवडीसाठी वित्तीय मदत पुरवली जात असताना त्यांचे लाकूड उत्पादन काही विशिष्ट (स्थिर) किमतीला वंचितांच्या लाकूडप्रक्रिया सोसायटीला देणे बंधनकारक राहील. अशा नावीन्यपूर्ण आर्थिक परस्परसंबंधांचे दुसरे उदाहरण म्हणजे गावाला नवीन कालव्याने पाणीपुरवठा करताना गावातील उपजाऊ जमिनीपैकी काही टक्के जमीन दीर्घकाळाच्या करारानुसार वंचित स्त्रियांच्या भाजीपाला उत्पादन गटांना देण्याचे बंधन घालण्यात येईल.



वर नमूद केलेल्या नव्या आर्थिक परस्परसंबंधांना बळ देण्यासाठी वंचितांच्या आर्थिक संस्थांना उपक्रम सुरू करण्यासाठी सवलतीच्या पण परवडणाऱ्या दराने वित्तपुरवठा करण्यासाठी खास वित्तीय व्यवस्थाही उभी करावी लागेल.

## समारोप

या छोट्याशा टिपणात पर्यायी आर्थिक व्यवस्थेचे सखोल व सविस्तर चित्रण करणे कठीण आहे. त्यामुळे आर्थिक व्यवस्थेतील सर्व मुद्द्यांचा, घटकांचा येथे विचार केला आहे असा अजिबात दावा नाही. मात्र त्यातील महत्त्वाच्या सूत्रांची थोडक्यात मांडणी करून पर्यायी आर्थिक व्यवस्थेची सर्वसाधारण कल्पना वाचकांना यावी असा येथे प्रयत्न केला आहे. पर्यायी व्यवस्थेच्या ह्या चित्रातून अनेक महत्त्वाचे मुद्दे पुढे येतात. त्यांची चर्चाही येथे केलेली नाही. उदाहरणार्थ, पर्यायी विकास म्हणजे उद्योगांना, तंत्रज्ञानाला, आर्थिक वाढीला व समृद्धीला आंधळा विरोध असा एक गैरसमज प्रचलित आहे. या चित्रावरून स्पष्ट होईल की तंत्रज्ञान, उद्योग, आर्थिक वाढ, समृद्धी या सर्वांचा पर्यावरणस्नेही व समतावादी दृष्टिकोणातून सजग व डोळस स्वीकार हे पर्यायी विकासनीतीचे महत्त्वाचे सूत्र आहे.

आर्थिक व्यवस्थेचे हे चित्रण करताना ह्या राज्यव्यवस्थेची घडण सुयोग्य असा सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय अवकाश असल्याशिवाय होऊ शकणार नाही याची स्पष्ट जाणीव असली पाहिजे. त्या दृष्टीने पर्यायी समाजरचनेचा विचार करताना आर्थिक व्यवस्थेबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक प्रबोधन व चळवळी तसेच ह्यासाठीचे राजकारण ह्यांचादेखील खोलात जाऊन विचार व त्यावर कृती करावी लागेल.

शेवटी, सदर लेख हा आमच्या संस्थेतर्फे तयार करण्यात आलेल्या पर्यायी विकास प्रतिमानावरील सविस्तर दस्तावेजावर अवलंबून आहे. (सदर दस्तावेज आमच्याशी संपर्क साधल्यास उपलब्ध करून देऊ.) सदर दस्तावेजाची निर्मिती करताना पर्यायी विकासाचे अनेक अभ्यासक व विविध चळवळींमधील कार्यकर्त्यांची भरघोस व अनमोल अशी मदत मिळाली आहे. त्या दस्तावेजामध्ये व ह्या लेखामध्ये त्या सर्वांचे मोठे योगदान आहे. त्या सर्वांची नावे येथे लिहिणे शक्य नसले तरी त्यांचे ऋण आम्ही मानतो.

❐

## पर्यायी समाजरचनेतील राजकीय व्यवस्था

कल्पना दीक्षित



### प्रस्तावना

भारतीय लोकशाहीचा सत्तावन्न वर्षांचा इतिहास पाहिला तर अनेक अंतर्विरोध समोर येतात. भारतासारख्या प्रचंड विविधता असणाऱ्या आणि आकाराने व संख्येने महाकाय अशा देशात पन्नास वर्षांहून अधिक काळ लोकशाहीचा ढाचा टिकून राहणे हीच एक उल्लेखनीय गोष्ट मानली जाते. भारताच्या विविध भागात असंतोषाचे उद्रेक घडत असले तरी सर्वसामान्यपणे भारतातील मोठ्या लोकसमूहाची येथील राजकीय व्यवस्थेला मान्यता आहे हे उघड दिसते. भारतातील लोकशाही व्यवस्थेमुळे पूर्वी काही जाती-वर्गांच्या हाती केंद्रित असणाऱ्या सत्तेचे संक्रमण विविध स्तरात आणि जातीसमूहात होण्यास मदत झाल्याचे दिसते. लोकशाही व्यवस्थेची एक मोठी उपलब्धी म्हणजे सर्वांना या औपचारिक स्वातंत्र्याचा लाभ होणे ही होय. यामुळे सरकारची धोरणे जनविरोधी होती अशा देशातील अनेक भागांत विविध चळवळींना मोठा जनाधार मिळाला. या चळवळींमधून लोकशाही व्यवस्थेतील सत्तासंबंधांना आव्हान देणारे अनेक प्रश्न उभे केले गेले.

भारतातील प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेच्या आशयाची चिकित्सा केली तर अनेक गंभीर प्रश्न समोर उभे राहतात. त्यांपैकी सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे लोकांच्या नावाने जरी येथील राज्यव्यवस्था राबविली जात असली तरी या व्यवस्थेत मोठ्या जनसमूहाचे सातत्याने होणारे सीमान्तीकरण. यामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे येथील राज्यव्यवस्थेवर बलिष्ठ समाजघटकांचा असणारा प्रभाव हे आहे. या प्रभावामुळे येथील राजकीय व्यवस्थेतील अधिकाधिक औपचारिक स्वरूपाची बनत गेली आणि त्यातील लोकांचा सहभाग व नियंत्रण जाणीवपूर्वक कमी करण्यावर या बलिष्ठ गटांनी भर दिला. लोकशाहीमध्ये महत्त्वाचे स्थान असणाऱ्या निवडणूक प्रक्रियेत धनशक्ती आणि दंड शक्ती असणाऱ्या लोकांमध्ये युती होऊन निवडणुका जिंकण्याचे एक तंत्र विकसित झाले. यामुळे सातत्याने जनसामान्यांच्या विरोधी धोरणे राबवूनही सत्ता मिळवण्यात राजकीय पक्ष यशस्वी झालेले दिसतात. राजकारणाचे झालेले गुन्हेगारीकरण हा गेल्या काही दशकांपासून चिंतेचा प्रमुख विषय बनला. या सर्व घडामोडींतून सर्वसामान्य लोकांमध्ये राजकीय प्रक्रियेविषयीचा अविश्वास वाढत जाऊन राजकीय क्षेत्राची नकारात्मक बाजू लोकांच्या मनात ठळकपणे रुजल्याचे दिसते. १९९० नंतर भारतीय राजकारणात धर्मकेंद्री विचारप्रवाहाने व्यापक पाठिंबा मिळवण्यास सुरुवात केली. यामुळे भारतीय व्यवस्थेत विद्वेषावर आधारित राजकारणाचा प्रवास वेगवान झाल्याचे आढळते.



या सर्व प्रक्रियांबरोबरच नव्वदीच्या दशकात सुरू झालेल्या उदारीकरण, जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या (उजाखा) धोरणांचे मोठे आव्हान भारतीय राजकीय व्यवस्थेसमोर उभे राहिले. जागतिक भांडवलाच्या आर्थिक सत्तेमुळे देशाच्या सार्वभौमत्वालाच मिळालेले आव्हान हा राजकीय व्यवस्थेपुढील सर्वात गंभीर प्रश्न मानता येईल.

या सर्व पार्श्वभूमीवर आपल्याला पर्यायी समाजरचनेतील राजकीय व्यवस्थेचा विचार करायचा आहे.

या विवेचनात शिरण्याआधी राजकीय व्यवस्था म्हणजे काय याची व्याख्या करणे गरजेचे आहे.

### राजकीय व्यवस्था म्हणजे काय?

राजकीय व्यवस्था म्हणजे समाजातील सार्वजनिक संबंधांचे नियमन करणारी व्यवस्था होय. या सार्वजनिक संबंधांमध्ये कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अशा सर्व अंगांचे नियमन अभिप्रेत असते. राजकीय व्यवस्थेमध्ये काही घटक औपचारिक (फॉर्मल) पातळीवर प्रत्यक्षपणे भाग घेतात. तर काही घटक अनौपचारिक (इनफॉर्मल) पातळीवर अप्रत्यक्षपणे भाग घेतात. औपचारिक पातळीवरील घटकांमध्ये प्रामुख्याने राज्यसंस्थेचा

समावेश होतो. विधीमंडळ (Legislate), कार्यकारी मंडळ (Executive) आणि न्यायमंडळ (judiciary) यांनी मिळून बनलेली शासनव्यवस्था राज्यसंस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे. (राज्यव्यवस्थेच्या इतर घटकात प्रदेश, सार्वभौमत्व आणि लोक यांचा समावेश होतो.) अनौपचारिक पातळीवरील घटकांमध्ये प्रामुख्याने राजकीय पक्ष व विविध हितसंबंधीयांचे दबाव गट कार्यरत असतात. या औपचारिक आणि अनौपचारिक पातळीवरील घटकांमध्ये प्रामुख्याने राजकीय पक्ष व विविध हितसंबंधीयांचे दबाव गट कार्यरत असतात. या औपचारिक आणि अनौपचारिक घटकांच्या परस्परसंबंधातून राजकीय व्यवस्था काम करीत असते.

कोणत्याही राजकीय व्यवस्थेच्या संदर्भात राज्यसंस्थेचा विचार अत्यंत महत्त्वाचा ठरतो. पर्यायी राजकीय व्यवस्थेचा विचार करण्यापूर्वी भारतीय राज्यसंस्थेच्या वाटचालीचा आढावा पुढील भागात थोडक्यात घेतला आहे.

## भारतीय राज्यसंस्थेची वाटचाल

राजकीय व्यवस्थेचा विचार करताना राज्यसंस्थेचे स्थान कळीचे ठरते. हे आपण पाहिले. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे राज्यसंस्थेच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण झालेले असते. त्यामुळे उपलब्ध संसाधनांच्या वाटपामध्ये राज्यसंस्थेचा हस्तक्षेप कळीचा ठरतो.



भारतीय राज्यसंस्थेने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कल्याणकारी राज्याची चौकट स्वीकारली. या चौकटीनुसार समाजातील वंचित घटकांच्या बाजूने राज्यसंस्थेने हस्तक्षेप करणे अपेक्षित होते. समाजातील दुर्बल घटकांना आर्थिक प्रक्रियेत भाग घेण्यासाठी सक्षम बनविणे आणि जे गट विविध कारणांमुळे या प्रक्रियेत सहभागी होऊ शकत नाहीत अशांना कल्याणकारी योजनांद्वारे या आर्थिक प्रक्रियेचा लाभ मिळवून देणे, ही उद्दिष्टे राज्यसंस्थेसमोर होती. थोडक्यात, विकास-प्रक्रियेत निर्माण झालेल्या संपत्तीचा झिरपा समाजात तळागाळापर्यंत व्हावा, याकरता नियोजन आणि नियंत्रण या मार्गांनी राज्यसंस्था प्रयत्न करेल, असे सांगितले गेले. प्रत्यक्षात मात्र असे दिसते की, राज्यसंस्थेवरील हितसंबंधी गटांच्या वर्चस्वामुळे या प्रक्रियेत अनेक अडथळे निर्माण केले गेले आणि अंतिमत: संपत्तीचे केंद्रीकरण केवळ काही गटांच्या हाती होईल याची काळजी घेतली गेली.

'उजाखा' धोरणांच्या अंमलबजावणीनंतर या परिस्थितीत आणखी फरक पडला आहे. आता राज्यसंस्थेने विविध क्षेत्रांतील आपल्या सक्रिय भूमिकेचा त्याग करावा यासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था आग्रही बनल्या आहेत. राज्यसंस्थेची तथाकथित कल्याणकारी भूमिकादेखील यामुळे संपुष्टात येत आहे. 'ज्याला जे परवडते ते त्याने विकत घ्यावे' अशी भूमिका राज्यसंस्था घेत आहे. 'सर्वांना सर्व सुविधा पुरविणे' ही आपली जबाबदारी नसल्याचे सूचित करायला आता राज्यसंस्थेने सुरुवात केली आहे.

कल्याणकारी क्षेत्रातील राज्यसंस्थेच्या भूमिकेप्रमाणेच कारभाराच्या क्षेत्रातही (गव्हर्नन्स) तिच्या भूमिकेत फरक पडत आहे. या भूमिकेच्या माध्यमातून राज्यसंस्था देशातील सर्वसाधारण आर्थिक व विशेषत: शेती, उद्योग, व्यापार या महत्त्वाच्या क्षेत्रांवर नियंत्रण ठेवीत असे किंवा त्याचे नियमन करीत असे. 'उजाखा' धोरणे राबविण्यास सुरुवात झाल्यानंतर विश्व बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थांच्या दबावामुळे देशाच्या कारभारप्रक्रियेत बाह्य हस्तक्षेप होण्यास सुरुवात झाली आहे. त्याचप्रमाणे राज्यसंस्थेच्या कारभारविषयक भूमिकेवर गदा येण्यास सुरुवात झाली आहे. विविध क्षेत्रांमध्ये नियमन करणाऱ्या वेगळ्या, स्वायत्त संस्था स्थापल्या जाणे, हा या प्रक्रियेचा एक भाग मानता येईल.

या पार्श्वभूमीवर पर्यायी समाजरचनेचा विचार करताना राजकीय व्यवस्थेचा आणि त्यातही राज्यसंस्थेच्या स्थानाचा विचार करणे महत्त्वाचे ठरते.

## पर्यायी राजकीय व्यवस्थेच्या दिशेने

पर्यायी समाजरचनेत राजकीय व्यवस्था कशी असेल याचे सखोल विवेचन वेगवेगळ्या विचारप्रणालींच्या मांडण्यांमध्ये केल्याचे आढळते. पर्यायी व्यवस्थेत सत्तेचे स्वरूप आमूलाग्र बदलेल आणि त्यामुळे अर्थातच राजकारणाचे आणि राजकीय व्यवस्थेचे स्वरूपही मूलगामी पद्धतीने बदलेल असे मांडले जाते.

पर्यायी रचनेच्या अंतिम टप्प्याचे चित्र रंगवताना बऱ्याचदा राज्यसंस्थेच्या विलयाचा आदर्श स्वीकारला जातो. राज्यसंस्था मूलत: दमनकारी स्वरूपाची असल्यामुळे आणि तिचा कारभार बळाच्या जोरावर चालत असल्यामुळे समाजाचे त्यावरील अवलंबित्व उत्तरोत्तर कमी होत जावे/जाईल, अशी अपेक्षा अनेक विचारप्रवाहांनी स्वीकारल्याचे दिसते. राज्यसंस्थेच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण झाले असल्याने राज्यसंस्थेच्या क्षेत्रातील व्यवस्था-परिवर्तनाच्या संघर्षास अनेक विचारप्रवाह निर्णायक महत्त्व देतात. सामाजिक व्यवहारात राज्यसंस्थेचे स्थान मध्यवर्ती स्वरूपाचे असल्यामुळे पर्यायी व्यवस्थेच्या स्थापनेसाठी राज्यसंस्था ताब्यात घेण्याची, तिचे स्वरूप बदलण्याची गरज अधोरेखित केली जाते. अनेकदा राज्यसंस्थेचे मध्यवर्ती स्थान लक्षात घेऊन सामाजिक-आर्थिक अन्यायांचे निराकरण करताना राज्यसंस्थेचा हस्तक्षेप अनिवार्य मानला जातो. मात्र त्याच वेळी राज्यसंस्था स्वरूपत: अन्याय्य असल्याने तिच्या विरोधातली कामे करणे अपरिहार्य मानले जाते. अशा प्रकारे, राज्यसंस्थेच्या सत्तेचा डावपेचात्मक वापर करीत असतानाच या सत्तेची गरज हळूहळू संपुष्टात आणण्याची कल्पना स्वीकारली जाते.

परंतु पर्यायी व्यवस्थेच्या अंतिम टप्प्याकडे जाण्याआधी काही मधले टप्पे विचारात घेण्याची गरज आहे. राज्यसंस्थेची गरज हळूहळू संपत जाण्याच्या अवस्थेपर्यंतच्या काळाला संक्रमण काळ असे मानता येईल.

या संक्रमण काळात राज्यसंस्थेची गरज अर्थातच राहील. पण हळूहळू राज्यसंस्थेचे स्वरूप बदलत न्यावे लागेल. या संक्रमण काळातील राजकीय व्यवस्था कशी असू शकेल याचे विवेचन करण्याचा प्रयत्न पुढील भागात केला आहे. एका अर्थी हे चित्र पर्यायी समाजरचनेच्या अंतिम टप्प्याविषयी नाही. मात्र अंतिम टप्प्याची मांडणी करण्याबरोबरच तिथपर्यंत पोचण्याआधीचे, संक्रमण काळाविषयीचे विवेचन अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. एकतर, सध्याची व्यवस्था अंशत: बदलण्यासाठीचे ताबडतोबीचे उद्दिष्ट अशा विवेचनामधून मिळू शकते. तसेच संक्रमण कालीन उद्दिष्टप्राप्तीच्या यशापयशाच्या अनुभवाच्या आधारे अंतिम टप्प्यातील पर्यायाची मांडणी करणे शक्य होऊ शकते. त्यामुळे या विवेचनातील सारा भर मुख्यत: संक्रमण कालीन राजकीय व्यवस्थेच्या स्वरूपावर केंद्रित ठेवला आहे.

## संक्रमणकालीन टप्प्यातील राजकीय व्यवस्था

संक्रमणकालीन टप्प्यात आपण आधी म्हटल्याप्रमाणे राज्यसंस्थेची गरज भासेल. मात्र राज्यसंस्थेवरील हितसंबंधी गटांचा प्रभाव कमी करणे आणि राज्यसंस्थेला वंचित घटकांच्या बाजूने हस्तक्षेप करण्यास भाग पाडणे, या गोष्टी संक्रमण काळासाठी आवश्यक ठरतील. संक्रमण काळातील राजकीय व्यवस्थेचे उद्दिष्ट 'प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेतील त्रुटी कमी करत नेऊन ही व्यवस्था अधिकाधिक लोकाभिमुख करणे आणि अंतिमत: राजकीय सत्ता लोकांच्या हाती प्रत्यक्षपणे येईल याकरता संरचना उभ्या करणे' असे नमूद करता येईल. लोकशाही व्यवस्थेत राज्यसंस्थेला सत्ता राबविण्यासाठी लोकांच्या अधिमान्यतेची सातत्याने गरज भासते या गोष्टीचा वापर राज्यसंस्था लोकाभिमुख बनवण्यासाठी कसा करता येईल, यावर विचार होण्याची गरज आहे. राज्यसंस्थेची दमनकारी भूमिका प्रामुख्याने समाजातील आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विषमतांच्या जोरावर आकार होत असते. संक्रमण कालीन टप्प्यावर या दमनकारी भूमिकेला आव्हान देण्यासाठी राजकीय क्षेत्राप्रमाणे इतर क्षेत्रांतील विषमतांविरुद्धची लढाई तीव्र करावी लागेल.

संक्रमण कालीन टप्प्यातील राजकीय व्यवस्थेचा विचार दोन मुख्य मुद्यांच्या आधारे करता येईल. १) विकेंद्रित राजकीय व्यवस्था, आणि २) कारभार प्रक्रियेचे लोकशाहीकरण.

### १) विकेंद्रित राजकीय व्यवस्था :

राजकीय व्यवस्थेसंबंधातील अनेक प्रश्न/समस्या तिच्या केंद्रीय रचनेमुळे निर्माण झाल्याचे आढळते. केंद्रीय स्वरूपामुळे राजकीय व्यवस्थेतील लोकांचा सहभाग कमी घेऊन या व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे लोकांसाठी अवघड बनते. केंद्रीय व्यवस्थेमुळे नियोजन आणि नियंत्रण या दोन महत्वाच्या



बाबतीतील निर्णयाचे केंद्र लोकांपासून दूर (आणि बऱ्याचदा 'तज्ज्ञांच्या' हातात) जाते. यातून निर्माण होणाऱ्या त्रुटींवर मात करण्यासाठी विकेंद्रित राजकीय व्यवस्थेचा विचार करणे आवश्यक आहे.

विकेंद्रित राजकीय व्यवस्थेकरता स्थानिक पातळीवरील राज्यव्यवस्था बळकट करत नेणे आवश्यक आहे. मात्र हे विकेंद्रीकरण म्हणजे सत्तेचे केवळ हस्तांतरण (डेलिगेशन) नसेल तर सत्ता खऱ्या अर्थाने केन्द्रीय राज्यसंस्थेच्या ताब्यातून स्थानिक स्वरूप असलेल्या व्यवस्थेकडे संक्रमित होणे गरजेचे आहे. याकरता व्याप्ती आणि खोली या दोन्ही पातळ्यांवर विकेंद्रीकरणाचे स्वरूप भरीव असावे लागेल. 

विकेंद्रित राजकीय व्यवस्थेचा विचार यापूर्वी अनेक विचारवंतांकडून मांडला गेला आहे. या स्वरूपाच्या विचारावर तीन प्रमुख आक्षेप घेतले जातात. एक म्हणजे भारतासारख्या जातीप्रधान समाजव्यवस्थेत राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण गाव-पातळीपर्यंत करणे म्हणजे त्या त्या प्रादेशिक समूहातील बलवान जातींचे वर्चस्व परत एकदा प्रस्थापित करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यासारखे आहे. दुसरा महत्त्वाचा आक्षेप म्हणजे राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक असले तरी जोपर्यंत आर्थिक सत्तेच्या नाड्या केंद्रीय व्यवस्थेच्या हातात आहेत, तोपर्यंत या विकेंद्रीकरणाला फारसा अर्थ नाही. तिसरा आक्षेप म्हणजे विकेंद्रीकरणाची भाषा आता विश्वबँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यासारख्या बड्या वित्तसंस्थाही बोलत आहेत. यामागे येथील केंद्रीय सत्तेचे स्वरूप मर्यादित ठेवण्यावर भर दिसतो. अशा परिस्थितीत या मागणीचा पाठपुरावा करायचा का असा प्रश्न उपस्थित होतो.

या आक्षेपांचा आपण क्रमाने विचार करू. पहिली गोष्ट जातीव्यवस्थेचे वास्तव भारतीय समजात आजही प्रभावी असले तरी त्याकरता राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण नको असा पर्याय स्वीकारता येणार नाही. जातीव्यवस्थेतील



शोषणाच्या संबंधाविरुद्ध संघर्ष आणि प्रबोधन अशा दोन मार्गांनी लढा उभारतानाच विकेंद्रित राजकीय सत्तेचा वापर वंचित जातींना प्रभावीपणे करता यावा याकरता नवीन मार्ग शोधण्याची गरज आहे. यामध्ये या जातींना त्यांच्या अधिकारांबद्दल जागृत करण्याबरोबरच हे अधिकार प्रभावीपणे राबवता यावेत याकरता जिल्हा वा राज्य स्तरावर नागरी समाजातील जागरुक व्यक्तींचा समावेश असलेल्या आधाराच्या संरचना (सपोर्ट स्ट्रक्चर्स) उभ्या करता येतील. या जातसमूहांचे आर्थिक सक्षमीकरण होणे हे देखील उपरोक्त अधिकार वापरता येण्यासाठी महत्त्वाचे ठरेल. याकरता आर्थिक व्यवस्थेच्या पर्यायांबाबतही विचार होणे गरजेचे ठरेल. या विचारावरील दुसरी मर्यादा आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणातून येते. हे खरेच आहे की राजकीय निर्णय प्रक्रियेचे विकेंद्रीकरण झाले तरी आर्थिक सत्तेच्या ताकदीमुळे हे निर्णय राबवण्यावर मोठी मर्यादा येऊ शकते. याकरता आर्थिक सत्तेचेही विकेंद्रीकरण व्हावे असा आग्रह धरायला हवा. आर्थिक सत्तेचे केन्द्रीय स्वरूप मोडून काढायचे असेल तर स्थानिक अर्थव्यवस्थांना मजबुती मिळाल्याखेरीज तेथून निर्माण होणाऱ्या संपत्तीत वृद्धी होणार नाही, हेही लक्षात घ्यायला हवे. याकरता आर्थिक क्षेत्रातील पर्यायी व्यवस्थेचा विचार राजकीय पर्यायाशी जोडून घेण्याची गरज आहे. शेवटी, विकेंद्रीकरणाचा अजेंडा वेगवेगळ्या हेतूंनी पुढे येत असल्यामुळे पर्यायी व्यवस्थेतील विकेंद्रीकरणाची मागणी इतरांपेक्षा गुणात्मकरित्या कशी वेगळी आहे, हे स्पष्ट करून सांगणे आवश्यक आहे. पर्यायी व्यवस्थेत विकेंद्रित राजकीय व्यवस्थेची जी मांडणी केली जाते, त्यामागे या सत्तासंरचना लोकांच्या शक्य तितक्या जवळ असाव्यात असे उद्दिष्ट असते. याद्वारे अधिकाधिक लोकांना सत्तेमध्ये सहभागी करून घेऊन, राजकीय सत्तेचे केंद्र विस्तारत अंतिमतः सत्ता वापरण्याचा अधिकार लोकांना मिळावा असा उद्देश असतो. सध्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून विकेंद्रीकरणाची जी मागणी पुढे रेटली जाते त्यामागे सत्ता लोकांच्या हाती जावी असा उद्देश अर्थातच नसून राज्यसंस्थेची कामे हळूहळू इतर संस्थांच्या ताब्यात देणे. (उदा. स्वतंत्र नियामक आयोग) आणि केंद्रीय सत्ता दुर्बल बनवणे, असा उद्देश दिसतो. विकेंद्रीकरणाच्या अशा मागणीला विरोध करून पर्यायी आशय असणारी विकेंद्रित व्यवस्था आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

राजकीय व्यवस्थेच्या विकेंद्रित स्वरूपातील एक प्रमुख घटक नियोजन-प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करणे हा असेल. आज केंद्रित नियोजन पद्धतीमुळे स्थानिक लोकसमूहांच्या इच्छा, आकांक्षा यांना दुय्यम स्थान मिळून त्यांच्यासाठी विकासमार्ग आखण्याचे काम तज्ञ मंडळीकडून केले जाते. या तज्ञ मंडळीमुळे बऱ्याचदा रूढ विकासाचे एकमेव प्रतिमान आदर्श म्हणून असते. त्यामुळे सर्व ठिकाणची नैसर्गिक संसाधने 'बृहत आर्थिक वाढीच्या' एकमेव उद्देशाने वापरली जातात. निरनिराळ्या स्थानिक लोकसमूहांचे नैसर्गिक संसाधने वापरण्याचे पारंपारिक हक्क मोडीत काढून, त्यांच्या सध्याच्या उपजीविका उध्वस्त करून त्यांना रूढ विकासाच्या ढाच्यात बसविण्यासाठी नियोजनाचे प्रयत्न होतात. अशा केंद्रीय पातळीवरील नियोजनाच्या प्रक्रियेची विफलता आता पुरेशा प्रमाणात स्पष्ट झाली आहे. त्यामुळे पर्यायी व्यवस्थेसाठी नियोजनाची विकेंद्रित प्रक्रिया आवश्यक आहे. याकरता नियोजनाच्या प्रक्रियेत स्थानिक लोकांचा सहभाग असेल अशा प्रकारच्या नवीन संरचना उभ्या करणे आवश्यक ठरेल. या नवीन संरचनांमध्ये स्थानिक पातळीवरील बलिष्ठ गटांचा प्रभाव राहू नये याकरता वंचित जातीसमूह, स्त्रिया यांच्या सहभागासाठी खास तरतूद करावी लागेल.

**कारभार प्रक्रियेचे लोकशाहीकरण :** विकेंद्रित राजकीय व्यवस्थेबरोबरच संक्रमणकाळातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'कारभार-प्रक्रियेचे (गव्हर्नन्स प्रोसेस) लोकशाहीकरण करणे हा होय. आज अनेक आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था विविध देशाच्या चांगल्या कारभाराच्या (गुड गव्हर्नन्स) मुद्द्यावर प्रामुख्याने भर देत आहेत. या संस्थांनी स्वीकारलेली कारभाराची व्याख्या आणि त्यामागील त्यांचे हेतू याबाबत सविस्तर विवेचन करणे सदर लेखाच्या मर्यादेत शक्य नाही. मात्र या संस्था (आणि भारतातीलही काही अग्रगण्य संस्था) मांडत असलेल्या 'ई-गव्हर्नन्स' पेक्षा येथे मांडलेला मुद्दा संपूर्णतः भिन्न आहे. हे मुद्दाम नमूद करावयास हवे.

कोणत्याही प्रकारच्या कारभारात तीन गोष्टींचा मुख्यतः समावेश होतो. १) निर्णय घेणे (decision - making ) २) निर्णयाची अंमलबजावणी करणे (implementation of the decision) ३) वरील दोन्ही कृती नियमाप्रमाणे होत आहेत की नाहीत यावर नियमन ठेवणे (regulation). सध्याच्या राजकीय व्यवस्थेत या तीनही गोष्टी केंद्रीय पद्धतीने, लोकांच्या सहभागाशिवाय आणि लोकांपासून अतिशय दूर अशा ठिकाणी घडत असतात. उदा. एखाद्या गावासाठी विकासाची योजना राबवण्याची प्रक्रिया पाहता येईल. गावाचा विकास कसा घडवायचा, त्यासाठी कोणती संसाधने, निधी, मनुष्यबळ लागेल या सर्व गोष्टींबाबत निर्णय घेणे, ही पहिली पायरी

झाली. यानंतर या निर्णयाप्रमाणे विकासाची योजना तयार करून ती एखाद्या गावात प्रत्यक्ष राबवणे ( उदा. या योजनेसाठी लोक निवडणे. त्यांना निधी उपलब्ध करून देणे इ.) ही दुसरी पायरी होय. या सर्व प्रक्रिया नियमानुसार पार पडत आहेत, त्यामध्ये कोठे गैरव्यवहार होत नाही, हे पाहणे ही या प्रक्रियेची तिसरी पायरी होय.

पर्यायी व्यवस्थेत कारभाराच्या या तीन्ही प्रक्रियांचे लोकशाहीरकरण घडून येणे आवश्यक आहे. म्हणजे ज्या लोकांसाठी विकासयोजना तयार केली जाते त्या लोकांचे, निर्णय प्रक्रिया, निर्णयाची अंमलबजावणी आणि या दोन गोष्टींचे नियमन या तीनही प्रक्रियांवर नियंत्रण असणे गरजेचे आहे. असे झाले तरच खऱ्या अर्थाने राजकीय सत्ता लोकांपर्यंत पोचवयाची सुरुवात होऊ शकेल.

अशा तऱ्हेने शासनाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी वाडी-वस्तीच्या, गावाच्या, तालुक्याच्या अशा विविध स्तरांवर स्थानिक लोक आणि त्या त्या विषयातील जाणकार यांची समिती स्थापन करता येईल. या समितीत वंचित जाती आणि स्त्रिया यांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल याची काळजी घ्यावी लागेल. या समित्यांमार्फत गावासाठीच्या विकास-योजनेपासून ते अगदी गावपातळीवर सरकारी क्षेत्राचा जिथे जिथे संबंध येतो त्या सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवण्याचे काम करता येईल. अशा प्रकारे कारभारावरील नियंत्रणासाठी 'माहिती-संवाद-तंत्रज्ञानाचा' (कन्फर्मेशन कम्युनिकेश टेक्नोलॅजी) प्रभावी वापर करून घेता येणे शक्य आहे. अशा प्रकारे प्रतिनिधिक लोकशाहीमधील त्रुटींवर मात करून लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असणाऱ्या राजकीय व्यवस्थेकडे वाटचाल करण्याची सुरवात अशा प्रयत्नांतून होऊ शकेल.

कारभार-प्रक्रियेवर लोकांचे प्रभावी नियंत्रण असण्यासाठी शासनाच्या कारभारात पारदर्शकतेचे आणि उत्तरदायित्वाचे तत्त्व असणे आवश्यक ठरेल. आज शासकीय कारभारात शिरलेल्या अनेक विसंगती आणि हितसंबंधी गटांचे कारभारावरील वर्चस्व याला आव्हान द्यायचे असेल तर शासनाच्या कारभारात पारदर्शकतेचा आग्रह धरायला हवा. शासनाची निर्णयप्रक्रिया आणि अंमलबजावणीची प्रक्रिया, त्यातील कारणमीमांसेसह लोकांच्या अवलोकनार्थ खुली असली पाहिजे. त्यायोगे नागरी समाजातील विविध गट, चळवळी,जनसंघटना यांच्या हाती शासनाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपयुक्त हत्यार मिळेल असे वाटते.

पारदर्शकतेच्या तत्त्वाबरोबरच महत्त्वाचे दुसरे तत्त्व म्हणजे उत्तरदायित्वाचे होय. आज शासनाच्या कारभारात जनहिताला घातक ठरणाऱ्या निर्णयासाठी उत्तरदायित्वाची औपचारिक पद्धत अस्तित्वात असली तरी त्यामध्ये अनेक त्रुटी आहेत. त्यामुळे हितसंबंधी गटांच्या वर्चस्वाखाली अनेक जनहितविरोधी निर्णय राजरोस घेतले जातात. याला पायबंद घालण्यासाठी ज्यांच्या हाती निर्णय घेण्याचे, तसेच कायदे, धोरण ठरविण्याचे अधिकार आहेत त्यांनी घेतलेल्या निर्णयाच्या परिणामांसाठी त्यांना जबाबदार धरले जाणे व त्या परिणामांचा त्यांनी लोकांना जाब देणे आवश्यक आहे.

तिसरे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे लोकसहभागाचे होय. कायदे, धोरणे आणि निर्णय ठरवण्याच्या प्रक्रिया, तसेच अंमलबजावणीच्या व त्यावरील नियमनाच्या प्रक्रिया, या सर्वांमध्ये लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असणे आवश्यक आहे. कार्यकारी मंडळ आणि नोकरशाहीच्या अनेकविध घटकांचा कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी या घटकांच्या कामात प्रत्यक्ष सहभागी होऊन त्यांवर आपला प्रभाव टाकणे, सामान्य लोकांना शक्य झाले पाहिजे. लोकांच्या अशा प्रकारच्या सहभागातूनच त्या त्या ठिकाणचे प्रश्न पुढे येतील आणि त्यावर ठोस उपाययोजना करणे शक्य होईल.

अशा तऱ्हेने कारभार-प्रक्रियेचे लोकशाहिकरण झाले तर आज नोकरशाही व्यवस्थेत हितसंबंधी गटांचे जे वर्चस्व तयार झाले आहे ते कमी होण्यास मदत होईल.

संक्रमणकालीन व्यवस्थेत राजकीय पक्षांचे स्वरूपही बदलेल. संक्रमणकाळात राजकीय पक्षांची गरज असेल. परंतु निर्णयाचे केंद्र लोकांच्या जवळ असेल आणि निर्णय प्रक्रियेत लोकांचा खराखुरा सहभाग असेल. आज राज्य चालवण्याच्या अनेक बंधनांपैकी एक मोठे बंधन निवडणुका लढविणे व त्याकरता लागणारा पैसा उभा करणे हे आहे. कारभार प्रक्रियेचे लोकशाहीकरण झाले तर शासनाचा कारभार लोकांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली येऊन अशा प्रकारांना पायबंद बसू शकतो.

**समारोप**

पर्यायी रायकीय व्यवस्थेच्या संक्रमणकालीन उद्दिष्टाकडे वाटचाल करण्यासाठी काय करता येईल याचे थोडक्यात विवेचन करण्याचा प्रयत्न येथे केला आहे. हा संक्रमणकालीन टप्पा एकमेव असेल असा सुचविण्याचा अर्थातच उद्देश नाही. संक्रमणकाळातील उद्दिष्टाची यापेक्षा वेगळी मांडणीदेखील करता येईल.

तसेच पर्यायी राजकीय व्यवस्थेचा विचार करताना पर्यायी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व्यवस्थांवरही एकाचवेळी काम करावे लागेल, हे लक्षात घ्यायला हवे. आर्थिक क्षेत्रातील आजची परिस्थिती कायम ठेऊन राजकीय पर्याय अस्तित्वात येणार नाही हे उघड आहे. पर्यायी रायकीय व्यवस्थेच्या वाटचालीमध्ये जनसंघटना, चळवळी आणि सर्वसामान्य लोक प्रमुख भूमिका बजावतील, अशी अपेक्षा आहे. याकरता चळवळींना आपल्या व्यूहनीतीमध्ये पर्यायी राजकीय व्यवस्थेच्या उद्दिष्टांप्रत जाणाऱ्या विविध प्रयोगांवर काम करावे लागेल असे वाटते. ❐


# समाज विज्ञान अकादमी

अभय कांता

आणीबाणी जाहीर होण्यापूर्वीचा काळ. देशात बरीच खळबळ सुरू होती. दुष्काळ, महागाई, भ्रष्टाचार, शासकीय अंदाधुंदी, तत्त्वशून्य सत्ताभिलाषा या सर्व अपप्रवृत्तींना ऊत आला होता. रेल्वे कामगार संपासह अनेक क्षेत्रांत कामगार चळवळ धडका मारत होती तरी समाजपरिवर्तनाच्या व्यापक ध्येयाशी तिचा सांधा जुळत नव्हता. यातून येणारे आर्थिक यशही अपुरे होते. डावी चळवळ वैचारिक-राजकीय मतभेदांमुळे दुभंगलेली होती. अनेक आंदोलने संघटित होत होती, पण ती देशभर विखुरलेली होती. त्यांच्यात निश्चित दिशेबाबत संभ्रमावस्था होती. देशातील अशा सर्वस्पर्शी अस्थिरतेतून आणि राजकीय अरिष्टातून मार्ग काढायचा तर अनेक अंगांनी प्रयत्न आवश्यक होते. त्यामध्ये वैचारिक सुस्पष्टतेच्या आधारावर चर्चा घडवून आणणे आणि आंदोलनकारी संघटना-शक्तींना त्याचा लाभ मिळणे आवश्यक होते. वास्तवाला भिडणाऱ्या पण शास्त्रीय पायावर समग्र दृष्टिकोनातून घडवल्या जाणाऱ्या तात्त्विक मंथनाची गरज होती.

ही गरज लक्षात घेऊन अर्थतज्ज्ञ (दिवंगत) प्रा. व्ही. वाय. कोल्हटकर, राजकीय नेते (दिवंगत) र. के. खाडीलकर, (दिवंगत) बॅ. रजनी पेटल, डॉ. सुलभा ब्रह्मे, (दिवंगत) ॲड्. एम. पी. मोरे, बॅ. मोहन पुंगलिया, शंकरराव खरात, (दिवंगत) एम. जी. पवार, (दिवंगत) जयंतराव टिळक, उद्योजक (दिवंगत) फाजल लालजी, सामाजिक कार्यकर्ते सी.एस. नातू इत्यादी नामवंत समाजधुरीण एकत्र आले. त्यांनी 'ॲकडमी ऑफ पोलिटिकल ॲंड सोशल स्टडीज' या संस्थेची १९७४ मध्ये स्थापना केली. पुढे 'समाज विज्ञान अकादमी' या सुटसुटीत मराठी-हिंदी नावाने ती ओळखली जाऊ लागली.





'भारतामध्ये धर्मनिरपेक्ष व समाजवादी समाज निर्माण करण्यासाठी नागरिकांना लोकशाही राजकीय प्रक्रियेत क्रियाशील सहभागासाठी जागृत व प्रशिक्षित करणे आणि त्या दृष्टीने नवे नेतृत्व निर्माण व्हावे यासाठी विविध प्रकारे प्रबोधन करणे' हे मुख्य उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून अकादमीने काम सुरू केले. अकादमीने प्रथमपासूनच विविध परिवर्तनवादी विचारप्रवाह आणि चळवळी या एकत्र याव्यात अशी दृष्टी ठेवली आहे. त्यासाठी विषयांचे वैविध्य व व्याप्ती वाढवण्याचा आणि कार्यक्रमांत विविध संघटना-व्यक्तींचा सहभाग मिळविण्याचा प्रयत्न तर केला आहेच, पण महत्त्वाचे म्हणजे अशा एकत्रीकरणासाठी वैचारिक-सैद्धांतिक पातळीवरील मांडणीचेही सातत्याने प्रयत्न केले आहेत.

सुरुवातीला १९७४ ते १९७७ या काळात चर्चासत्रे, व्याख्याने, परिसंवाद या स्वरूपाचे काही कार्यक्रम झाले. त्यानंतर संस्था चालवण्याच्या पद्धतीबाबत काही कायदेशीर वाद उपस्थित झाल्यामुळे अकादमीचे काम १९८२ पर्यंत होऊ शकले नाही. याबाबत स्पष्ट कायदेशीर निर्णय मिळाल्यानंतर १९८२-८३ पासून रीतसर काम सुरू झाले व त्यामध्ये श्री. सुधीर बेडेकर व दत्ता देसाई यांनी पूर्ण वेळ देऊन पुढाकार घेतला.

गेली २२ वर्षे अकादमीचे विविध कार्यक्रम व उपक्रम सुरू असून वेळोवेळी ते महाराष्ट्रातील २५ हून अधिक जिल्ह्यांमध्ये घेतले गेले आहेत.



या कार्याचा भर हा राज्यातील, उपेक्षित विभाग आणि गरीब, शोषित व सर्वसामान्य जनता यांच्यापर्यंत वैचारिक जागृतीची प्रक्रिया पोहचावी असा राहिला आहे. तसेच तत्कालिक संदर्भ लक्षात घेऊन महाराष्ट्राच्या आणि देशाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असे मूलभूत, वैचारिक व सैद्धांतिक विषय हाती घेतले आहेत.





**समाजपरिवर्तनासाठी अभ्यास व संशोधन**

अकादमीने चळवळीच्या व परिवर्तनाच्या गरजा डोळ्यांसमोर ठेवूनच आजवर काही अभ्यास व संशोधन केले आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील दुष्काळ, गॅट करार, जागतिकीकरणाचे परिणाम यांसारख्या विषयांवर वेळोवेळी अभ्यास हाती घेतले आहेत. मात्र त्यांचा प्रमुख उद्देश धोरणात्मक स्पष्टता, व्यापक मंथन व प्रबोधन साधणे हा असतो. अलीकडच्या काळात अधिक पद्धतशीरपणे अभ्यास करण्याचे धोरण अकादमीने स्वीकारले आहे. त्यानुसार गेल्या वर्षीपासून 'जागतिकीकरण व महाराष्ट्रातील पाण्याचे राजकारण' आणि या वर्षी 'ग्रामीण महाराष्ट्रातील सामाजिक-सांस्कृतिक विकास: काही प्रयोगांचा जनवादी अभ्यास' या दोन अभ्यास प्रकल्पांचे काम सुरू आहे. या दोन्ही प्रकल्पांना आगरकर विचार व्यासपीठाचे काही आर्थिक साहाय्यही मिळाले आहे.



**विचारवंत व कार्यकर्त्यांच्या सहभागाने धोरणात्मक समीक्षा आणि वैचारिक मंथन**

धोरणात्मक समीक्षा आणि वैचारिक मंथन हे केवळ 'ॲकडॅमिक' राहू नये तर विचारवंत आणि कार्यकर्ते यांच्या सहभागाने घडावे अशी दृष्टी अकादमीने ठेवली आहे. आजवर संस्थेने राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर २७ चर्चासत्रे व परिसंवाद आयोजित केले आहेत. यातून एका बाजूला विविध विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन संस्था, स्वयंसेवी संस्था आणि संघटना यांमधील मान्यवर अभ्यासक, विचारवंत, तज्ज्ञ व संशोधक, तर दुसऱ्या बाजूने प्रत्यक्ष लोकांमध्ये आणि तळागाळात काम करणारे कार्यकर्ते हे एकत्र आणण्याचे महत्त्वाचे काम केले जाते. यामध्ये विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्व विचारवंत-अभ्यासकांनी अत्यल्प प्रवास खर्चात (व कोणत्याही मानधनाची अपेक्षा न ठेवता) अकादमीच्या या कार्यात पूर्ण सहभाग दिला आहे. यामुळे -

१. समाजापुढील विविध प्रश्न तसेच विषयांबाबत (उदाहरणार्थ, दुष्काळ व त्याचे निर्मूलन, जमीन वाटपाचे धोरण-यशापयश, ग्रामीण विकासाचे प्रश्न व गरिबांचे अधिकार, जातीय तसेच लैंगिक विषमताविरोधी सामाजिक सुधारणा, विज्ञान-तंत्रज्ञानाचा लोकोपयोगी वापर, स्वयंनिर्भर आर्थिक विकास, बदलत्या परिस्थितीत विविध विचारसरणी, इत्यादी) विचारविनिमय करून त्यावर उपाय आणि पर्याय शोधण्याची प्रक्रिया गतिमान व सखोल होताना दिसते, तसेच

२. विचारवंत, अभ्यासक आणि तज्ज्ञ हे कार्यकर्त्यांशी होणाऱ्या संवादातून अधिकाधिक लोकाभिमुख होण्यास तसेच तज्ज्ञांकडील अद्ययावत अभ्यास व चिंतनाच्या आधारे कार्यकर्त्यांची समज सखोल व शास्त्रीय होण्यास मदत होते.

मात्र विविध सामाजिक-राजकीय घडामोडी तसेच शासकीय धोरणे इत्यादीबाबत स्वत:ची म्हणून भूमिका अकादमीने वेळोवेळी मांडावी अशी अपेक्षा बऱ्याचदा व्यक्त केली जाते. अकादमीकडून हे काम आजवर फारसे झालेले नाही. ते होण्याची गरज आहे.

**नव्या नेतृत्वनिर्मितीसाठी कार्यकर्त्यांचे वैचारिक प्रशिक्षण**

महाराष्ट्रातील २५हून अधिक जिल्ह्यांत शहरे तसेच तालुकापातळीवर १३१ अभ्यास शिबिरे घेतली आहेत. प्रामुख्याने ग्रामीण युवक, शेतकरी-शेतमजूर, अंगणवाडी कार्यकर्त्या, असंघटित क्षेत्रातील कामगार कार्यकर्ते, महिला कार्यकर्त्या, वैद्यकीय प्रतिनिधी-बँक-विमा-औद्योगिक कामगार असे संघटित क्षेत्रातील कार्यकर्ते, आदिवासी कार्यकर्ते तसेच विज्ञान व सांस्कृतिक चळवळीतील कार्यकर्ते अशा विविध स्तरांतील कार्यकर्त्यांची २ ते ८ दिवसांची अभ्यास शिबिरे भरवली आहेत. यामध्ये त्या त्या समाजघटकाचे तसेच व्यापक परिवर्तनाचे विविध विषय वेळोवेळी हाताळले गेले आहेत. त्यातही दुष्काळ निर्मूलन, नवीन आर्थिक धोरण, जमातवाद आणि फुले-आंबेडकर शताब्दी यांचा विशेष उल्लेख करता येईल.

शिबिरांमुळे कार्यकर्त्यांची वैचारिक समज व प्रचलित प्रश्न वस्तुनिष्ठपणे समजून घेण्याची क्षमता वाढते आणि समाजाची विविध अंगे, विविध प्रश्न आणि विविध चळवळी यांचा परस्परसंबंध आणि त्यातील गुंतागुत यांचे भान येते. यामुळे हे कार्यकर्ते आपापल्या क्षेत्रात आणि लोकांमध्ये अधिक प्रभावीपणे व परिपक्वतेने काम करू शकतात. पंचायतपातळीपासून विविध लोकशाही संस्थांच्या पातळींवर लोकांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यास ते मदत करतात. लोकांच्या हक्कांसाठी आणि योग्य धोरणांसाठी संघर्ष करत असतानाच शिक्षण संस्था, वसतिगृहे, शेती व विज्ञानविषयक प्रयोग,

सहकारी संस्था उभारणी अशी कामे अनेक ठिकाणी हे कार्यकर्ते करत आहेत. परंतु हे काम एक चळवळ म्हणून मोठ्या प्रमाणावर वाढण्याची तसेच त्याची चळवळीच्या अन्य अंगाशी योग्य सांगड घालण्याची गरज आहे.

अशा शिबिरांचा बहुतांश आर्थिक भार तसेच संयोजनाची जबाबदारी जागोजागी स्थानिक कार्यकर्ते अत्यंत उत्साहाने व पोटतिडकीने उचलतात. यासाठी लागणारी मदत लोकांकडून पैशांच्या तसेच वस्तूंच्या रूपात गोळा केली जाते.

या शिबिरांव्यतिरिक्त अन्य अनेक संघटनांना त्यांच्या शिबिरांची आखणी, विषय-वक्ते व मांडणी यामध्ये अकादमी वेळोवेळी मदत करते. शिबिरांमुळे संघटना व चळवळी वैचारिकदृष्ट्या बळकट होण्यास मदत होत असल्याने अनेक संघटना अकादमीच्या संपर्कात असतात.

येत्या काळात एक 'स्रोत-केंद्र' (Resource Centre) निर्माण करून त्याद्वारे शास्त्रीय व सहभागावर आधारित कार्यकर्ता प्रशिक्षण पद्धती विकसित करणे गरजेचे आहे. तसेच नव्या परिस्थितीतील वैचारिक आव्हाने पेलण्यासाठी शैक्षणिक व संदर्भ साहित्य निर्माण करणे आवश्यक आहे. विशेषत: नव्या, युवा कार्यकर्त्यांमधून प्रबोधक/प्रशिक्षक तयार करण्याची आत्यंतिक निकड आहे. तसेच नव्या सामाजिक चळवळी, स्वयंसेवी संस्था व विविध विचारप्रवाहांची पुरोगामी व्यासपीठे यांच्यासह अधिकाधिक कार्यकर्त्यांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. विशेषत: बदलत्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिस्थितीचे आकलन विकसित करण्यासाठी व्यापक प्रयत्नांची गरज जाणवते आहे.

### व्यापक लोकजागृतीसाठीचे कार्यक्रम

अकादमीने विविध तज्ज्ञांची व्याख्याने व चर्चात्मक कार्यक्रम मुख्यत: पुण्यात तसेच सोलापूर, कोल्हापूर अशा ठिकाणीही घेतले आहेत. आजवर अशी १३३ व्याख्याने झाली असून यातील मार्क्स शताब्दी, डी.डी. कोसंबी व गं. बा. सरदार स्मृती व्याख्यानमाला यांसारख्या काही व्याख्यानमाला अत्यंत प्रभावी ठरल्या. सामाजिक-राजकीयदृष्ट्या गुंतागुंतीच्या व महत्त्वाच्या विषयांवर योग्य वेळी घडवले जाणारे विचारमंथन हे प्रश्न पद्धतशीरपणे समजून घेण्यास व योग्य भूमिका घेण्यास खूप उपयुक्त ठरते, अशा लोकांच्या





प्रतिक्रिया आहेत. मात्र त्याच वेळी बदलत्या परिस्थितीनुरूप नव्या वैचारिक प्रश्नांविषयी अभ्यासपूर्ण मांडणी करणाऱ्या वक्त्यांची आणखी मोठ्या प्रमाणावर गरज आहे, हेही जाणवते आहे. त्या दृष्टीने विविध संशोधन व अभ्यास संस्था आणि तज्ज्ञ व्यक्ती यांच्याशी सतत संवाद ठेवून पुरोगामी विचारांच्या वक्त्यांचे संख्याबळ व वैविध्यता वाढविण्याची गरज आहे.

### अभ्यासपूर्ण प्रकाशने व वैचारिक साहित्य

अकादमीने स्वत: आजवर १० पुस्तके व पुस्तिका प्रकाशित केलेल्या आहेत. त्यांमध्ये प्राध्यापक डी. डी. कोसंबी यांचे 'सायन्स, सोसायटी आणि पीस' हे पुस्तक गाजले असून याव्यतिरिक्त काही पुस्तिका संकलित अभ्यास स्वरूपाच्या आहेत तर काही अभ्यासपूर्णरीतीने लिहिलेल्या स्वतंत्र पुस्तिका आहेत. उदाहरणार्थ, (१) नव्या आर्थिक धोरणांचे संकट आणि स्वावलंबी शेतीविकास (२) कांशीराम यांचा बहुजनवाद (३) आरोग्यासाठी विकासनीतीचा पुनर्विचार (४) पर्याय असताना एन्रॉनचे आक्रमण कशासाठी? (५) गोवंश हत्याबंदी. तसेच अकादमीच्या चर्चासत्राच्या व अभ्यासाच्या आधारे तयार झालेले 'महाराष्ट्रातील दुष्काळ' हे पुस्तक मागोवा प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे. या पुस्तकांनी कार्यकर्त्यांनाच नव्हे तर अभ्यासकांनासुद्धा अनेक विषयांवरील शास्त्रीय व समग्र पद्धतीची मांडणी उपलब्ध करून दिली आहे. अशा प्रकारच्या अधिक पुस्तकांची व प्रकाशनांची सातत्याने मागणी आहे. याशिवाय प्रा. एजाज अहमद यांच्या लेखांवर आधारित 'क्रांत्यांचे शतक' आणि श्री. दत्ता देसाई यांचे 'जलयुद्ध की जलक्रांती?' ही दोन नवी पुस्तके अकादमीच्या माध्यमातून तयार झाली असून ती 'लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई' यांच्यामार्फत प्रकाशित झाली आहेत. तसेच अकादमीच्या वतीने हाती घेतलेल्या अभ्यासातून दत्ता देसाई यांनी लिहिलेल्या 'जागतिकीकरणाच्या जमान्यात शाश्वत विकास' व 'पाणी, दुष्काळ आणि विकास' या दोन पुस्तिका समाजवादी प्रबोधिनी (इचलकरंजी) या संस्थेने प्रकाशित केल्या आहेत.




### दुर्मिळ व निवडक पुस्तकांचे व संदर्भ साहित्याचे ग्रंथालय

अकादमीच्या ग्रंथालयात ५,८०० हून अधिक पुस्तके, २,५५० हून अधिक पुस्तिका, ५० नियतकालिके व अन्य संदर्भ साहित्य, असे अत्यंत दर्जेदार, वैचारिक साहित्य उपलब्ध आहे. यातील सुमारे निम्मी पुस्तके ही नामवंत अभ्यसकांनी व बांधीलकी मानणाऱ्या व्यक्तींनी उदारहस्ते अकादमीस देणगी दिली आहेत. या सुविधेचा अभ्यासू कार्यकर्त्यांना तसेच विद्यार्थी युवकांना खूपच उपयोग होतो. सभागृहामध्ये सर्वांना या सुविधेचा मोफत वापर करता येतो. तर अत्यंत नाममात्र शुल्क घेऊन पुस्तक देवघेवीची सोय करण्यात आली आहे. येत्या काळात हे ग्रंथालय व संदर्भ विभाग अधिक पद्धतशीरपणे विकसित करण्याचा मानस आहे.

### युवा पिढीचे अभिनव व्यासपीठ

गेली ६ वर्षे अकादमीने विशेषत: महाविद्यालयीन युवक-युवतींमध्ये वैचारिक देवघेव जागृती वाढावी यासाठी 'चौकशा' युवा व्यासपीठ हा उपक्रम सुरू केला असून त्याला सर्व प्रकारचे साहाय्य उपलब्ध करून दिले जाते. या व्यासपीठावरून व्याख्याने, चर्चा, छोटे पाहणी अभ्यास व सहली, स्लाईड-शो व फिल्म इत्यादी माध्यमांतून सद्यकालीन व ज्वलंत विषयांवर प्रबोधन व मंथन घडवले जाते. असे ८६ हून अधिक कार्यक्रम झालेले असून त्यांमध्ये किमान ३०-४० ते ७०-८० विद्यार्थी-विद्यार्थींनी सहभागी होतात. यामधून वैचारिक काम करू इच्छिणाऱ्या तसेच तरुणांमध्ये प्रबोधनाचे काम करणारा २०-२५ कार्यकर्त्यांचा एक गटही कार्यरत झाला आहे. पुणे शहरात महाविद्यालयीन जिज्ञासू व संवेदनाशील विद्यार्थी-विद्यार्थीनींना पुरोगामी वैचारिक कामांत सातत्याने क्रियाशील ठेवणारे व्यासपीठ म्हणून 'चौकशा' हे ओळखले जाते. हे व्यासपीठ युवा कार्यकर्त्यांच्या गटातर्फे स्वायत्तपणे चालवले जाते.





**विज्ञान-साक्षरता चळवळीच्या उभारणीस भक्कम आधार**

अकादमीने महाराष्ट्रात ज्ञानविज्ञान चळवळ व साक्षरता अभियान विकसित होण्यासाठी लक्षणीय मदत केली आहे. १९८९ ते १९९३ आणि १९९६ ते २००२ या काळात भारत ज्ञानविज्ञान समिती/समुदाय या संघटनेचे राज्य कार्यालय अकादमीच्या जागेतून चालवले जात असे. १९९६ ते २००२ या काळात अकादमीचे सचिव दत्ता देसाई हे ज्ञानविज्ञान संघटनेच्या उभारणीचे काम करण्यासाठी राज्य सरचिटणीस म्हणून जवळ जवळ पूर्णवेळ उपलब्ध केले गेले होते. याबरोबरच या संघटनेसाठी व प्रकाशनांसाठी अकादमीचे श्री. गणेश कांबळे तसेच कार्यालयीन सुविधा उपलब्ध करून दिली गेली होती. महाराष्ट्रात आज १२-१३ जिल्ह्यांमध्ये या संघटनेचे काहीएक काम उभे राहण्यामध्ये अकादमीचे हे योगदान मोलाचे आहे. अकादमीचे दत्ता देसाई यांनी सन २००० पासून ३ वर्षे 'जनआरोग्य अभियान' या व्यासपीठाचे राज्य समन्वयक म्हणूनही काम केले आहे. समाजविज्ञान अकादमीचे उद्दिष्ट गरीब, कष्टकरी व उपेक्षित जनविभागांच्या हितासाठी काम करणे व एकंदर समाजात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणे हे असल्यानेच अकादमीने या कामामध्ये विशेष रस घेतला.



**विविध सामाजिक चळवळींना सहकार्य**

वर उल्लेखलेल्या कामांव्यतिरिक्त गेल्या १९ वर्षांत अकादमीने आपले शहीद भगतसिंग सभागृह व ग्रंथालय विविध महिला, कामगार-कर्मचारी, विद्यार्थी संघटना तसेच पर्यावरण, संस्कृती, आरोग्य या क्षेत्रांतील चळवळी आणि अन्य व्यासपीठांना सातत्याने उपलब्ध करून दिले आहे. हे सभागृह बहुतांश वेळा विनामूल्य व काही वेळा नाममात्र शुल्क घेऊन सामाजिक-शैक्षणिक उपक्रम, व्याख्याने, बैठक शिबिरे, कार्यशाळा, अभ्यासवर्ग, यासाठी उपलब्ध करून दिले आहे. पुण्यातील सर्व पुरोगामी चळवळी व संघटनांना वेळोवेळी याचा उपयोग झाला आहे. याव्यतिरिक्त अकादमीचे विश्वस्त व कार्यकर्ते हे नेहमीच असंख्य सामाजिक उपक्रमांना व संघटनांना अकादमींच्या माध्यमातून विविध प्रकारे साहाय्यभूत होत आले आहेत.

श्री. गं. प. नेने (अध्यक्ष), श्री. दत्ता देसाई (विश्वस्त सचिव), श्री. सुधीर बेडेकर, डॉ. सुलभा ब्रह्मे, श्री. कुमार शिराळकर, डॉ. ज. रा. शिंदे, प्रा. गो. पु. देशपांडे, डॉ. गोपाळ गुरू, प्रा. अजित अभ्यंकर, डॉ. भालचंद्र कानगो, प्रा. शरद नावरे हे अकादमीचे विश्वस्त म्हणून सध्या काम पाहत आहेत.

बदलती सामाजिक परिस्थिती, राजकीय क्षेत्रातील साचलेपण आणि वैचारिक क्षेत्रातील कोंडी यांचा परिणाम वेळोवेळी अकादमीच्या कार्यावरही होत आला आहे. मात्र चाकोरीबाहेरील प्रयत्नांना आणि विचारांना काही एक प्रतिसाद निश्चितपणे मिळतो असेही दिसले आहे. या पार्श्वभूमीवर शास्त्रीय सचोटी, वैचारिक बांधिलकी आणि स्वच्छ नैतिकता जागवत प्रबोधनाचे काम चालू ठेवण्याचा अकादमीचा प्रयत्न नक्कीच लक्ष वेधून घेणारा आहे. ❐

# 'मासूम' नावाचं मुक्त विद्यापीठ

**अंजली मुळे**

''मी बघा काहीतरी दुसरी-तिसरी शिकलेली. मला लिहिता येत नाही; पण मनीषाताई भेटल्या आणि माझं सगळं आयुष्यच बदलून गेलं. मी वाचायला, सही करायला शिकले आणि 'मासूम'ने तर मला डॉक्टरच करून टाकलं बघा.'' 'मासूम'मधल्या नानी सांगत होत्या.

'मासूम' संस्थेचं आरोग्यक्षेत्रात मोठं काम आहे. त्यामुळे मनीषाला आधी सगळे डॉक्टरच समजतात. प्रत्येक वेळी तिला हे स्पष्ट करावं लागतं की, ''नाही, मी डॉक्टर नाही. एम.एससी. मायक्रोबॉयॉलॉजी आहे.''

डॉ. रमेश अवस्थी यांची तर 'डॉक्टर' ही पदवीच आहे, पण तेही मेडिकल डॉक्टर नाहीत, तर पीएच.डी. आहेत. त्यांनी केमिकल इंजिनिअरिंगमध्ये डॉक्टरेट केलेलं आहे. या पार्श्वभूमीवर नानींचं डॉक्टर असणं आश्चर्यात टाकणारं होतं. नानी म्हणजे लक्ष्मीबाई मेमाणे. 'मासूम'च्या आरोग्य प्रकल्पांतर्गत 'सदाफुली'च्या पारगाव केंद्राचं काम त्या बघतात. त्यांच्या या कामाबद्दल किती सांगू आणि किती नको असं त्यांना होऊन जातं. साहजिकच आहे. तीन मुलं पदरात टाकून नवरा सोडून गेलेला. अशा असहाय्य परिस्थितीत लक्ष्मीबाईंना मनीषाताई भेटल्या. त्याचवेळी सासवडला आरोग्य शिक्षणाचं शिबिर होणार होतं. मनीषाने आग्रहपूर्वक लक्ष्मीबाईंना शिबिरात भाग घ्यायला लावला. लक्ष्मीबाईंच्या मनात बाकबुक होत होतं. कित्येक वर्षांत शाळा-शिक्षणाशी काही संबंधच राहिला नव्हता. कसं जमणार? ही शंका सतत मनात होतीच. पण मनीषाताईंचा खंबीर आधार होता. त्यावर लक्ष्मीबाईंनी दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला.



आहाराची माहिती, शरीराची ओळख, पाळीचं चक्र, पाळीच्या वेळची स्वच्छता, झाडपाल्याची औषधं, बायकांचे आजार या विषयांसंदर्भात विविध प्रकारची माहिती त्यांना सबला व क्रांती या कार्यकर्त्यांकडून तसंच भारतभरातील इतर रिसोर्स-व्यक्तींकडून आणि वरील शिबिरातील अभ्यासक्रमातून मिळाली.




लक्ष्मीबाई मूळच्याच हुशार आणि कष्ट करण्याची तयारी. त्यामुळे लौकरच सगळ्या गोष्टी त्यांनी आत्मसात केल्या. गावात मग त्यांनी बायकांचे मेळावे घेतले. आपण काय काय शिकलो ते सांगितलं. त्यांना माहिती होतं की हे बायकांचे जिव्हाळ्याचे विषय आहेत. पण बायका या संदर्भात फारसं बोलत नाहीत. लवकर सांगत नाहीत. आणि गुपचूप त्रास सहन करत राहतात. पण लक्ष्मीबाईंच्या गोष्टींमुळे, आपल्यातलीच एक बाई काहीतरी सांगते आहे; हे पाहून बायका हळूहळू मोकळ्या व्हायला लागल्या. बोलायला लागल्या. मग लक्ष्मीबाईंनी बायकांना स्वत:च्या शरीराची ओळख करून दिली. आपणच आपलं शरीर (मायांग) आरसा आणि स्पेक्युलमच्या साहाय्याने कसं तपासायचं ते शिकवलं. एकमेकींनी कसं तपासायचं ते शिकवलं.

लक्ष्मीबाईसारख्याच एकोणीस आरोग्य कार्यकर्त्या मोठ्या उत्साहाने गेली आठ वर्षं हे काम करत आहेत. आज पुरंदर तालुक्यातील 'मासूम'च्या क्षेत्रात अशी ११ आरोग्य केंद्रं कार्यरत आहेत.

अंगावरून लाल जाणं, पांढरं जाणं, अंग बाहेर येणं, प्राथमिक अवस्थेतल्या गर्भाशयाच्या कॅन्सरची शक्यता तपासणं, मलेरिया इ. वर त्या उपाय सांगतात. केवळ एका गावामधील, अंग बाहेर आलेल्या ६४जणींना ससूनमध्ये नेऊन त्यांच्या शस्त्रक्रिया केवळ १२०रुपयांत त्यांनी करवून घेतल्या आहेत. ससूनमधले डॉक्टरही त्यांच्या आता चांगले परिचयाचे झाले आहेत आणि त्यांचं खूप चांगलं सहकार्य त्यांना मिळतं आहे. लक्ष्मीबाई आता गावाच्या आणि 'मासूम'च्याही नानी झाल्या आहेत. हे काम 'मासूम'च्या 'सदाफुली' या उपक्रमातून चालतं.

मध्यंतरी त्यांनी आणि इतर कार्यकर्त्यांनीही डॉ. अभय शुक्ल, डॉ. अनंत फडके आणि डॉ. अनिल पिळगावकर यांच्याकडून प्रथमोपचाराचं शिक्षणही घेतलं आहे. त्या गावात समुपदेशनाचं कामही करतात. अनेक








विस्कटलेल्या संसारांची घडी त्यांनी बसवून दिली आहे. हे सगळं मनीषाताईंमुळे आणि 'मासूम'मुळेच शक्य झालं असं त्या अगदी कृतज्ञतेनं सांगतात.

नानींचं हे प्रातिनिधिक उदाहरण आहे. 'मासूम'मधला सगळा स्टाफच असा 'मासूम'मय झाला आहे. 'मासूम' ही मनीषा गुप्ते आणि डॉ. रमेश अवस्थी यांची संस्था राहिली नसून ती या संस्थेवर मनापासून प्रेम करणाऱ्या या जवळपास १०० कार्यकर्त्यांची संस्था आहे. दलित, वंचित, शोषित, मुस्लिम, विकलांग अशा उपेक्षित समाजघटकांतल्या स्त्रिया, मुली या कार्यकर्त्या म्हणून 'मासूम'मध्ये मोठ्या प्रमाणावर काम करताहेत. त्यांचं शिक्षण, त्या करत असलेलं काम, त्यांचे विचार, त्यांचा आत्मविश्वास हे सगळं बघितलं - ऐकलं की 'स्व'ची ओळख म्हणजे काय हे वेगळं सांगण्याची जरूर पडत नाही. कुटुंब व समाजाच्या दृष्टीने नगण्य अशी एक बाई किंवा मुलगी, ते आत्मविश्वासाने कामाच्या जबाबदाऱ्या पेलणारी आणि तो आत्मविश्वास आपल्या इतर आयाबहिणींमध्ये जागवण्यासाठी तळमळीने प्रयत्न करणारी एक स्त्री—हा प्रवास 'मासूम'च्या बहुतेक प्रत्येक कार्यकर्तीचा प्रवास आहे हे त्यांच्याशी बोलताना जाणवतं. त्यांच्या बोलण्यातली कळकळ आपल्यापर्यंत पोचते. 'मासूम'ची भाषाच आपुलकीची भाषा आहे.

### बीज अंकुरले

हे सगळं सहजपणे जाताजाता घडलेलं नाही तर हे असं घडवून आणण्यासाठी मनीषा आणि रमेश या जोडप्याने जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. कष्ट केले आहेत. एकमेकांवरचा आणि माणुसकीवरचा विश्वास हा त्याचा भक्कम पाया आहे. आणि मानवी विकासासाठी समाज परिवर्तन करण्याची तळमळ हे त्यांचं भांडवल आहे. अतिशय स्वच्छ मनानं त्यांनीही सामाजिक कार्यात स्वत:ला अक्षरश: झोकून दिलं आहे. आणि स्वच्छ मनाची ही पारदर्शकता 'मासूम'च्या सगळ्या कामात झिरपली आहे, हे आपल्याला ठायी ठायी जाणवतं.

या स्वभावाची बीजं कुठेतरी त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, त्यांची वाढ, त्यांच्यावर झालेले लोकशाहीचे संस्कार, त्यांचं शिक्षण, त्यांनी घेतलेले अनुभव, त्यांना भेटलेली माणसं आणि हे सगळं स्वीकारायला खुलं असलेलं त्यांचं मन, यांत आहे असं वाटतं. त्यावेळी जे पेरलं गेलं ते आता छान बहरून आलं आहे.

१९६९ पासून म्हणजे विद्यार्थिदशेतच डॉ. रमेश अवस्थींना राजकारणाची ओढ वाटायला लागली आणि Radical Humanist Group मध्ये ते सामील झाले. दिल्लीला आय.आय.टी.त शिकत असताना बॅरिस्टर तारकुंडे यांच्याबरोबर त्यांनी काम केलं. संघर्ष वाहिनी, जयप्रकाशजींचं आंदोलन यांसारख्या अनेक चळवळींत त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. CFD (Citizens for Democracy), PUCL (People's Union for Civil Liberty)चेही ते सदस्य होते. आता ते महाराष्ट्र PUCLचे अध्यक्ष आहेत. 

या कामाला, विचारांना समांतर अशीच मनीषाचीही घडण होत होती. तिच्या घरात पूर्ण राजकीय आणि लोकशाही वातावरण होतं. सामाजिक कामाचं बाळकडूच मनीषाला मिळालं होतं. त्यामुळे तिने किंवा तिच्या बहिणीने (गिरिजाने) सामाजिक कामात न पडणं हीच आश्चर्याची गोष्ट झाली असती. मनीषाने मायक्रोबॉयॉलॉजी घेऊन एम.एससी. केलेलं आहे. साने गुरुजी कथामाला, सेवादल, संघर्ष वाहिनी अशा भारलेल्या वातावरणात काही काम करणं, शिकणं, अनुभवणं, चाचपडणं सुरू होतं. त्याच सुमारास इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर केली. तेव्हा आता काहीतरी केलंच पाहिजे अशी एक जबरदस्त भावना तिच्या मनात निर्माण झाली. याच काळात संघर्ष वाहिनीच्या कामात मनीषा आणि रमेशची ओळख आणि नंतर लग्न झालं.

लग्नानंतर दोघंही FRCH (Foundation for Research in Community Health) या सामाजिक आरोग्यावर संशोधनाचं काम करणाऱ्या संस्थेमध्ये नोकरी करत होते. थोड्या दिवसांनी त्यांच्याकडे बारा-तेरा हजार

रुपये जमा झाल्यावर नोकरी सोडावी आणि गावाकडे जाऊन काम सुरू करावं असा विचार त्यांनी केला. म. गांधीजींचा वैचारिक वारसा आजोबांकडून मनीषाकडे आला होता आणि जेपींच्या विचारांचाही प्रभाव होता. त्या विचारांनी गावाकडे जायचं बीज मनात रुजलं होतंच.

FRCH चे संस्थापक डॉ. आंटिया अनुभवी होते. रमेश-मनीषाचं कर्तृत्व त्यांनी जाणलं होतं. नोकरी सोडून देऊन १२-१३ हजारात फारसं भरीव काम उभं राहणार नाही या विचाराने, मनीषा-रमेशने FRCH चाच एखादा प्रकल्प गावात सुरू करावा असा पर्याय त्यांनी सुचवला. हा पर्याय न स्वीकारण्याचं काही कारणच नव्हतं. FRCH चं काम आरोग्याच्या क्षेत्रात होतं. डॉ. आंटिया यांच्या सदिच्छांसह मग पुरंदर तालुक्यातल्या माळशिरस या गावी त्यांनी कामाची सुरुवात केली. त्याचबरोबर 'मासूम' या संस्थेची स्थापना केली.

## माळशिरस

माळशिरसमध्ये 'मासूम'च्या कामाला सुरुवात झाली. आपल्याला काय करायचं आहे ते मनीषा-रमेशच्या मनात पक्कं होतं. त्याबद्दल सविस्तर सांगताना मनीषा म्हणते —



'मासूम'ने १९९० साली हॅन्डलूम सेंटर आणि शिवणक्लासपासून सुरुवात केली. या कामासाठी सरकारी अनुदान घेतलं होतं. हॅन्डलूम सेंटरमध्ये हातमागावर सतरंज्या विणण्याचं काम केलं जायला लागलं. गावात साधारणपणे शिवण शिकण्यासाठी मुलींना-स्त्रियांना सहज पाठवलं जातं. दुसऱ्या कुठल्या कारणासाठी मुलींना घराबाहेर सहसा पाठवलं जात नाही. म्हणून शिवणापासून सुरुवात केली. मग दिवसातले सहा तास, आठवड्याचे सहा दिवस, असे सहा महिन्यांचे वर्ग सुरू झाले.

या वर्गांमध्ये अर्धा वेळ शिवण आणि उरलेल्या अर्ध्या वेळात खेळ-व्यायाम, आरोग्याची माहिती, स्त्रीवादाची ओळख, पुरोगामी विचार-गाणी शिकवणं, काही संस्था-बँक-कोर्ट-पोलिस चौकी दाखवणं आणि त्यांच्या कामाची माहिती देणं, विवाह नोंदणी कशी करायची, सायकल कशी चालवायची असं विविधांगी शिक्षण दिलं जायचं.

आपल्या काही परंपरा-पद्धतींमध्ये मुलांच्या आणि विशेषत: मुलींच्या लहानपणापासून शोषणाच्या व्यवस्था आहेत. या शोषण-व्यवस्थांची या मुलींना ओळख करून देणं आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी एक नवा विचार देणं आणि पर्याय शोधायला मदत करणं व यासाठी किशोरवयीन मुलींना स्त्री-पुरुष समतेची जाणीव करून देणं, आपले हक्क-जबाबदाऱ्या काय आहेत त्या जाणून घेऊन हे हक्क मिळवण्याइतका आत्मविश्वास या मुलींमध्ये निर्माण करणं, हा 'मासूम'चा प्रमुख उद्देश होता.''

## 'मासूम'चा विस्तार

कोणते काम करायचे या विषयाची स्पष्ट कल्पना व ते नियोजनपूर्वक करायचे या सवयीमुळे 'मासूम'चं स्त्रियांच्या सक्षमीकरणाचं काम थोड्याच अवधीत विस्तारू लागलं.

स्त्रियांना रोजगार मिळून त्या आर्थिकदृष्ट्या सबल झाल्या तर त्यांचे सक्षमीकरण होण्यास महत्त्वाची मदत होते. हे लक्षात घेऊन मनीषाने 'स्त्रीधन' हा प्रकल्प सुरू केला. याचा सर्व व्यवहार व हिशोबपत्रके दहावीपर्यंत शिकलेल्या मुली ठेवतात. त्यामधून स्त्रीला उद्योगासाठी कोणत्याही तारणाशिवाय लहानसं कर्ज उपलब्ध होतं. त्या कर्जाच्या साहाय्याने ती स्त्री जो उद्योग करते त्यामुळे तिला बँकांना कर्ज देण्याकरता आवश्यक असलेलं तारण यथावकाश जमवता येतं व आपला उद्योग वाढवता येतो. दर महिन्याला पाच ते सात लाख रुपयांची उचल घेतली जाते. अशा दिलेल्या कर्जाची आपोआप होणारी परतफेड ९५% पेक्षा अधिक असते. कर्जाकरता






ना काही कायदेशीर कागदपत्र करावे लागतात, ना त्याच्या वसुलीकरता काही कायद्याचा अवलंब करावा लागतो.

स्त्रीधनासारख्या प्रकल्पातून पैशाच्या व परस्पर मैत्रीच्या मिळणाऱ्या थोड्याशा आधारानेसुद्धा स्त्रिया आत्मविश्वासाने उभ्या राहतात. कारण संसारासाठी कितीही कष्ट करण्याची त्यांची तयारी असते.

'मासूम'चा स्त्रियांसाठी चालणारा दुसरा महत्त्वाचा प्रकल्प 'सदाफुली'. स्त्रियांच्या आरोग्यविषयक प्रश्नांबद्दलचा हा प्रकल्प डिसेंबर ९५पासून सुरू झाला. या प्रकल्पाचं काम अकरा गावांत चालू आहे. अठरा स्त्री कार्यकर्त्या हे काम पाहतात.

या आरोग्य केंद्रामध्ये स्त्रियांची पॅप-स्मिअर परीक्षा केली जाते. त्यामुळे स्त्रियांच्या योनी- मार्गाला होणाऱ्या कर्करोगाचं निदान करता येतं. आतापर्यंत २५० स्त्रियांची अशी तपासणी करून आवश्यक तेथे औषधोपचार वा शस्त्रक्रियेने त्या बऱ्या झाल्या आहेत. वेळीच केलेल्या तपासणीमुळे त्यांना रोग टाळताही आला आहे. या कामात स्त्रियाच गुंतलेल्या असल्याने बायकांना स्वाभाविकपणे वाटणारा संकोच आता राहिलेला नाही.

या केंद्रावर होणारा औषधोपचारही शक्यतो स्थानिकपणे उपलब्ध असलेला झाडपाला, मुळं यांचा असतो. कारण तो स्वस्त व केव्हाही उपलब्ध होतो. ॲलोपथीच्या गोळ्यांचाही सर्वसाधारणपणे वापर होतो.

'मासूम'चा तिसरा प्रकल्प 'कृषिधन प्रकल्प.' शेतीची ९०% कामे स्त्रियाच करतात. तरीही त्या शेतकऱ्यांत मोडत नाहीत. त्यामुळे 'मासूम'ने स्त्रियांची 'शेतकरी मंडळे' स्थापन केली आहेत. त्यांना खात्रीशीर बियाणे देणं, त्यासाठी कर्ज देणं, कुक्कुटपालन, शेळी पालन, यांसारखे जोडधंदे करण्यासाठी सर्वप्रकारचं साहाय्य करणं, अशा प्रकारची कामं ही शेतीमंडळं करत आहेत. बऱ्याच वर्षांनी २००४ साली पडलेल्या पावसामुळे 'शेतकरी मंडळां'नी बियाणं व ट्रॅक्टर सेवा पुरवली व शेतकरी बायांनी बाजरीचं चांगलं पीक घेतलं.

समाजप्रबोधनामध्ये, विशेषत: स्त्रियांच्या प्रबोधनामध्ये, 'मासूम'चा पुढाकार महत्त्वाचा राहिला आहे. मग तो विषय सासवडमध्ये अचानक उद्भवलेल्या जातीय दंगलीविषयक असो किंवा शाळांतील मुलांच्या मूल्यशिक्षणाचा असो अथवा हक्कांधारित दृष्टिकोनातून करावयाचे प्रबोधन असो, 'मासूम' त्यांमध्ये अग्रेसर राहिले आहे. या संदर्भात 'मासूम'च्या 'मित्र' प्रकल्पाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

'मासूम'च्या सर्वच कार्यक्रमांमधून 'हक्कांधारित दृष्टिकोन' हळूहळू विकसित होत गेला. जागतिकीकरणामुळे एकीकडे भारतासारख्या देशामधील गरिबी, बेकारी, उपासमार वाढत आहे आणि जात, वर्ग व लिंगाधारित विषमता अधिकाधिक बळकट होत आहे. दुसरीकडे जमातवादामुळेही दुर्बल व उपेक्षित घटकांच्या मानवी हक्कांचं उल्लंघन होत आहे. अशावेळी स्वयंसेवी संस्थांनी आपल्या कामात 'हक्कांधारित दृष्टिकोना'चा (Rights Based Approaches) अवलंब केल्यास स्त्रिया, दलित, आदिवासी, बालकं अशांसारख्या उपेक्षितांचे खऱ्या अर्थाने सबलीकरण होईल.

याच उद्देशाने 'मासूम'ने 'मित्र' (MASUM Institute for Training in Rights Based Activism) या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील सुमारे ४० संस्थांमधील १३० कार्यकर्त्यांचे 'हक्कांधारित दृष्टिकोना'बाबत प्रशिक्षण करण्यात येत आहे. यासाठी जुलै ते ऑक्टोबर २००४ या कालावधीत प्रत्येकी १३ दिवसांची चार शिबिरं झाली. या प्रत्येक शिबिराचा एक विशेष विषय होता. ते विषय असे - (१) महिला सबलीकरण (२) आरोग्याचा हक्क (३) नैसर्गिक साधनसंपत्तीवरील हक्क व (४) बालहक्क.

प्रत्येक शिबिराची सर्वसाधारण अभ्यासक्रम व विशेष अभ्यासक्रम अशा दोन भागांत विभागणी केली होती. सर्वसाधारण अभ्यासक्रमात लिंगभाव, जात व वर्ग व्यवस्था, जागतिकीकरण, मूलतत्त्ववाद, हिंसाचार, संयुक्त राष्ट्रसंघ, मानवी हक्क व हक्कांचे विविध करारनामे हे विषय होते. तर विशेष अभ्यासक्रमात वर उल्लेख केलेल्या विषयांचा समावेश होता.

या प्रकल्पांतर्गत 'मासूम'तर्फे मानवी हक्कांच्या संदर्भातील साधन केंद्र तयार केले जात आहे.

❐

# तिस्ता सेटलवाड

मीना कर्णिक



तिस्ता सेटलवाडशी बोलताना पहिल्यांदा जाणवतो तो तिच्यातला आक्रमकपणा, बंडखोरपणा आणि निर्भिडपणा. हळूहळू तिच्या शब्दांमधील तळमळ मन काबीज करू लागते. न्यायासाठी लढण्याची जिद्द अचंबित करून जाते. मग ते महिलांच्या हक्कांसाठी लढणं असो नाहीतर गुजरातमधल्या दंगलग्रस्तासाठी. म्हणूनच २७ फेब्रुवारीला गोध्रा हत्याकांड घडलं आणि त्यानंतर चारच दिवसांनी तिस्ता तिथे पोहोचलेली होती. ७ मार्चला तिने तिथल्या ११ जिल्ह्यांचा दौरा केला. त्या वेळी गुजरातमध्ये प्रचंड दहशत होती. भगवा दुपट्टा घेतल्याशिवाय तुला हायवेवरून जाताच येणार नाही असं अनेकांनी तिला सांगितलं होतं. पण तरीही ती गेली. अनेक पुनर्वसन छावण्यांमधून फिरली. तिथली दैना पाहून धसकली. या आधी मुंबईत झालेल्या दंगलीनंतरही तिने दंगलग्रस्तांसाठी बरंच काम केलं होतं. पण इथली परिस्थिती त्यापेक्षा कित्येक पटीने जास्त भयंकर होती. मदत घेऊन येणाऱ्या गाड्या पुनर्वसन छावण्यांपर्यंत पोहोचत नव्हत्या. फाटक्या कपड्यांमधल्या बायका आणि बेवारशी मुलं. खुद्द सरकारच दगलखोरांच्या मागे होतं. मुंबईत आपण नुसतीच मदत केली. दंगलग्रस्तांना न्याय मिळवण्यासाठी कायदेशीर पाठपुरावा केला नाही याची जाणीव असल्यामुळे आणि गुजरातमध्ये तसं होऊ नये असं वाटत असल्यामुळे तिने गुजरात सरकारविरुद्ध याचिका दाखल केली आणि सुरू झाला एक लांबलचक प्रवास. खाचखळग्यांनी भरलेला जो आजही चालू आहे. मग ते बेस्ट बेकरी प्रकरण असो, बिल्किसची केस असो किंवा अगदी गोध्रामध्ये मारल्या गेलेल्या हिंदूंच्या कुटुंबांसाठी लढणं असो.



कायदेतज्ज्ञ अतुल सेटलवाड यांची ही मुलगी. घराणं गर्भश्रीमंत. घरात पुस्तकांचा नुसता खजिना होता. इतिहास, साहित्य, तत्त्वज्ञान या विषयांमध्ये तिला पहिल्यापासून रस. अगदी सातवीमध्ये असल्यापासून आपण पत्रकारच व्हायचं हे तिने नक्की केलं होतं. आपल्या मुलींनी वकील व्हावं अशी ॲड. सेटलवाड यांची इच्छा होती. कारण त्यांच्या सात पिढ्या या क्षेत्रात होत्या. तिस्ताचे पणजोबा चिमणलाल सेटलवाड यांना नाईटहूड मिळाली होती. तिच्या आजोबांनाही इंग्रजांनी ती देऊ केली होती, पण ते स्वातंत्र्य चळवळीत असल्याने त्यांनी ती नाकारली. घरातले सगळे परदेशी जाऊन शिकून आलेले, पण तरीही मुलींनी वकिली करायची नाही म्हटल्यावर कोणत्याही प्रकारची जबरदस्ती झाली नाही. (तिस्ताची बहीण चित्रकार आहे.)

तिस्ता नववी-दहावीत असताना आणीबाणी जाहीर झाली आणि भोवतालचं भान अधिकच आलं. एलफिन्स्टन महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रगती संघटनेत ती सामील झाली. पदवी मिळाल्यानंतर एम.ए.साठी प्रवेश घेतला. दोन वर्षं कायद्याचं शिक्षण घेतलं. पण दोन्ही पूर्ण केलं नाही. त्या आधीच 'डेली'या वर्तमानपत्रात तिने प्रशिक्षणार्थी वार्ताहर म्हणून आणि त्यानंतर 'इंडियन एक्सप्रेस'मध्ये वार्ताहर म्हणून काम केलं होतं.

'एक्सप्रेस'मध्ये तिला




ग्रामीण महाराष्ट्रात फिरून बातम्या देता आल्या. राजस्थानला जाता आलं. १९८७ साली उदयपूरला भूकबळी झाले होते. तिथेही ती जाऊन आली. आजवर केलेल्या वाचनाला अनुभवाची जोड मिळू लागली. कामात, विचारात प्रगल्भता येऊ लागली. १९८४ पासून ती बॉम्बे युनियन ऑफ जर्नलिस्टस म्हणजेच बीयुजेमध्ये काम करू लागली. दोन वर्षांनी प्रसारमाध्यमांमध्ये काम करणाऱ्या बायकांचे प्रश्न मांडण्यासाठी काही पत्रकार महिलांबरोबर तिने वुमन अँड मिडिया कमिटी स्थापन केली. त्या वेळची एक घटना सांगण्यासारखी आहे. विष्णू भागवत तेव्हा वेस्टर्न नेव्हल कमांडचे प्रमुख होते आणि बोटीवर इंदिरा गांधी येणार होत्या, पण त्या बोटीवर म्हणे बायकांना प्रवेश देण्याची पद्धत नव्हती. पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी त्यांना चालणार होत्या पण पत्रकार म्हणून बायकांना प्रवेश निषिद्ध होता. कमिटीने त्याच्याविरुद्ध एक निषेध पत्र तयार केलं आणि ते विष्णू भागवतांना पाठवून दिलं. त्यांना शेवटी माफी मागायला लावली.

तिस्ताच्या पत्रकारितेला नेहमीच सामाजिक बांधिलकीचं अधिष्ठान लाभलेलं आहे. अत्यंत ठामपणे ती स्वत:ला अॅक्टिव्हिस्ट पत्रकार म्हणवून घेते. 'एक्सप्रेस' सोडल्यानंतर तिने दोन वर्ष फ्री लान्सिंग केलं. काही काळ 'बिझनेस इंडिया' सारख्या नियतकालिकामध्येही ती लिहीत होती. दरम्यान शहाबानो प्रकरण घडलं. अल्पसंख्याकांचं तुष्टीकरण होत असल्याचा आरोप काँग्रेसवर आधीपासूनच होत होता त्याला या निर्णयाने पुष्टी मिळाली. देशातलं वातावरण बदलत होतं. लालकृष्ण अडवाणींची रथयात्रा सुरू झाली होती. बाबरी मशिदींचं प्रकरण हळूहळू तापू लागलं होतं. जातीय भावना भडकवल्या जात होत्या. सर्व प्रकारच्या जातीयवादाला आणि धर्मांधतेला विरोध करण्यासाठी पती जावेद आनंदबरोबर तिस्ताने सबरंग कम्युनिकेशन्स या संस्थेची स्थापना केली.

भाजपच्या विषारी प्रचाराची धार वाढत होती आणि अखेर त्याची परिणती बाबरी मशीद पाडण्यात झाली. बाबरी मशीद पडल्यानंतर १३ डिसेंबरला लाल निशाण पक्षाच्या दादरच्या ऑफिसमध्ये सगळ्या संघटनांची एक बैठक बोलावण्यात आली होती. बीयुजेच्या वतीने तिस्ता तिथे गेली होती. दत्ता सामंतही होते. तिथे आपण या प्रकाराविरुद्ध एक मोर्चा काढायलाही असमर्थ आहोत, याची कबुली त्यांनी दिली. धर्मनिरपेक्षतेवर विश्वास असणाऱ्यांची असहायता, हताशपणाच जणू त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होता. तिस्तासाठी ही बैठक म्हणजे एक झणझणीत अंजन होतं.








धर्मांधतेला विरोध करण्यासाठी वाहिलेलं नियतकालिक काढावं असा विचार जावेद आणि तिस्ताच्या मनात येऊ लागला. मुस्लीम लीगचा 'रेडिअन्स' आहे, हिंदू संघटनांचा 'ऑर्गनायझर' किंवा 'पांचजन्य' आहे तर धर्मनिरपेक्षतेवर विश्वास असणाऱ्यांसाठी, केवळ माणूस असण्यावर विश्वास असणाऱ्यांसाठी 'कम्युनॅलिझम कॉम्बॅट' या नियतकालिकाचा जन्म झाला.

सुरुवातीला नोकरी सांभाळून आपण या नियतकालिकाचं काम पाहू असं जावेद आणि तिस्ताने ठरवलं होतं. पण ते शक्य नाही असं लवकरच त्यांच्या लक्षात आलं आणि पूर्ण वेळ हे काम पाहण्याचं ठरवलं. त्यातही दोघांनी कामाची विभागणी करून घेतली. जावेदने संपूर्ण ऑफिसचं काम, संपादनाची जबाबदारी घ्यायची तर तिस्ताने बाहेर फिरून लेख लिहिण्याची. ऑफिस घरातच असल्यामुळे दोघं मुलांकडेही लक्ष ठेवू शकत होते. तिस्ताच्या या सर्व प्रवासात जावेदचा सहभाग खूप मोठा आहे. किंबहुना, मितभाषी जावेदचं अस्तित्व भडाभडा बोलणाऱ्या, भांडणाऱ्या तिस्ताचं खरं सामर्थ्य आहे. तिस्ताचं व्यक्तिमत्त्वच असं आहे की माणूस तिच्या आक्रमकपणामुळे तिच्याकडे ओढला जातो. प्रसिद्धीचा झोत आपसूक तिच्यावर पडतो. पण शेजारी शांत स्वभावाचा जावेद नसता तर तिस्ताला एवढं झोकून देऊन


३८



काम करता आलं असतं का या प्रश्नाचं उत्तर नकारार्थीच द्यावं लागेल. दोघांनी मिळून हे नियतकालिक चालवायचं ठरवलं खरं; पण संकटं कमी नव्हती. अखंड आर्थिक तंगी हा या मार्गातला खूप मोठा अडथळा होता. मध्यंतरी, मे ९५ ते फेब्रुवारी ९६ या काळात तर त्यांना नियतकालिक काढणंही जमलं नाही. त्या वेळी 'तुम्हारी अमृता' या शबाना आझमी आणि फारुख शेख यांच्या नाटकाचा प्रयोग करून त्यांनी पुन्हा एकदा 'कम्युनॅलिझम कॉम्बॅट' सुरू केलं. त्यातून अनेक महत्त्वाचे विषय हाताळले. 'साऊन्ड्स ऑफ सायलेन्स' या शीर्षकाखाली मुंबईच्या दंगली आणि बॉम्बस्फोटानंतर स्थापन झालेल्या श्रीकृष्ण आयोगावर लेख, 'सामना'ने चिथावणी देणारं लिखाण केल्याबद्दल पीयुसीएलने दाखल केलेल्या खटल्यावर उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विरोधी निर्णयाचा पाठपुरावा, दलितांचे प्रश्न, महिलांचे प्रश्न, समान नागरी कायद्याची चर्चा, शिक्षणाचं भगवेकरण, भारत-पाकिस्तान मैत्री अशा अनेक विषयांवर वेळोवेळी 'कम्युनॅलिझम कॉम्बॅट'ने सविस्तर लिखाण वाचकांना दिलेलं आहे. फेब्रुवारी ९५मध्ये तेव्हा डीआयजी असलेल्या विभूती नारायण राय यांची मुलाखत तर खूपच गाजली होती. 'कोणतीही दंगल राज्य सरकारच्या मनात असेल तर चोवीस तासांमध्ये थांबू शकते,' असं विधान त्यांनी केलं होतं. स्वाभाविकच देशभर या विषयावर नंतर चर्चा झाली.




बांगला देशात, पाकिस्तानात अल्पसंख्यांकांवर होत असलेल्या अत्याचाराविषयीसुद्धा या नियतकालिकाने खूप लिखाण केलेलं आहे. आपली घरं सोडून विस्थापित व्हावं लागणाऱ्या काश्मिरी पंडितांवर स्पेशल रिपोर्ट्स दिलेले आहेत. ऑक्टोबर ९८ ते जानेवारी २००२ या काळात तिस्ताने गुजरातवर पाच मोठे लेख लिहून येणाऱ्या काळासाठी जणू धोक्याची सूचना देऊन ठेवली होती. राज्य सरकारने किती पद्धतशीरपणे ख्रिश्चनांना आपलं निशाण बनवलेलं आहे, हळूहळू विषारी प्रचाराने राज्य कसं पोखरलं जातयं. ही तिची सर्व निरीक्षणं या लेखांमधून तिने मांडली होती. 'वेलकम टू हिंदू राष्ट्र' अशा शीर्षकाखालीच तिचे हे लेख येत होते. दुर्दैवाने तिस्ताने जे काही लिहिलं ते सगळं खरं ठरल्याचं नंतर आपण पाहिलं. निमित्त गोध्र्याचं झालं आणि गुजरात पेटला.




गुजरात दंगलींच्या काळात 'कम्युनॅलिझम कॉम्बॅट'ने सहा मोठे लेख देऊन तिथलं भीषण वास्तव लोकांसमोर आणलं. गोध्र्याला झालेलं हिंदूंचं हत्याकांड, त्यानंतर अत्यंत निर्घृणपणे केलेले मुसलमानांचे खून, मुसलमान महिलांवर होत असलेले बलात्कार, लूटमार, प्रचंड दहशत, यांचे तपशील अंगावर शहारा आणत होते. दंगलग्रस्तांना मदत मिळणं तर महत्त्वाचं आहेच; पण त्यांना

न्याय मिळणंही आवश्यक आहे याची जाणीव तिस्ताला झाली. तिने पहिला खटला दाखल केला तो दंगलग्रस्तांना पुनर्वसनासाठी योग्य तो निधी मिळावा यासाठी. सिटिझन्स फॉर जस्टिस् अँड पीस (सीजेपी) या संस्थेतर्फे हे खटले घातले गेले. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती जस्टिस सुरेश, विजय तेंडुलकर यांच्यासारखे दिग्गज या संस्थेच्या समितीवर आहेत. गोध्रा प्रकरणात पोळलेले हिंदूही तिस्ताकडेच आले. त्यांच्यातर्फे आणखी एक खटला दाखल झाला. असे एकोणीस खटले सध्या तिस्ता चालवते आहे. सगळा भार एकटीच्याच खांद्यावर असल्यामुळे असेल कदाचित पण या प्रकरणांबाबत ती थोडी पझेसिव्हही झाल्यासारखी वाटते.

बडोद्याच्या खालच्या कोर्टाने बेस्ट बेकरीसारख्या खटल्यामधून दंगल करणाऱ्यांची निर्दोष मुक्तता केली. गुजरात सरकार त्याविरुद्ध उच्च न्यायालयात जाण्याची टाळाटाळ करत असल्याचं पाहून सीजेपीने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले राष्ट्रीय मानवी हक्क आयोगानेही या प्रकरणाची दखल घेतली होती. याच काळात बेस्ट बेकरी प्रकरणातली महत्त्वाची साक्षीदार जाहिरा शेखने पत्र लिहून बडोद्याच्या कोर्टात भीतीमुळे आपण खरं बोलू शकलो नाही; पण ते बोलण्याची आपली तयारी असल्याचं तिस्ताला सांगितलं. आणि जाहिराला मुंबईत आणून तिची पत्रकार परिषद झाली. मानवी हक्क आयोगासमोरही तिने प्रतिज्ञापत्र करून आपल्यावर आलेला दबाव, प्रत्यक्ष बघितलेली घटना या गोष्टी तपशीलवार सांगितल्या. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने गुजरातामधले दंगलीचे खटले मुंबईत चालवण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला आणि आपण पहिली लढाई जिंकली असं तिस्ताला वाटलं. एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात खटला नेल्याची उदाहरणं होती, पण जातीय दंगलींच्या संदर्भात एका राज्यातून दुसऱ्या राज्यात अशाप्रकारे खटला चालवण्याचा निर्णय हा स्वतंत्र भारतात पहिल्यांदाच होत होता.




आणि अचानक जाहिरा शेखने तिस्तावरच आरोप करून या सगळ्या प्रकरणाला एक वेगळीच कलाटणी दिली. तिस्ता सेटलवाडने आपल्याला जिवे मारण्याची धमकी दिली, असं तिने बडोद्यामध्ये पत्रकार परिषद घेऊन सांगितलं. म्हटलं तर तिस्तासाठी हा खूप मोठा धक्का होता. केवळ तिच्यासाठीच नाही तर तिच्या कुटुंबीयांसाठीसुद्धा. राहायला जागा नाही म्हणून काही काळ जी जाहिरादिदी आपल्या घरी पंधराएक दिवस राहिली तिने आपल्या आईवरच असे आरोप करावेत या विचाराने तिची मुलगी तमारा आणि मुलगा जिब्रान प्रचंड अस्वस्थ झाले. त्यांची समजूत काढणं हेही मोठं काम बनलं. अशा परिस्थितीत ओळखीचे, बिनओळखीचे पाठींबा देणारे जे अक्षरश: हजारो फोन आले त्यांनी या कुटुंबाला मानसिक आधार मिळाला. 'आजवर तुम्हाला आलेल्या धमक्यांमुळे तुम्हाला गुजरात सरकारच्या मसल पॉवरचा अनुभव येत होता, आता मनी पॉवरचा येतोय.' असं सांगणाराही एक फोन गुजरातमधल्या एका वकीलाने केला होता, हे तिस्ता आवर्जून सांगते.

या सगळ्यामुळेच असेल पण, वाईटातूनही चांगलं निघेल यावर असलेली तिस्ताची श्रद्धा अढळ आहे. न्यायालयामध्ये पूर्ण सत्य बाहेर येईल याची तिला खात्री आहे. जाहिराच्या मागे कोण आहे हे सर्वांसमोर येईल असा विश्वास असून या निमित्ताने कोणताही खटला ठरावीक मुदतीमध्येच चालवला आणि संपवला जावा, पोलीस दल राजकीय हस्तक्षेपापासूनच स्वतंत्र असावं, साक्षीदारांची सुरक्षितता विचारात घेतली जावी इत्यादी मूलभूत न्यायालयीन सुधारणांसारख्या अधिक व्यापक प्रश्नांवर चर्चा होणार असेल, तर ही मेहनत कारणी लागेल, असंही तिला मनापासून वाटतंय. हा दुर्दम्य आत्मविश्वासच तिला तारून नेत असावा, अखंड लढण्याची शक्ती देत असावा.

काही दिवसांपूर्वी 'आई' या विषयावर शाळेत निबंध लिहिताना तिच्या मुलीने, तमाराने थोडंस वैतागूनच लिहिलं होतं, 'शी इज नॉट अफरेड ऑफ एनिथिंग अँड शी डझन्ट गिव्ह अप'. तिस्ताचं यापेक्षा नेमकं वर्णन काय असू शकतं? ❐

# रमेश हरळकर

**प्रतिमा जोशी**

हाडाचा कोकण्या आणि दुसऱ्याच्या जीवाला टोचण्या लावणाऱ्या रमेश हरळकरला आपण टाळूच शकत नाही. कधी तो तासन्तास कचऱ्याची कहाणी सांगत राहील. कधी बौद्धजन पंचायतीच्या चक्रव्यूहात नेऊन सोडील. तो बरोबर नसला, तरी त्याची भुणभुण आपली पाठ सोडत नाही.

रमेश आपल्याला आठवतच राहतो. ताटातलं खरकटं किंवा फुटक्या बाटलीच्या काचा घरातली पोरं कचऱ्याच्या डब्यात उपडी करू लागली, की ते कागदात गोळा करून मग डब्यात टाका असा दम आपोआप दिला जातो. साधा कागद फेकायचा झाला, तर त्याची टाचणी आपल्या हातून नकळत काढून बाजूला ठेवली जाते. रेल्वेत-बसमध्ये खाऊन झाल्यावर रिकाम्या पिशव्या खिडकीबाहेर पडण्याऐवजी आपल्या खांद्यावरच्या बॅगेत जातात.


त्यामागं रमेशनं शिकवलेली सोफिस्टिकेटेड शिस्त वगैरे नसते. सफाईकाम करणाऱ्यांच्या यमयातना ज्यांनी रमेशकडून ऐकल्या आहेत, ती माणसं लाजेकाजेस्तव एवढं तरी करतातच. झोपेचं सोंग घेतलेल्यालाही जाग करेल अशी वेदना त्याच्या शब्दाशब्दांतून ठिबकत राहते. त्याचा ठणका मेंदूला झिणझिण्या आणतो.

ताशीव सावळ्या रंगाचा रमेश झाडूखात्यांची कहाणी सांगू लागला की त्याच्या धारदार नाकपुड्या फुलू लागतात. त्याच्या डोळ्यांत अंगार पेटतो आणि शब्द दुधारी पात्यासारखे चिरत जातात. आपल्याला आणि त्यालाही.. राहतं घर टिकवण्यासाठी विशीच्या आतच हातात झाडू घ्यावा लागलेल्या रमेशच्या बोटांना कलाकाराचं वरदान आहे. वाचणाऱ्याला वेड लावेल असं हस्ताक्षराचं वळण लाभलेल्या रमेशनं मुंबईचे रस्ते झाडायला सुरुवात केली तेव्हापासून या शहरी भावकीबद्दल त्याच्या मनात चक्रं फिरायला लागली. राजापूरजवळच्या गावात पक्की पाळमुळं असलेल्या रमेशचा पीळ तसा कोकणी तिरकसच. मंडल आयोगावरून दंगली माजल्या तेव्हा तो चटकन म्हणून गेला, 'मंडलचं आम्हांला काय? इथं सफाई खात्यात शंभर टक्के जागा जयभीमवाल्यांसाठी राखीव आहेत.'

हा राखीव वारसा रमेशला डाचतो. आपला समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना देव मानतो. शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा असं भाषणातून म्हणतो, पण म्हारकीची कामं नि ती कामं करायला लावणारा धर्म सोडून द्या असं बाबासाहेबांनी सांगितल्याला ५० वर्ष उलटली तरी आजही घाण उपसण्याचं भंगीकाम या समाजाच्या मानगुटीवर कायम असल्याची खंत







त्याला स्वस्थता लाभू देत नाही. धर्मांतर केलं, तरी बुद्धाची माणसं चारदोन अपवाद वगळता वेगळ्या रूपात गावकीचीच कामं करत राहिली आहेत, हा सल त्याला छळत राहतो. सुरुवाती सुरुवातीला रमेश परिस्थिती आहे त्यापेक्षा जरा जास्तच काळी रंगवतोय असं वाटायचं. सफाईखात्यानं दिलेल्या खोल्या टिकवण्यासाठी कुटुंबातल्या कोणातरी एकाला झाडू कामगार व्हावं लागतं. बाप मेला तर त्यामागं आई, नि तिचं काही झालं तर पोरं अशी ही नवी म्हारकी आहे असं तो सांगे तेव्हा जगातील बदलांपासून हा लांब आहे, तेच ते नकारात्मक रडगाणं म्हणतोय असं वाटून त्याला एकदा विचारलं, 'अरे, पण मुंबईच्या म्युन्सिपाल्टीत झाडूवाल्यांनासुद्धा बख्खळ पगार आहेत. थोडं शहाणपण दाखवून जगलं तर घरासाठी म्युन्सिपाल्टीच्या मेहेरबानीवर राहायची गरजच उरणार नाही. या शहरात असंख्य लोक पै पै जमवून स्वत:चं छोटं झोपडं बांधून राहतात. तुम्हांला तरी कशाला पायजे म्युन्सिपाल्टीचं घर? झोपडीत राहीन पण झाडू मारणार नाही असं म्हणण्याऐवजी ही काय गावकीची रड घातलीय?

रमेशनं वाद घातला नाही. ते त्याच्या स्वभावातच नाही. तो खिन्नसा हसला. दोनचार दिवसांनी दादर स्टेशनजवळच्या फाळके रोडवर असलेल्या झाडू कामगारांच्या वस्तीत जयंतीच्या कार्यक्रमासाठी म्हणून घेऊन गेला. आणि मग मुंबईभरच्या झाडू कामगारांच्या वस्त्या रमेशबरोबर पालथ्या घालणं हा नेमच होऊन बसला, गिलावा उडालेल्या गळक्या चाळी, फुटलेल्या पाइपातून वस्तीभर झिपरणारं सांडपाणी, शेंबडी-नागडी पोरं. निम्म्याहून जास्त घरांत कर्ते पुरुष या जगाला रामराम ठोकून भिंतीवरच्या फोटोत जाऊन बसलेले. टी.बी.नं. खोकणारी माणसं.

असाच एकदा अनंत जाधव भेटला. पदवीपर्यंत शिकूनही झाडूखात्यात काम करणारा. मग असे अनेक अनंत जाधव भेटले. सफाई कामगाराच्या पदासाठी म्युन्सिपाल्टीनं घालून दिलेली पात्रता आहे दहावी नापास. पण असंख्य तरुण पोरं आपली शैक्षणिक पात्रता दडवून झाडू मारताना, गटारांत उतरताना दिसू लागली. अनंत एकदा जी नॉर्थच्या ऑफिसात घेऊन गेला.





ती १० तारीख होती. पगाराचा दिवस. सफाई कामगारांपेक्षा पठाण नि सावकारांच्या दलालांची संख्याच तिथे जास्त होती. कर्जाचे हप्ते कापून हातात आलेल्या पाचपन्नास नोटा मोजत सफाई कामगार वळतात न वळतात तोच त्या नोटांवर झडप घालणारे पठाण पाहिले. एकजण अक्षरश: रडताना दिसला. रमेश म्हणाला, याचं गेल्या महिन्यात लग्न झालंय. त्यासाठी त्यानं म्युन्सिपल बँकेचं कर्ज काढलंय. त्याआधी त्याच्या बापजाद्यांनी या पठाणांकडून वेळोवेळी कर्ज घेतलेलंच आहे. आता बँकेच्या कर्जाचा हप्ता कापून जी काय चिल्लर आली ती या पठाणानं वसूल केली. दोन आठवड्यांपूर्वी याची घोड्यावरून बँडबाजासह वरात निघाली होती. आता त्याच रस्त्यावरून याची धिंड निघायची वेळ आलीय. या खात्यात काम करणाऱ्याचं आयुष्यमान जेमतेम चाळीस-पंचेचाळीस वर्ष. कधी कधी त्याहूनही कमी. घाणीत मेलेले उंदीर असतात. फेकून दिलेले गर्भ असतात. मासिक पाळीच्या रक्तस्त्रावानं भरलेले कपडे असतात. सुया, टाचण्या, पत्रे नि काचा असतात. ते ओढून गोळा करताना साऱ्या जगाची घाण उपसता उपसता धनुर्वातापासून प्लुरसीपर्यंत कसल्या कसल्या बाधा होतात. दोन इमारतींमधली हाऊसगल्ली झाडता झाडता वरच्या मजल्यावरच्या खिडकीतून हात बाहेर काढून माणसं काहीबाही फेकतात. कधी जड वस्तू डोक्यात पडून कपाळमोक्ष होतो, कधी लहान पोराचा कागदात बांधलेला गू अंगावर सांडतो. ॲसिड फेकल्यानं भाजल्याच्या घटनाही कमी नाहीत. त्यात नाकातली घाण विसरण्यासाठी दारूचं व्यसन लागतं. असह्य दुर्गंधीत काम करण्यासाठी दारू प्यावीच लागते. आधीच हलकं झालेलं शरीर त्यात पार पोखरून निघतं. गटाराच्या मेनहोलमध्ये उतरणाऱ्यांच्या नरकयातना त्याहून भीषण, विषारी वायू नाकातोंडात घुसून गुदमरून मरणं ही काही नवी गोष्ट नाही. गंगेत स्नान केल्यानं मोक्षप्राप्ती होते म्हणतात, ते खरं की खोटं माहीत नाही पण गटारगंगेत डुबकी मारणाऱ्या सफाईकामगारांना मोक्ष मिळतो हे नक्की, असं रमेश म्हणतो तेव्हा तो खवचटपणा वाटत नाही.



अशा अकाली मरणांचं झाडूकामगारांच्या वस्तीला अप्रूप नाही. मुलाबाळांचं शिक्षण अर्ध्यावरच असताना सुरू झालेलं हे दुष्टचक्रही नवं नाही. अर्धमेल्यानं बळ साठवून उठण्याचा प्रयत्न करताना पुन्हा एकदा पेकाटात लाथ बसून भेलकांडत जावं तशा घटनांच्या मालिकाही नव्या नाहीत.

एके दिवशी रमेश सफाई खात्यातल्या एका विधवा बाईची केस घेऊन आला. वरवर प्रकरण तिच्या नवऱ्याच्या फंडाच्या रकमेचं होतं. पण त्याच्या आत वेगळाच लाव्हारस उकळत होता. मुकादमापासून साहेबापर्यंत सगळ्यांच्या शरीराची भूक भागवता भागवता तिची पार चाळण झाली होती. नाही म्हटलं तर आधीच खाडाबदली कामगार असलेली ती बाई महिन्याकाठी मिळणाऱ्या तुटक्याफुटक्या कमाईला मुकणार होती. शिवाय डोईवरचं छप्पर तुटून रस्त्यावर यावं लागणार होतं ते वेगळंच. फंडाची रक्कम मोकळी करायची घाई ना मुकादमाला ना साहेबाला, कारण तोपर्यंत बाई गयावया करत आपल्या पायाशी येणार याची ती एकप्रकारे खातरजमाच. ही अशी एकटीच बाई नाही. अशा असंख्य बाया झाडूखात्यात सगळ्याच बाजूंनी लुटल्या जातात. कोणीही त्यांच्या अंगाशी झटावं, कोणीही त्यांचा गैरफायदा घ्यावा. वयाच्या तिशी-पस्तिशीत विधवा बनून परक्या पुरुषांच्या वासनेची शिकार बनणाऱ्या या स्त्रियांसाठी ना कसलं संरक्षण ना त्यांना कोणी वाली. त्यात पारंपारिक रुढींनी त्यांचं जगणं आणखीच कठीण करून टाकलेलं. हिंदू धर्म सुटला, पण त्याची पकड सुटली नाही. पाचवीला पुजलेला कर्जबाजारीपणा, कालबाह्य समजुती, शिक्षणाचा पोकळपणा, याच्या जोडीला बौद्धजन पंचायतीसारख्या संस्थांचा या समाजावरील प्रभाव रमेशला अस्वस्थ करून जातो. धर्म बदलला पण साचेबद्धपणा राहिला. नवे नियम आले, आणि नवे धर्माधिकारी आले. बाबासाहेबांनी भारताला राज्यघटना दिली म्हणून त्यांचा अभिमान बाळगणारा हा समाज जातपंचायतीचे अधिकार वापरून एखाद्याला बहिष्कृत करण्यापर्यंत मजल मारून राज्यघटनेची पार सुरळी करून टाकतो हे भयानक आहे. सांगताना रमेश आतून बाहेरून पिळवटून निघालेला असतो. बाबासाहेबांचा वारसा सांगणारा हा समाज खऱ्या अर्थानं सेक्युलर व्हायला हवा, माणसाची सगळ्या प्रकारची स्वांतत्र्य जपण्यासाठी धडपडणारा असावा ही आपली अपेक्षा चुकीची आहे का, या त्याच्या प्रश्नाला आपल्याकडं उत्तरं नसतं. गेली सुमारे १० वर्ष त्याने सफाई कामगार परिवर्तन संघटना स्थापन करून सफाई कामगारांच्या मुलांसाठी अभ्यासिका चालवली आहे. खरं तर अभ्यासिका हे निमित्त आहे. रमेशच्या मनातले अस्वस्थ करणारे प्रश्न तो या मुलांपुढं, कार्यकर्त्यांपुढं मांडतो. त्यांना बोलायला लावतो. वेगवेगळ्या क्षेत्रातल्या माणसांना बोलावून वेगळीवेगळी माहिती या मुलांपुढं अक्षरश: ओततो. जोडीला पिटी केस, खाडाबदली केस घेऊन आलेल्या असंख्य माणसांची अस्तवार चालूच असते. वाचनालय सुरू करण्याबरोबर कर्जबाजारीपणावर मात करण्यासाठी पतपेढीसारखे उपक्रम सुरू करण्याचे त्याचे प्रयत्न आहेत.



पण खरं सांगायचं तर रमेश म्हणजे एक चालतीबोलती संस्थाच आहे. तो कधी एकटा सापडणार नाही. त्याच्या आसपास माणसांचा घोळका असतोच. मुंबईभर त्याची भटकंती चालू असते. एका कामासाठी बाहेर पडला आणि दुसऱ्याच कामात अडकला असं तर त्याचं नेहमीच होतं. तो भेटला की कोणाचं आजारपण, कोणाचं मरण याबद्दल हमखास ऐकायला मिळतं. हा सगळीकडेच असतो त्यामुळे त्याला भेटायला जर कोणी वेळ ठरवून घेतली असेल तर काही खरं नाही. तो एकदोन नव्हे, चोवीस तास उशीरानंही येऊ शकतो. आणि तरीही आपण त्याच्यावर रागावू शकत नाही. ते शक्यही नसतं. तो ज्यासाठी अडकलेला होता ते कारण आणि त्यामागची कहाणी ऐकताना आपल्यालाच आपण काल याच्यावर रागावलो होतो याची शरम वाटायला लागते. हा त्याच्या संवेदनशील व्यक्तिमत्वाचा प्रभाव म्हणायचा की आपल्याला गुंडाळायची हातोटी हे ज्याचं त्यानं ठरवायचं.

रमेश कधीही भेटला की 'जयभीम' अशी खणखणीत हाळी घालतो. चळवळीतल्या अनेकांप्रमाणं राजकारण हा त्याच्या आस्थेचा विषय. त्यातही गप्पांमध्ये अर्थातच दलित राजकारणाचे संदर्भ अपरिहार्यपणे येतात. सत्तेच्या तुकड्यामागं धावताना तुकड्या तुकड्यात विखुरलेल्या रिपब्लिकन राजकारणाची शोकांतिका त्याला अस्वस्थ करते. दुसरीकडं तो ज्या पुरोगामी गोतावळ्यात



वावरतो तिथला साचेबद्ध ब्राह्मणी चेहराही त्याला भेडसावत राहतो. पुरोगाम्यांनी जातीव्यवस्थेचं विश्लेषण केलं पण चौकटीतून मात्र ते बाहेर पडले नाहीत अशी टीका तो करतो. समजावाद्यांचे वर्चस्व असलेल्या म्युनिसिपल मजदूर युनियनशी त्याचे लागेबंधे कधी फारसे जुळले नाहीत. म्युनिसिपल कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना घसघशीत पगारवाढ करून देणारे संप चतुर्थ श्रेणी कामगारांच्या जीवावरच यशस्वी होतात. पण या कामगारांच्या समस्या, त्यांचं मागासलेपण सुटावं यासाठी युनियन काही बोलतसुद्धा नाही असं त्याला वाटतं. कामगार चळवळ नुसतीच पगारवाढ-बोनसच्या चक्रात अडकलीय, तिचा सामाजिक परिवर्तनाशी असलेला सांधा कधीचाच सुटलाय असं त्याचं म्हणणंच आहे मुळी!

त्या अर्थानं तो कोणत्याही गटात मोडत नाही. मध्यंतरी त्याला महागणपती न्यासाचा पुरस्कार मिळाला. तो घ्यावा, घेऊ नये याबाबत तो कमालीचा अस्वस्थ होता. पण मित्रमंडळींच्या आग्रहामुळं त्यानं तो स्वीकारला. त्यानंतर रिपब्लिकन चळवळीकडून त्याच्यावर सडकून टीका झाली. जीवाभावाचे मैतर दुरावले. त्या काळात रमेश कमालीचा दुखावला गेला होता. निवळ घोषणाबाजी आणि तडजोडीचं राजकारण करणाऱ्या दलित नेतृत्वानं सफाई कामगार, कागद, काचपत्रा वेचणारे कष्टकरी, वेश्याव्यवसायात ढकलल्या गेलेल्या स्त्रिया, जमिनीच्या फेरवाटपाचे प्रश्न एवढंच काय, पण गावोगावी दलितांवर होणारे अत्याचार याबाबत ठाम भूमिका घेऊन चळवळी उभारल्या नाहीत. आणि पुरोगाम्यांनी कधी या घटकांकडे नेतृत्व सोपवलं नाही. अशा कोंडीत माझ्यासारख्या कार्यकर्त्यांचा कोंडमारा होतो असं तो तळमळून सांगत असतो.

मराठवाडा विद्यापीठ नामांतराची चळवळ आपल्याच माणसांनी सत्तेची सुपारी घेऊन कणाहीन केली. दलित आणि दलितेतर पुरोगामी चळवळ यांच्या जवळ येण्याची आणि परिणामी दोन्ही समाजघटक अधिक समृद्ध होण्याची प्रक्रिया आपल्या करंटेपणानं आपण घालवली. महाराष्ट्राच्या






राजकारणाला वेगळं वळण देण्याचं आपलं कर्तव्य आपण पार पाडलं नाही असं तो रोखठोक मांडतो. रमेशनं आताशा कुठं पन्नाशी गाठलीय. पण आयुष्यभर लढल्या-झगडल्याचा थकवा त्याच्या चालण्याबोलण्यात अलीकडं जाणवू लागलाय. या सगळ्या झगड्यात त्याची बायको त्याच्यामागं आहेच. रमेशचा कष्टाचा संसार तर तिनं केलाच, पण पंचायतीशी झालेल्या झगड्यांचा सर्वात जास्त मनस्ताप तिला भोगावा लागलाय. सिद्धार्थ, सचिन आणि समीर अशा तिघा मुलांचं करताना तिनं अनेक दिव्यं सोसली आहेत. उभं आयुष्य झाडू कामगारांच्या बकाल वस्तीत घालवलेलं रमेशचं कुटुंब सध्या नेरूळच्या छोटेखानी फ्लॅटमध्ये राहायला गेलंय. रमेशचा सगळा पगार त्याचे हप्ते भरण्यातच जातो. खोलीसाठी आपल्या मुलांच्या हातात झाडू जाऊ नये या रमेशच्या तळमळीचं प्रतिबिंब त्याच्या या फ्लॅटमध्ये उतरलं आहे. त्याची तीन गुणी आणि तरणीबांड मुलं म्हणजे सफाईकामाच्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्याच्या त्याच्या घडपडीची प्रतीकं आहेत.

पण रमेशचं नवं घर एका अर्थानें परिवर्तनाच्या चळवळीशी नातं सांगणाऱ्या आम्हां मित्रमंडळींसाठीही एक प्रतीकच आहे. एकटा एक रमेश उभा राहणं पुरेसं नाही, अशा अनेक माणसांमागं उभं राहणं किती अपरिहार्य आहे ते दाखवून देणारं... ❐

## सुरेशचंद्र वारघडे

# हिवरेबाजारची यशोगाथा






अहमदनगर जिल्ह्यात हजारबाराशे वस्तीचं एक गाव आहे. हिवरेबाजार हे त्या गावाचं नाव. पूर्वीच्या शिवशाही आणि निजामशाही यांच्या सीमेवर गाव वसलेलं आहे. माळशेज घाटामार्गे मुंबईहून बैलांवर लमाण लोक मीठ व इतर पदार्थ निजामशाहीत विक्रीसाठी आणायचे. त्याचा हिवऱ्याला बाजार भरायचा. या बाजारात हत्ती घोडेही विकायला यायचे. त्यावरून गावाला हिवरेबाजार नाव पडलं. मुंबई बेटावरून येणारे व्यापारी मुंबादेवीचे भक्तही होते. त्यांनी हिवरेबाजारात मुंबादेवीची स्थापना केली. आजही हे मंदिर हिवरेबाजारच्या इतिहासाची साक्ष देत उभं आहे. असं हे ऐतिहासिक हिवरेबाजार गाव एकेकाळी निसर्गसंपन्न होतं. डोंगरटेकड्यांवर हिरवीगार वनश्री उभी होती. ओढेनाले वर्षभर खळखळ वाहत होते. विहिरींना वर्षभर पाणी टिकत होतं. शेतात पुरून उरेल एवढं धान्य पिकत होतं. प्रत्येक माळवदी घरासमोर दूधदुभतं होतं. तालमीतल्या लाल मातीत लढत, मेहनत करत पैलवान घुमत होते. घरातल्या दुधावर त्यांचे बुरुजबंद बाहूंचे देह पोसले जात होते. नेत्रदीपक कुस्त्या करून आपल्या गावाचा लौकिक त्यांनी महाराष्ट्रभर वाढवला होता. परंतु १९७२च्या दुष्काळात गावाचं सारं वैभव कोसळून पडलं. प्रत्येक कुटुंब दुष्काळात पोळून निघालं. जगण्यासाठी लोकांनी आपापल्या शिवारातला झाडाझाडोरा कापून विकला. धान्यासाठी अनेकांनी आपला जमीनजुमला नगर व पिंपळगावच्या सावकारांकडे गहाण टाकला. बड्या तालेवार परिवारांना व पैलवान मंडळींना पोटासाठी रोजगार हमीच्या कामावर खडी फोडण्यासाठी जाणं भाग पडलं.

काही स्वार्थी सावकारांनी पैलवानांना दारू पाजायला सुरुवात केली. बोलता बोलता सारा गाव व्यसनी झाला. चरवीभर दूध पचविणारे पैलवान चरवीभर दारू रिचवायला लागले. गावात जसजशी दारूला मागणी वाढायला लागली, तसतशा गावात हातभट्ट्या सुरू झाल्या. त्यांची संख्या चाळीसपर्यंत पोहोचली. हिवरेबाजारात दारूला मोठी प्रतिष्ठा निर्माण झाली. दारूबाज गावातला प्रतिष्ठित नागरिक समजला जायचा. गावात दारूशिवाय कोणताही कार्यक्रम साजरा होत नसे. लग्न ठरविण्यापासून लग्नसमारंभ ते वरातीपर्यंत सारं वऱ्हाड दारूनं झिंगलेलं असायचं. लग्न ठरविताना पाहुण्यांनी दारू पाजली नाही तर बैठक उधळली जायची. लग्नाची मिरवणूक नवरदेवासह वेशीत आली तर पाण्याच्या घागरीऐवजी दारूच्या हंड्यांनी पाहुण्यांचं स्वागत केलं जायचं. लग्नात दारूची बाटली आहेर केली जायची. ग्रामपंचायत व सार्वजनिक निवडणुकीत तर गावात दारूचा महापूर वाहायचा. निवडणुकीतील पक्षीय राजकारणातून गावात दोन गट निर्माण झाले. हे दोन्ही गट मदिरेचे परमभक्त होते. तेच गावचं सारं राजकारण खेळायचे. आधीच मर्कट आणि त्यात मद्य प्याला तर त्याची जी अवस्था होईल तीच अवस्था हिवरेबाजारमधील पैलवानांची झाली. अंगात रेड्यासारखे बळ असणारे पैलवान दारूची नशा चढल्यावर उतायला लागले. मातायला लागले. एकमेकांवर हात टाकायला लागले. कलह सुरू झाला. नगरच्या पोलीस स्टेशनात रोज मारामारीच्या तक्रारी जायला लागल्या. या हाणामारीत दगडधोंड्यांचा सर्रास वापर होत असे. त्यातून गावात एकाचा प्राण गमावला गेला. खुनाची केस दाखल झाली. त्यामुळे गावातलं सारं राजकारण आणि समाजकारण ढवळून निघालं. सुडानं पेटलेली माणसं दारूच्या नशेत खांद्यावर कुऱ्हाडी टाकून गावात फिरायला लागली. लढवय्या पैलवानांचा गाव म्हणून लौकिक पावलेल्या हिवरेबाजारचा 'दारुडं गाव' म्हणून नगर जिल्ह्यात बदलौकिक झाला. कुणा शिक्षकाला शिक्षा करावयाची झाल्यास हिवरेबाजारात त्याची बदली केली जायची. गावावर दारुड्यांची हुकमत होती. सरपंच, ग्रामसेवकापासून शिक्षकांपर्यंत सारेजण दारू प्यायचे. शाळेतच त्यांचा जुगाराचा अड्डा बसायचा. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा झाला. ही सारी हिवरेबाजारची कथा आणि व्यथा वयोवृद्ध गावकरी कोंडीबा मारुती पादीर (वय ७५), बाबू रामा ठाणगे वय (५१), पैलवान विश्वनाथ पादीर (वय ७०), ज्ञानदेव ठाणगे (वय ६५), नामदेव कारभारी ठाणगे, काशीनाथ खरवस यांनी पारावर त्यांच्याशी गप्पा मारत असताना सांगितली.

हातभट्ट्यांत गावच्या शिवारातला उरलासुरला झाडझाडोरा सरपण म्हणून जाळण्यात आला. गावचे शिवार आणि डोंगरटेकड्या उजाड-बोडक्या झाल्या. गावावर निसर्गाची अवकृपा झाली. गावकरी दैन्य आणि






दारिद्र्याच्या चटक्यांनी सतत होरपळत राहिले. झाडांअभावी पडणाऱ्या पावसाचं प्रमाण कमी झालं. जो पाऊस पडायचा त्याचं पाणी वृक्षाच्छदनाअभावी जमिनीत न मुरता वाहून जायला लागलं. आपल्याबरोबर बहुमोल माती वाहून न्यायला लागलं. विहिरी कोरड्या ठणठणीत पडायला लागल्या. पाण्याअभावी गावची भूमाता आपल्या पुत्रांना आणि जनावरांना जगवायला असमर्थ ठरली. त्यात गावात दारुड्यांचा सुळसुळाट. अशा परिस्थितीत माणसांना गावात जगता येईना. अनेकांनी गाव सोडलं. नगर-मुंबईला मोलमजुरी करून ते पोट भरायला लागले. बहुसंख्य शेतकरी नगर जिल्ह्यातील बागायती गावांत शेतमजूर म्हणून सालाने काम करू लागले. १९७२ च्या दुष्काळानंतर पुढे सतत २० वर्षे हिवरेबाजार दुष्काळाचा शाप भोगत होता. परंतु नशेत धुंद झालेल्या दारुड्यांना त्याची पर्वा नव्हती. दारूसाठी त्यांनी घरातले दागदागिने, भांडीकुंडी, शेतजमीन यांची वाट लावली होती. दिवसरात्र दारू हीच त्यांचा प्राण बनली होती. दिवस जुगार आणि भांडणतंट्यात घालवायचा, तमासगिरणीच्या पालात चवल्यापावल्या उडवीत रात्र काढायची, हाच सर्वांचा उद्योग बनला होता.

१९८९ साली ग्रामपंचायत निवडणूक आली. गावात दहशतीचं वातावरण होतं. त्यात काहीही विपरीत घडण्याची शक्यता होती. अशा बिकट प्रसंगी गावाला गर्तेतून बाहेर काढून वाचवलं पाहिजे असा विचार करून काही तरुण नगरला एका द्विपदवीधर तरुणाकडे आले. हिवरेबाजारचा हा तरुण गावापासून दूर होता. आपल्या आजोळी राहून तो शिकला होता. नुकताच एम.कॉम. झाला होता. आंतरविद्यापीठ क्रिकेट संघात खेळून अष्टपैलू क्रिकेटपटू म्हणून त्यानं चांगला नावलौकिक संपादन केला होता. तरुणांनी त्याला गावाकडे लक्ष टाकायची विनंती केली. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत उभं राहायचा आग्रह केला. त्या आग्रहाखातर तो गावात आला. गावाची अवस्था पाहून त्याला दुःख झालं. खेळाडू म्हणून त्याला एअर इंडिया, रेल्वे व एस.टी. खात्याकडून नोकरीच्या मुलखतीसाठी पत्रं आली होती. गावाच्या भानगडीत पडून जीवन बरबाद करून घेऊ नको असा सल्ला त्याला घरच्या लोकांनी दिला. परंतु आपल्या शिक्षणाचा उपयोग गावाला होणार नसेल तर त्या शिक्षणाचा उपयोग काय? असा विचार करून त्या तरुणाने आपल्या स्वतःच्या भवितव्याचा विचार सोडून दिला. गावासाठी सारं जीवन वाहून घेण्याचा निर्णय त्यानं केला. निवडणुकीला उभा राहिला. तरुणांच्या पाठिंब्याने निवडूनही आला. सरपंच झाला. दुसऱ्या दिवशी काही ग्रामस्थांना घेऊन राळेगणसिद्धीला आला. पाणलोटक्षेत्र विकास आणि निसर्ग संवर्धनातून राळेगणसिद्धीने साधलेला शाश्वत विकास त्यानं पाहिला. राळेगणसिद्धीने दुष्काळावर कशी मात केली त्याची कहाणी अण्णासाहेब हजारे यांच्याकडून ऐकली. अण्णांचं मार्गदर्शन घेतलं आणि त्यानुसार हिवरेबाजारात त्यानं काम सुरू केलं. त्या तरुणाचं नाव आहे पोपट बागुजी पवार.

प्रथम त्यानं तरुणांसह स्वतः श्रमदान करून छोटीमोठी कामं केली. गावातला हातपंप कित्येक वर्षे बंद पडला होता. महिलांना पाण्यासाठी वणवण भटकावं लागायचं. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सहकार्यातून हातपंप दुरुस्त केला. पडक्या शाळेचा श्रमदानातून जीर्णोद्धार केला. सामाजिक वनीकरण खात्याच्या माध्यमातून ७० हेक्टरवर वनीकरण केलं. गावात हरिनाम सप्ताह चालू केला. ग्रामस्थांना आळंदी-पंढरपूरच्या यात्रेस नेलं. संतांचा निसर्ग संवर्धनाचा संदेश लोकांना सांगितला. त्यामुळे पोपटरावांबद्दल लोकांचा विश्वास वाढला. ध्येयवादी कार्यकुशल तरुणांचं मजबूत संघटन पवारांनी उभारलं. त्यात दारूचं व्यसन जडलेल्या पालकांच्या मुलांचा समावेश केला. याच मुलांनी पुढे आपल्या पालकांना व्यसनमुक्त केलं. १९९२ साली आदर्शगाव योजना सुरू झाली. अण्णांनी हिवरेबाजारचा आदर्शगाव योजनेत समावेश केला. पोपटरावांनी यशवंत कृषी व पाणलोटक्षेत्र विकास संस्था स्थापन केली. हिवरेबाजारच्या विकासास शुभारंभ झाला. नशाबंदी, नसबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी व श्रमदान ही पंचसूत्री पाळण्याचा ठराव ग्रामसभेत मंजूर करण्यात आला.





डोंगरावरून गावाच्या विकासाला सुरुवात झाली. गावाच्या डोंगरावर व उतारावर एक फूट खोल व दोन फूट रुंदीचे सलग समपातळी चर खणण्यात आले. १५० हेक्टरवर हे काम झालं. दोन वनतळी खणण्यात आली. डोंगरातल्या घळी ४१ दगडी बांध घालून अडविण्यात आल्या. सहा सिमेंट नालाबांध बांधण्यात आले. ५२ मातीचे बांध घालण्यात आले. ५ साठवण बंधारे व जाळीचे बंधारे बांधले. २ पाझर तलाव खोदण्यात आले. माथ्यापासून पायथ्यापर्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने माती आणि पाणी अडविण्यात आले. पावसाचा प्रत्येक थेंब मुरविण्याचं आणि मातीचा प्रत्येक कण अडविण्याचं काम केलं. नंतर पावसाळ्याच्या तोंडावर साग, शिसम, शिसू, चिंच, सावर, रामकाठी, जांभूळ, कडुलिंब, काशिद, भेंडी, खैर इत्यादी प्रकारची स्थानिक वातावरणात वाढणारी २ लाख झाडं लावली. पवना व शेडा या सकस गवताची लागवड केली. ही सारी कामं पाच वर्षांत पूर्ण केली. कुऱ्हाडबंदी व चराईबंदीचं कसोशीनं पालन केलं. या पाणलोटक्षेत्र विकास कामातून गेली दोन तपं अवर्षणाचा शाप भोगणाऱ्या हिवरेबाजारात चमत्कार घडून आला.



हिवरेबाजारच्या हरणाजाई, माळिवा, कुकड्या, पोखरण, चोपाळा या डोंगरात फिरताना पाणलोटक्षेत्र विकासामुळे झालेल्या चमत्काराची सत्यकथा पोपटराव सांगत होते. एक फूट खोल व दोन फूट रुंद सलग समपातळी चराचे एका हेक्टरवर १५०० ते १६०० रनिंग मीटर काम होते. त्यात एका पावसाचे दीड लाख लिटर पाणी साचून मुरते. १५० हेक्टर क्षेत्रावरील सलग समपातळी चरात पुरेशा प्रमाणात पडणाऱ्या एका वेळेच्या पावसाचे २ कोटी ७५ हजार लिटर पाणी हिवरेबाजारच्या जमिनीत मुरायला लागले. या कामामुळे पाणी व माती वाहायची थांबली. त्यामुळे ओढ्यानाल्यांना पूर यायचे बंद झाले. प्रथम वर्षी पूर न गेल्याने नाल्याकाठच्या विहिरींच्या पाण्यात वाढ झाली नाही. त्यामुळे पाणलोटाचे काम करून पोपटने आमचे वाटोळे केले अशी टीका ग्रामस्थ करायला लागले. परंतु जमिनीत मुरलेलं पाणी ज्यावेळी महिन्याभरात भूगर्भातून विहिरीत उतरलं त्यावेळी विहिरी तुडुंब भरल्या. पूर्वी पावसाळ्यात चार महिने पाणी टिकत नव्हतं. पाणलोटक्षेत्र विकासानंतर ते कितीही उपसलं तरी बारा महिने टिकायला लागलं. त्यावेळी लोकांना कामाचं महत्त्व कळलं. पोपटनं आमचं कल्याण केलं, असं लोक म्हणायला लागले. आता जुन्या व नव्याने खणलेल्या एकूण ३१८ विहिरी झाल्या. यापैकी १८० विहिरी पाण्याने भरलेल्या आहेत. पूर्वी १५० फूट खोल जाऊनही अनेकांना पाणी लागलं नाही. त्या विहिरीही पाणलोट विकासामुळे आज तुडुंब भरलेल्या आहेत. हिवरेबाजार अहमदनगर जिल्ह्यातलं पर्जन्य छायेतलं गाव. पावसाचं वार्षिक सरासरी प्रमाण अवघं ४०० मिलिमीटर आहे. २००० सालात अवघा १०० मिलिमीटर पाऊस पडला. तरी गावातल्या सर्व विहिरी भरलेल्या होत्या. २००१ सालापासून गेली तीन वर्षे पाऊस नाही, तरी हिवरेबाजारात जलटंचाई नाही. आजूबाजूच्या गावांना मात्र टँकर आहे.

पाण्याची सोय झाल्यावर गावातलं बागायत क्षेत्र वाढलं. गावाचं एकूण भौगोलिक क्षेत्र ९७६.८४ हेक्टर आहे. त्यापैकी शेतीक्षेत्र ७९५.२३ हेक्टर आहे. पूर्वी १० टक्केही क्षेत्र बागायती नव्हतं. आता जवळ जवळ ७० टक्के क्षेत्र बागायत झालं आहे. लोक अन्नधान्याबरोबर भाजीपाल्याचे पीक घेत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी चिकू, पेरू, बोरं, आंबा, डाळिंबांच्या फळबागा लावल्या आहेत. अहमदनगरच्या बाजारात रोज हिवरेबाजारचा दोन तीन टेम्पो भरून भाजीपाला जातो. कांदा-बटाटा जातो. हिवरेबाजारचा माल आल्याशिवाय नगरच्या मार्केट यार्डात बाजारभाव फुटत नाही. २००२ साली एक कोटी रुपयाचा कांदा गावात झाला. हिवरेबाजारचं भाजीपाल्याचं उत्पन्न आज १२ पट वाढलं. चारा पिके २५ पट वाढली. डाळवर्गीय पिकांत तिप्पट व फळबागायतात ७ पट वाढ झाली. चराईबंदीमुळे १९९४-९५ सालामध्ये गवताचं उत्पन्न २०० टन झालं. १९९५-९६ त ४०० टन, १९९६-९७ मध्ये १०००, ९७-९८ मध्ये १५०० टन, १९९८-९९ मध्ये २००० टन तर आता ३००० टनांपर्यंत गेलं आहे. गवत वाढल्यानं शेतकऱ्यांनी दुधाचा व्यवसाय सुरू केला. आज प्रत्येक शेतकऱ्याच्या गोठ्यात चारपासून पंधरापर्यंत जर्सी गायी आहेत. पूर्वी गावात अवघं १५० लिटर दूध उत्पादन होत असे. आता ते ३५०० लिटरपर्यंत पोहचलं आहे. गावात सहकारी डेअरी सुरू झाली आहे. शेतकऱ्यांना दुधाचे पैसे रोख मिळत आहेत.

पाणलोटक्षेत्र विकास आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनातून उद्ध्वस्त झालेल्या हिवरेबाजारचा पाच वर्षांत कायापालट झाला. प्रत्येक घरात जाऊन आर्थिक परिस्थितीत कसा बदल झाला याची माहिती घेतली. तरुण मुलांच्या प्रेरणेने प्रत्येक पालक दारूच्या व्यसनातून मुक्त झाला. दारूचा धंदा करण्याऐवजी लोक आता दुधाचा व्यवसाय करतात. दारू गावातून हद्दपार झाल्याने गावात सुखशांती नांदायला लागली. पोटासाठी

व गावातल्या दारुड्यांच्या दहशतीपोटी स्थलांतर केलेले लोक पुन्हा गावाकडे परतले. शेती व्यवसाय व दूध व्यवसाय करायला लागले. दारूच्या व्यसनात बुडालेले लोक आता प्रगतिशील शेतकरी बनले आहेत. प्रत्येकाचं पूर्वीचं उत्पन्न वर्षाला ६ ते ७ हजार रुपये होतं, ते आता एक लाखापासून पाच लाखांपर्यंत पोहचलं आहे. १९९२ साली ११८ लोक दारिद्र्य रेषेखाली होते. २००३ च्या सर्व्हेक्षणात त्यांची संख्या ११ पर्यंत खाली आल्याचे आढळून आले. पूर्वी गावात साधी सायकल नव्हती. आता गावात १०० मोटार सायकली आल्या आहेत. घरोघर टी.व्ही. आहेत. काहीजणांनी ट्रॅक्टर व टेम्पो घेतले आहेत. २५ तरुण सेनादलात भरती झाले आहेत. पाणलोटक्षेत्र कार्यक्रम हा दारिद्र्य निर्मूलनाचा कार्यक्रम आहे या जाणिवेतून आदर्शगाव योजनेद्वारे हिवरेबाजारला तो राबविण्यात आला. त्यात सर्व ग्रामस्थांचा सहभाग लाभला. आपल्या कल्याणाचे काम समजून लोकांनी रोजगाराची अपेक्षा न करता श्रमदान केलं. म्हणून सदर कार्यक्रम यशस्वी झाला. बँकॉकला झालेल्या सार्क परिषदेत फिल्म को-ऑर्डिनेटर सुविद्या चतुर्वेदी यांनी हिवरेबाजारची फिल्म दाखवली. ती पाहून सर्वांनी गावाची प्रशंसा केली. संस्था, ग्रामपंचायत, शासकीय कर्मचारी व ग्रामस्थ एकत्र आले की चांगलं काम उभं राहतं. हिवरेबाजार त्याचं उत्तम उदाहरण आहे. जमीन, पाणी आणि माणूस यांचा समन्वय साधून हिवरेबाजारने शाश्वत विकास केला.

पाणी, पिके आणि लोकसंख्या यांचं नियोजन सरपंच पोपटरावांनी केलं. लोकसंख्या वाढीवर पूर्ण नियंत्रण मिळवलं. बोअरवेल बंदी, जास्त पाणी लागणारी ऊस व केळी यांची लागवड करावयाची नाही, गावची जमीन शहरी धनिकांना विकायची नाही, (पूर्वी हिवरेबाजारात जमिनीचा भाव ५ हजार रुपये एकर होता. पाणी वाढल्याने तो एक लाख एकरावर पोहचला आहे.) हे ग्रामसभेत झालेले ठराव प्रत्येक शेतकरी पाळतो.

गावात महिला, दलित, ग्रामीण कारागीर यांच्यासाठी विविध योजना राबविण्यात आल्या आहेत. ग्राम-आरोग्याच्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. घरोघर बायोगॅस व शौचालये आहेत. सातवीपर्यंत शाळेची इमारत, क्रीडांगण, अतिथिगृह, सांस्कृतिक केंद्र, स्मृतिउद्यान, हनुमान व मुंबादेवी मंदिरांचा जीर्णोद्धार इत्यादी कामे श्रमदान करून ग्रामस्थांनी उभारली आहेत. आज गावात प्रत्येकाच्या हाताला काम आहे. कुणी उपाशी झोपत नाहीत. झोपडी आणि माळवदी घरं पाडून लोकांनी सिमेंट कॉंक्रिटची सुंदर घरं उभारली आहेत. गावात पोपटरावांच्या मार्गदर्शनाखाली सामुदायिक नेतृत्व उभं राहिलं. त्यातून गावात दूधसंस्था, सोसायटी, पाणलोट संस्था उभ्या राहिल्या. या संस्थांच्या माध्यमातून अनेक पोपटराव गावात उभे राहत आहेत. आपलं गाव सुधारण्याबरोबरच अवर्षण प्रवणक्षेत्र विकास कार्यक्रमाद्वारे पोपटराव इतर १०-१२ खेड्यांचा उद्धार करण्याचे कार्य करीत आहेत.



महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, आंध्र प्रदेश, कर्नाटक, हरयाणा, ओरिसा, बिहार इत्यादी राज्यांतील शेकडो खेड्यांतील लोकांनी आणि स्वयंसेवी संस्थांनी हिवरेबाजारला भेटी दिल्या. पाणलोट विकासाची त्यांना प्रेरणा मिळाली. तसेच वरील राज्यांचे मंत्री, खासदार, आमदार व वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांनी हिवरेबाजारचा कायाकल्प पाहिला. अमेरिका, जर्मनी, इंग्लंड, वेस्ट इंडिज, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, ओमान या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी हिवरेबाजारचा कायाकल्प पाहून ग्रामस्थांचा गौरव केला. भूतपूर्व राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर यांचे हस्ते हिवरेबाजारमधील पाणलोट आणि ग्रामविकास प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन झाले. त्यावेळी देशातील आदर्शातले आदर्श गाव म्हणून हिवरेबाजारचा आपल्या भाषणात त्यांनी गौरव केला.

मार्च २००३ साली जपानला जागतिक पाणी परिषद झाली. या परिषदेस जगातील १०० देशांचे पंचवीस हजार प्रतिनिधी उपस्थित होते. त्यात हिवरेबाजारचे सरपंच पोपटराव पवार होते. या परिषदेतही हिवरे बाजारमधील कामाचा गौरव झाला. हिवरेबाजारमधील कामामध्ये लोक सहभागाबरोबर महाराष्ट्र शासन आदर्शगाव समिती व सर्व शासकीय खात्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

महात्मा गांधींची स्वावलंबी व स्वयंपूर्ण गावाची संकल्पना हिवरेबाजारने अवघ्या पाच वर्षांत साकार केली. त्याबद्दल अहमदनगर जिल्हा परिषदेचा ग्राम अभियान पुरस्कार, जिल्हास्तरीय उत्कृष्ट बोर लागवड पुरस्कार, लोकमत पुरस्कार, महाराष्ट्रातलं सर्वोत्कृष्ट आदर्शगाव पुरस्कार, भारत सरकारचा राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कार, राज्य शासनाचा वनश्री पुरस्कार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता पुरस्कार, वसंतराव नाईक जलसंधारण पुरस्कार, वनश्री पुरस्कार, आर.आर. आबा प्रतिष्ठान पुरस्कार इत्यादी अनेक पुरस्कार हिवरेबाजारला लाभले आहेत. शेती, पाणी, आरोग्य, पर्यावरण, सेंद्रिय शेती, अन्नधान्य इत्यादी प्रश्न सोडवून हिवरेबाजार आता २१ व्या शतकाला समर्थपणे सामोरं जात आहे. ❑

# 'डॉ. मोहन देशपांडे' आरोग्यविषयक जाणिवांचा आलेख उंचावणारा कलावंत!

प्रमोद मुजुमदार

सत्तरीच्या अस्वस्थ दशकाने महाराष्ट्राला अनेक संवेदनाशील, बंडखोर कार्यकर्ते दिले. अस्वस्थ दशकातील कार्यकर्त्यांच्या या मोठ्या फळीने प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान दिले. समाजकारणाला, राजकारणाला नवी परिमाणे दिली. नवे संदर्भ दिले. तोवरच्या प्रस्थापित मूल्यांना आणि व्यवहारांना आव्हान दिले. मागोवा, युक्रांद, लिटल मॅगेझीन मुव्हमेंट, दलित पँथरची चळवळ, स्त्री-मुक्ती चळवळ आणि नंतरच्या काळात छात्र युवा संघर्षवाहिनी असे अनेक वैचारिक प्रवाह याच काळात महाराष्ट्रात उभे राहिले, विकसित झाले. डाव्या आणि पुरोगामी चळवळीच्या त्यापुढील वाटचालीवर या प्रवाहांचा आणि कार्यकर्त्यांच्या सहभागाचा दीर्घ आणि सखोल परिणाम पाहायला मिळतो.

दलित मुक्ती चळवळ आणि लिटल मॅगेझीन मुव्हमेंट या चळवळींनी प्रस्थापित साहित्य मूल्यांना हादरे दिले. जात्यांतक लढ्यात नवे प्रश्न उभे केले. तर याच काळात उभ्या राहिलेल्या स्त्री-मुक्ती चळवळीने डाव्या-पुरोगामी चळवळीतील वैचारिक भूमिकांना मूलभूत आव्हान दिले. 'मागोवा' या डाव्या विचारसरणीच्या गटाने कम्युनिस्ट पक्ष आणि विचारसरणीला मूलभूत प्रश्न विचारले.

या सर्व प्रवाहांचे वैशिष्ट्य असे होते की त्यांतून प्रेरणा घेतलेले अनेक कार्यकर्ते दीर्घकाळ समाजकारण आणि राजकारणात टिकून राहिले आहेत. त्यांनी चळवळींना नवी दिशा दिली, नवे विषय दिले, नवा आशय दिला. समाजकारण आणि राजकारणात आपापल्या पातळीवर आपापल्या क्षेत्रांत असा आशयघन सहभाग देणाऱ्या शिलेदारांपैकीच एक डॉ. मोहन देशपांडे!

डॉ. मोहन देशपांडे मूळचे सोलापूरचे. मध्यमवर्गीय पार्श्वभूमीचे. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर वैद्यकीय शिक्षणासाठी ते पुण्यात आले. बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असतानाच त्यांचा 'मागोवा' या मार्क्सवादी विचारसरणीच्या गटाशी संबंध आला. तत्कालीन कम्युनिस्ट पक्षांच्या भूमिकांना आव्हान देताना या गटाने 'प्रसंगी मार्क्सलाही मायक्रोस्कोपखाली तपासणार' अशी बंडखोरीची भूमिका घेतली. पण केवळ बंडखोरीची भूमिका घेऊन 'मागोवा'तील कार्यकर्ते थांबले नव्हते. तर धुळे शहरातील आदिवासी भागात, मुंबई-पुण्याच्या औद्योगिक कामगार चळवळींत या कार्यकर्त्यांचा कृतिशील सहभाग होता. कला आणि साहित्याच्या क्षेत्रात नवा दृष्टिकोन, नवा विचार या गटाने पुढे आणला. आधी 'मागोवा' आणि नंतर 'तात्पर्य' ही दोन मासिके 'मागोवा'तील कार्यकर्त्यांनी चालवली. ही दोन मासिके त्या काळात सर्वांगीण डावा विचार मांडणारी मासिके म्हणून मानली जात होती. या सर्व घुसळणीत डॉ. देशपांडे सक्रिय सहभागी होते.

डॉ. मोहन देशपांडे स्वत: एक उत्तम गायक, संगीतकार, चित्रकार आणि साहित्य समीक्षक आहेत. आपल्या वैद्यकीय शिक्षणाच्या काळात त्यांच्या चित्रांना पुण्यातील चित्र प्रदर्शनांत पारितोषिके मिळालेली आहेत.


डॉ. देशपांडे १९७५-८० ही पाच वर्षे, वैद्यकीय पदवी संपादन केल्यावर मुंबईतील के.ई.एम. रुग्णालय आणि एम.जी.एम. रुग्णालयात निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करत होते.



याच काळात राजकारण, साहित्य आणि कला या विषयातील अभ्यासमंडळांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. शहरातील आदिवासींची चळवळ आणि कामगार चळवळीशी त्यांचा जैव संबंध होता. या काळातील त्यांचे 'अंधाराचे प्रदेश', 'सातसक्कं त्रेचाळीस - एक जंतूवाद', 'कलेची पहाट', 'जैत रे जैत (कादंबरी आणि चित्रपट) - कृतक कलाभाव' आदी साहित्य-समीक्षात्मक लिखाण महत्त्वाचे मानले गेले. (सत्यकथा, तात्पर्य)

१९८०-९२ ही बारा वर्षे डॉ. मोहन देशपांडे मुंबईत खाजगी व्यवसाय करत होते. आणीबाणीनंतर जनता पक्षाचा प्रयोग संपून, पुन्हा एकदा काँग्रेस सत्तेवर आली होती. आणीबाणी आणि त्यानंतरच्या उलथापालथीने डाव्या-पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांना अंतर्मुख केले होते. लोकांच्या चळवळीसाठी नवा विचार, नवा आशय शोधण्याचा तो काळ होता.

याच काळात विज्ञान-तंत्रज्ञानावर लोकांचा अधिकार हवा अशी भूमिका मांडत महाराष्ट्रात लोकविज्ञान संघटना (१९८०) उभी राहिली. या संघटनेच्या उभारणीपासूनच डॉ. देशपांड्यांचा त्यात



सहभाग होता. विशेषत: लोकविज्ञान संघटनेच्या आरोग्यविषयक भूमिका आणि कार्यक्रमांत त्यांचा पुढाकार होता. त्यांची 'टॉनिक्स: अर्थ किती, व्यर्थ किती' ही पुस्तिका चांगलीच चर्चेत होती.

याच काळात मेडिको फ्रेण्ड सर्कल ही पुरोगामी, जनवादी आरोग्याचा पुरस्कार करणारी संघटनाही स्थापन झाली. अनावश्यक अशास्त्रीय औषधे, औषध कंपन्यांची फसवेगिरी, वैद्यकीय व्यवसायातील अनैतिक व्यवहारांना विरोध, 'आरोग्य हा लोकांचा मूलभूत हक्क आहे' अशा भूमिकांचा पुरस्कार करणारे डॉक्टर्स आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा एक प्रवाह या काळात देशभर उभा राहिला. डॉ. देशपांडे या सर्व घडामोडींशी जवळून संबंधित होते.

एका पातळीवर जनआरोग्यवादी भूमिका आणि दुसऱ्या पातळीवर, आयुष्यात, अनैतिक व्यवहारांनी बरबटलेल्या वैद्यकीय व्यवसायात एक डॉक्टर म्हणून तत्त्वनिष्ठ भूमिका घेऊन काम करणे, ही कोंडी मोहन देशपांड्यांना अस्वस्थ करत होती.

दुसऱ्या बाजूला, व्यापक आरोग्य चळवळ उभी राहाण्यातील मर्यादाही दिसत होत्या. सर्वसामान्य लोक आरोग्यसाक्षर झाल्याशिवाय व्यापक जनआरोग्याची चळवळ उभी राहणे अवघड आहे, याची जाणीव तीव्र होत गेली. त्यामुळेच लोकविज्ञान संघटनेतील सहभागाबरोबर सामाजिक आरोग्य संशोधनात डॉक्टर सहभागी होत होते. १९८७ पासून डॉक्टरांनी खाजगी व्यवसाय मर्यादित करत आणला. मुंबई-पुण्यात कार्य करणाऱ्या सामाजिक 'आरोग्य संशोधन संस्था' या स्वयंसेवी संस्थेबरोबर डॉक्टरांनी आरोग्य जाणीव-जागृती प्रकल्प हाती घेतले. हे प्रकल्प वैशिष्ट्यपूर्ण होते. यातूनच डॉक्टरांच्या कामाला निश्चित दिशा मिळाली. व्यापक जनआरोग्य चळवळीच्या दिशेने जाण्यासाठी आरोग्यसाक्षरतेच्या मोठ्या कामाचा पसारा उभा राहिला.

## आरोग्य शिक्षण नव्हे - आरोग्य संवाद

आज आरोग्य शिक्षण म्हटल्यावर एक साचेबद्ध कार्यक्रम आखला जातो. मुळात डॉक्टर मंडळींचे समाजातील स्थान हे संपूर्ण समाजाच्या 'वर' असते. कोणत्याही आरोग्य शिक्षणाच्या कार्यक्रमातील सरकारी अधिकारी आणि डॉक्टरांची भूमिका 'ज्ञानदान' करणारा 'दाता' अशी असते. ही मंडळी लोकांवर माहितीचा मारा करतात. माणसांना 'लक्ष्य' ठरवले जाते. एक रोग - एक मोहीम असा खाक्या. क्षय निर्मूलन - डॉटस्, मलेरिया निर्मूलन, एचआयव्ही, एड्स जागृती मोहीम, स्वच्छता मोहीम - अशा मोहिमा तुकड्या - तुकड्यांनी लोकांमध्ये राबवल्या जातात. या मोहिमा राबवणारी मंडळी वेगवेगळी. त्यांच्या पद्धती वेगळ्या. जोडीला काही काळ मोफत औषधे पुरवण्याची मोहीम. पुन्हा परिस्थिती जैसे थे. या पद्धतीमधील महत्त्वाची त्रुटी म्हणजे सर्वांगीण आरोग्याची संकल्पना लोकांमध्ये रुजत नाही. अशा मोहिमा शासकीय पद्धतीच्या, वरून आलेल्या मोहिमा ठरतात. त्यांमध्ये लोकांचा सहभाग, उत्साह मर्यादित राहतो.

या पद्धतीच्या आरोग्य शिक्षणाच्या पलिकडे जाणारा, आरोग्य जाणिवा रुजवणारा कार्यक्रम ही महत्त्वाची गरज आहे.

आपल्या कामाला आरोग्य शिक्षण म्हणणे डॉ. देशपांडे यांना मान्य नाही. ते याला 'आरोग्य संवाद' म्हणतात. 'माणसांचे आरोग्य म्हणजे सकारात्मक, चांगले, निरोगी जीवन. परिपूर्ण आरोग्य या संकल्पनेत चांगले सकस अन्न, उत्तम शिक्षण, स्वच्छ परिसर, पर्यावरण संतुलित अवकाश असे अनेक घटक येतात. प्रत्यक्षात लोकांना पाणीपुरवठा, अन्नपुरवठा, समतोल पर्यावरण उपलब्ध नाही. आर्थिक हलाखी, सामाजिक समतेचा अभाव, शिक्षणाची वानवा, अंधश्रद्धा, बेकारी, महागाई, विस्थापन - स्थलांतर असे अनेक प्रश्न भेडसावत असतात. या सर्व घटकांचा आरोग्याशी साक्षात जवळचा संबंध आहे. त्यामुळे केवळ वैद्यकीय ज्ञान देऊन, माहिती देऊन आरोग्य जाणिवा विकसित होऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत लोकांना पुस्तकी ज्ञान देणे केवळ चुकीचे ठरते.' असे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

पुढे जाऊन ते असं मांडतात की 'आरोग्याचा प्रश्न हा लोकांचा प्रश्न आहे. तेव्हा इतर कोणाहीपेक्षा आपल्या प्रश्नाची माहिती त्यांनाच अधिक असते. जगात कुणीही अडाणी नाही. प्रत्येकाकडे काही अनुभव, जाणिवा, माहिती आणि दृष्टिकोन हा असतोच. आरोग्यदायी जीवन ही प्रत्येकाची मागणी असते. तो प्रत्येकाचा हक्क असतो. त्यामुळे आरोग्य चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी लोकांना केवळ शास्त्रीय माहिती पुरवणे ही भूमिका चुकीची आहे. उलट लोकांशी संवाद साधून त्यांच्या अनुभवातील ज्ञान, शहाणपण आपण शिकून त्याआधारे स्थानिक पातळीवरील आरोग्य समस्या हाताळणे आवश्यक आहे. आवश्यक तिथे वैद्यकीय ज्ञानाचा आधार देऊन लोकांनी सक्षम होणे; असा दृष्टिकोन हवा. तरच आरोग्य चळवळीची प्रक्रिया गतिमान होऊ शकेल'

आपल्या कामात हीच आरोग्य संवादाची प्रक्रिया डॉक्टरांनी अधिक विकसित केली. परिणामकारक बनवली.

## 'आरोग्य संवाद' कार्यशाळा : एक परिणामकारक माध्यम

डॉ. देशपांडे यांच्या कामाचं मुख्य माध्यम हे गावोगाव घेतलेल्या 'आरोग्य संवाद' कार्यशाळा या आहेत. स्वयंसेवी संस्था, गावागावांतील जनसंघटना, महिला बचत गट चालविणाऱ्या संस्था यांच्यामार्फत या 'आरोग्य संवाद' कार्यशाळा चालतात. ४ ते ५ दिवस कालावधीच्या या कार्यशाळा म्हणजे आरोग्य-संवादाचा अक्षरश: आनंद उत्सव असतो. या कार्यशाळांची पूर्वनियोजित रूपरेषा किंवा विषय ठरलेला नसतो. डॉक्टरांच्याच शब्दांत



बिराच्या सुरुवातीलाच या शिबिरात काय काय कार्यकर्त्यांशी, महिलांशी बोलून ठरवलं जातं. कदा या चर्चेतून काही विषय महत्त्वाचे म्हणून पुढे येतात. उदा. आपण आजारी का पडतो, बायांना जास्त प्रमाणात आजारपण का येतं, आपलं घर, गोठा, परिसर, स्वच्छता, पिण्याचं पाणी, आपलं शरीर, अन्न आणि पोषण, लसीकरण, मुलांचं आरोग्य, काही सामान्य रोगराई, त्यावरचे साधे घरगुती उपाय, रोग प्रतिबंध; असे विषय ठरतात. प्रजननाशी संबंधित आरोग्याचा विषय महत्त्वाचा असतो पण तो थोडा नंतर येतो. स्थानिक प्रश्न आणि अनुभव समोर ठेवून विषय मांडणी केली जाते. जमलेल्या महिलांना आपलं म्हणणं मांडायला भरपूर वाव दिला जातो. विषय नीट समजावा म्हणून चित्रं, चित्रकथा, प्रात्यक्षिकं, प्रतिकृती (मॉडेल्स), गाणी या माध्यमांचा मुबलक वापर केला जातो. कधी छोटी नाटुकली केली जातात. आरोग्याची माहिती स्मरणात ठेवण्यासाठी या विविध अभिव्यक्तींची खूप मदत होते. त्यात सहभागी महिला हळूहळू मोकळ्या होऊ लागतात. त्या चित्रं काढू लागतात. गाणी म्हणू लागतात. नाटकात धिटाईनं भूमिका करतात. हशा, टाळ्या मिळवतात. एका वेगळ्या अनुभवात महिला रंगून जातात.'

कार्यशाळेत सहभागी झालेल्या महिला परत गावात जाऊन लगेच कामाला लागतात, असं घडत नाही. पण आपल्या घरात या नव्याने समजलेल्या गोष्टी उपयोगात आणून बघतात. त्यांचा अनुभव घेतात. आपोआप या गोष्टी गावातल्या महिलांच्यात चर्चेत येतात. त्यांच्या मैत्रिणीही त्या गोष्टी उपयोगात आणू लागतात. मग कार्यशाळेत सहभागी महिलेला आपण शिकलेल्या, समजलेल्या नव्या पद्धती गावात उपयोगात आणण्याचा धीर होतो. सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी 'शोषखड्डा' तयार होतो. त्यावर केळीचं झाड लावलं जातं. कुजणाऱ्या कचऱ्यासाठी पिशवी तयार होते. शास्त्रोक्त पद्धतीनं त्याचं खत तयार केलं जातं. काही ठिकाणी 'सोपा संडास' केला जातो. हे सर्व घडत जातं ते थोड्या कालावधीनंतर, पण त्यामागचा कार्यकारण भाव समजणं, उपयोग समजणं आणि यातून व्यापक आरोग्य संकल्पना रुजणं ही प्रक्रिया महत्त्वाची.

'आरोग्य संवादा'ची कल्पना हे डॉ. देशपांडे यांच्या कामाचे वैशिष्ट्य आहे. मुळात डॉक्टर स्वत: एक सौम्य व्यक्तिमत्त्वाचे मितभाषी कलावंत आहेत. शांतपणे दुसऱ्याचं म्हणणं ऐकून घेणं, समजून घेणं, संवाद साधणं हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव.

१९८७ पासून आरोग्य संवादाचे क्षितिज कसं विस्तारत गेलं, हे पाहणं महत्त्वाचं आहे. सुरुवातीला मुंबईतील काही नागरी शाळा आणि आसपासच्या क्षेत्रातील ग्रामीण शाळांतील शिक्षकांसाठी 'शालेय मुलामुलींसाठी आरोग्य शिक्षण' प्रकल्प सुरू करण्यात आला. या प्रकल्पात ३४ शाळांतील ४४ शिक्षक-शिक्षिका सहभागी झाल्या होत्या.

पुढच्या टप्प्यावर शाळेत जाऊ न शकणाऱ्या मुलामुलींसाठी आरोग्य शिक्षणाच्या प्रकल्पामध्ये डॉ. देशपांडे यांचा सहभाग होता. या प्रकल्पामध्ये ३० वाड्या/वस्त्यांमधील ग्रामीण महिला कार्यकर्त्या सहभागी होत्या. या प्रकल्पातील यशस्वी अनुभवानंतर 'आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची आरोग्यविषयक काळजी' असा विषय घेऊन एक वेगळा प्रकल्प सुरू झाला. या प्रकल्पात ठाणे आणि पुणे जिल्ह्यातील ७५ आश्रमशाळांतील शिक्षक-शिक्षिकांचा सहभाग होता.

या प्रत्येक ठिकाणी आरोग्य समस्या, गरजा, स्थानिक परिसर आणि वातावरण हे सगळेच वेगळे होते. त्यामुळे या प्रत्येक प्रकल्पाची रचना, पद्धत, संवाद साधने यात बदल करून कार्यशाळा होत असत. किंबहुना 'आरोग्य कार्यशाळा' पार पाडणे यापेक्षा त्या त्या वातावरणाच्या गरजा, सांस्कृतिक अवकाश समजून घेऊन आरोग्य-संवाद यशस्वी करणे यावर कटाक्षाने भर होता. त्यामुळेच या आरोग्य संवाद कार्यशाळांना मिळणारा प्रतिसाद वाढत गेला.

महाराष्ट्रातील ४० अध्यापक महाविद्यालयांतील विद्यार्थी-शिक्षकांचे आरोग्य-संवाद प्रशिक्षण हा महत्त्वाचा टप्पा होता.

१९९१ सालापासून डॉक्टरांच्या आरोग्य संवाद कार्यशाळांना मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'हेल्थ-पोस्ट वर्कर्स'साठी १९ कार्यशाळा डॉक्टरांनी घेतल्या. या कार्यशाळेचा विषय होता 'आरोग्य संवादासाठी माध्यमांचा/दृक्श्राव्य साधनांचा सुयोग्य वापर' या कार्यशाळा 'अवेहि', मुंबई या स्वयंसेवी संस्थेबरोबर घेण्यात आल्या होत्या.


डॉ. मोहन देशपांडे यांच्या 'आरोग्य संवाद' कार्यशाळा आता अनेक स्वयंसेवी संस्था आणि जनसंघटनांच्या कामांचा भाग बनल्या आहेत. गेल्या पंधरा-वीस वर्षांच्या काळात डॉक्टरांनी सामाजिक आरोग्य संशोधन संस्था



(पुणे/मुंबई), अवेहि (मुंबई), कास्प-प्लॅन (पुणे/पेण), स्त्री-मुक्ती संघटना (मुंबई), नारी समता मंच (पुणे), युनिसेफ (मुंबई), सेतू (पुणे), कर्वे इन्स्टिट्यूट, पुणे अशा अनेक संस्थांबरोबर आरोग्य संवाद कार्यशाळा आणि आरोग्य संवाद प्रशिक्षण कार्यशाळा घेतल्या आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाच्या 'ग्रामीण भागातील पिण्याचे पाणी आणि सार्वजनिक स्वच्छता : नवी योजना' या प्रकल्पावर प्रशिक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. तर सन २००१ पासून बायफ (पुणे) या संस्थेतर्फे चालवल्या जात असणाऱ्या 'स्वयंसिद्धा' या महत्त्वाच्या प्रकल्पावर सल्लागार/प्रशिक्षक म्हणून ते काम पाहतात. हा प्रकल्प महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक अशा सहा राज्यांतील गाव/वस्ती पातळीवर चालवला जातो. या प्रकल्पांतर्गत १७८ कार्यकर्त्यांचे १० ते २० दिवसांचे आरोग्य संवाद प्रशिक्षण शिबीर घेतले जाते.

आजवर अशा ८७० गावे, वस्त्या, वाड्यांवरच्या कार्यकर्त्यांच्या आरोग्य संवाद कार्यशाळा डॉक्टरांच्या पुढाकाराने संपन्न झाल्या आहेत. आरोग्य संवादाच्या माध्यमातून आरोग्य जाणिवा उंचावण्याचा नागरी, ग्रामीण आणि आदिवासी अशा तिन्ही क्षेत्रांत हा एक यशस्वी प्रयोग ठरला आहे. त्यांच्या या प्रयत्नांमध्ये त्यांना सुरुवातीपासून वैशाली वैद्य आणि अलिकडे राजू इनामदार हे मोलाची साथ करीत आहेत.

या मोहिमेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य कोणते असेल तर सर्वांगीण आरोग्याची समग्र कल्पना लोकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामधून अत्यंत जिवंतपणे रुजत जाते. या मोहिमेत सामील झालेल्या कार्यकर्त्यांना एकाच समस्येबद्दल किंवा रोगाविषयी 'माहितीची कॅप्सूल', असे या मोहिमेचे स्वरूप राहत नाही. आरोग्यविषयक व्यापक दृष्टिकोन, विचाराची पद्धत कार्यकर्ते आत्मसात करतात. असे कार्यकर्ते आपापल्या परिसरात या दृष्टिकोनाचा प्रभावी उपयोग करतात. या मोहिमेतून अनेक स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते आता स्वतः आरोग्य संवाद कार्यशाळा घेण्याइतपत तयार झाले आहेत. 'आरोग्य



हक्काविषयीची जागरूकता' वाढत आहे. उद्याच्या व्यापक आरोग्य चळवळीची ही पायाभरणी ठरू शकते.

## आरोग्य संवादाची साधने

गेल्या पंधरा-वीस वर्षांतील कामाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या योजनेत निर्माण झालेली आणि वापरली गेलेली वैशिष्ट्यपूर्ण संवाद साधने!

भाषण, फिल्म्स, स्लाइड शोज अशा माध्यमांची एक मर्यादा म्हणजे यात सहभागी लोकांबरोबरच्या संवादाला फारशी जागा नसते. यात एकतर्फी माहितीचे प्रसारण अधिक असते. आजकाल दूरदर्शन वाहिन्या आणि अन्य प्रसारमाध्यमं अतिशय केंद्रिभूत पद्धतीने नियंत्रित होत आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवरील कला, काव्य, संगीताच्या परंपरेतून तयार झालेल्या अभिव्यक्ती-माध्यमांच्या प्रभावी वापराचा हा प्रयोग अतिशय महत्त्वाचा ठरतो.

त्यामुळे आरोग्य संवाद अधिक अर्थपूर्ण व्हावा यासाठी डॉक्टर आणि त्यांचे सहकारी वेगळ्या साधनांचा उपयोग करतात. आरोग्य संवादात येणाऱ्या विषयांवर गाणी/कथा/चित्रकथा/चित्रं यांचा वापर केला जातो. विशेष म्हणजे आरोग्य संवाद लोकांना इतका भिडतो की लोक या संवाद कार्यशाळेत स्वतःच गाणी रचतात, चित्रं काढतात, नाटुकली बसवतात, चित्रकथा तयार करतात. या संवाद साधनांचा त्यांना नंतरही सहज उपयोग करता येतो. अशी अनेक गाणी, कविता आज डॉक्टरांजवळ जमा आहेत. याच्याच जोडीला गवत, माती, शेण, वाळू, पानं, दगड, विटा यांचा वापर करून विविध प्रतिकृती तयार केल्या जातात. तर आरोग्य संवादात शरीराच्या रचनेची माहिती सांगण्यासाठी सहभागी कार्यकर्त्याच्या शरीराचा आकार रेखांकित करून अंतर्गत रचना स्पष्ट केली जाते. 'मी ऐकले-मी विसरलो, मी केले-मला समजले' हे ब्रीद डॉक्टरांनी आपल्या मोहिमेत कायम राखले आहे. अनेक वेळा नाटकं, गाणी यामधून स्त्रिया आपले अनुभव, अडचणी फार प्रभावीपणे मांडतात असा अनुभव आहे. थोडक्यात आरोग्य संवाद हा एक सृजनशील अनुभव होऊन जातो.

या प्रदीर्घ वाटचालीत डॉक्टरांनी स्वतः एक सृजनशील कलावंत म्हणून घेतलेला सहभाग हा प्रेरणादायक नक्कीच आहे. त्यांनी लिहिलेली पुस्तके, पुस्तिका या चित्रांशिवाय असूच शकत नाहीत. या कलावंत माणसाचा हा प्रवास वेगळाच आहे. पण त्याहीपेक्षा चळवळीच्या मूळ प्रेरणा प्रत्यक्ष कामाच्या माध्यमातून कलात्मकपणे व्यक्त करण्याचा हा प्रयत्न अनेकांगांनी विचार करायला लावणारा आहे.

आरोग्याच्या प्रश्नावर व्यापक चळवळ उभी राहण्यासाठी सामाजिक आरोग्याच्या जाणिवा सघन होणे ही पूर्वअट असेल तर या जाणीवा रुजवण्याचा हा यशस्वी प्रयत्न म्हणायला हवा! □

# विलास भोंगाडे : समाजपरिवर्तनाच्या चळवळीतील समर्पित कार्यकर्ता

**डॉ. रूपा कुळकर्णी-बोधी**



महाराष्ट्र फाउण्डेशनचे पुरस्कार दर वर्षीप्रमाणे जाहीर झाले आणि आम्हा नागपूरवासीयांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला. विलासचे नाव पुरस्कारप्राप्त कार्यकर्त्यांमध्ये पाहून या परिसरातील सर्वच सामाजिक कार्यकर्त्यांना अत्यंत आनंद झाला. असंघटित क्षेत्राशी जुळलेले हे नाव आज आंदोलनाची शक्ती बनले आहे.

फुले-आंबेडकर-लोहिया यांच्या विचारांनी विलास भोंगाडे याची कार्यकर्ता म्हणून घडण झाली आहे. त्यामुळे त्याच्या सामाजिक कार्याचे लक्ष्य हे नेहमी समाजातील तळागाळातील शोषित राहिला आहे. बांधकामाच्या व्यवसायातील स्त्री-पुरुष बांधकामगार, झोपड्यांतून विखुरलेला अगरबत्ती बनविणारा किंवा हॉटेलमध्ये काम करणारा बालकामगार, घराघरांतून काम करणाऱ्या मोलकरणी, धरणाची विस्थापित माणसे व गुरे, मिरची खुडाई करणारा किंवा सोनझरीचे काम करणारा कामगार अशा सर्व असंघटित असणाऱ्या कष्टकऱ्यांच्या सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध विलासचा सतत संघर्ष चालू आहे. काही वेळा सात वर्षांच्या शिवा मुरगनच्या हत्येसारख्या प्रकरणाप्रमाणे त्याने वैयक्तिक अन्याय दूर करण्याकरता संघर्ष केला आहे; तर गोसीखुर्द धरणासारख्या आंदोलनामध्ये लाखापेक्षा अधिक धरणग्रस्तांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी तो गेली दहा वर्षे शासनाशी झगडा करीत आहे. या सर्व संघर्षांमध्ये त्याच्या कामाचा केंद्रबिंदू असघंटित व म्हणून शोषित असा कष्टकरीच राहिला आहे. तो नक्षलवादी असल्याचा शासनाने निर्माण केलेला संशय एक प्रकारे तो करीत असलेल्या संघर्षाच्या तीव्रतेची पावतीच म्हणावी लागेल.




विलास त्याच्या संघर्षप्रधान नेतृत्वाला त्या त्या प्रश्नाच्या अभ्यासाचीही जोड देत असतो. अगरबत्ती वळणाऱ्या कामगारांच्या प्रश्नावरील त्याच्या कामाची सुरुवात त्याने 'मणिबेन कारा इन्स्टिट्यूट'च्या सहकार्याने केलेल्या बालकामगारांच्या अभ्यासानेच झाली. गोसीखुर्द धरण प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नाला हात घालतानाही त्याने प्रथम विस्थापित गावांची पाहणी करून त्याच्या संघर्षाची आखणी केली.

१९९० साली नागपूरजवळील शिवणगाव नावाच्या लहानशा खेडेवजा गावात 'एक मत : समान पत' या विषयावर विलासने एक शिबिर आयोजित केले होते. ही त्याच्या कामाची सुरुवात होती. त्यानंतर नागपुरात तो निरनिराळे प्रश्न घेऊन भेटू लागला. पंचविशीतला हा युवा कार्यकर्ता समस्यांना भिडू लागला. त्यानंतर आजपर्यंत आम्ही अक्षरश: शेकडो कार्यक्रम गेल्या १५ वर्षांत एकत्रितपणे घेतले. बालिका वर्षापासून म्हणजे १९९१ पासून सातत्याने बालमजुरांच्या प्रश्नांवर विलास लढतो आहे. मला आठवते, त्या वर्षी आम्ही नागपुरात शिक्षण वंचित बालिकांचा सर्व्हे, बालिकांची रॅली, 'फिर्याद' ही बालकामगार मुलींवरील व्हीडीओ फिल्म व त्यातून ओसरीवरील खुल्या शाळांची निर्मिती इ. उपक्रम यशस्वीपणे पार पाडले. त्यातूनच १९९२ साली 'इन्स्टिट्यूट ऑफ विमेन ॲण्ड चाईल्ड डेव्हलपमेंट' या ट्रस्टची स्थापना केली. विलास त्याचा सचिव आहे.

१९९४ साली अंगमेहनती कष्टकरी महिला परिषद विलासने स्वबळावर आयोजित केली. त्यानंतर माझ्या मोलकरीण संघटनेच्या कार्यातही विलास रस घेऊ लागला. १९८० पासून सुरू असलेल्या या संघटनेच्या कार्यात विलासच्या येण्यामुळे नवा जोम आला. अनेक कार्यकर्ते जुळू लागले. त्याची परिणती १९९५ साली कामगार भवनातील विशाल घरकामगार महिला परिषदेत झाली. त्यानंतर दिल्लीवर हल्ला बोल मोर्चा गाजला. त्याच सुमारास म्हणजे १९९४ साली धरणग्रस्त विस्थापितांच्या प्रश्नावर विलासने काम सुरू केले व गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीची निर्मिती केली. गेली दहा वर्षे चालू असलेल्या त्याच्या या आंदोलनामधील त्याने काढलेल्या हजारो गाई-म्हशी-बकऱ्या यांच्या मोर्च्याने प्रकल्पग्रस्तांच्या एका वेगळ्या, पण महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला. त्यांच्या जमीन-घर यांबाबतच्या वंचितपणावर नेहमीच चर्चा होते. परंतु प्रकल्पग्रस्तांमध्ये मुकी जनावरेही प्रकल्पग्रस्त आहेत. प्रकल्पग्रस्तांच्या तशा मालमत्तेपासून प्रकल्पामुळे ते वंचित होतात, या वस्तुस्थितीकडे विलासने प्रथम लक्ष्य वेधले.









१९९४ची नवेगाव बांधची दारूबंदी परिषद, १९९८ची जीवनापूरची धरणग्रस्त परिषद–ज्यात मेधा पाटकर आल्या होत्या. १९९९चा पायरीचा विशाल मोर्चा, त्याच वर्षी वैनगंगेच्या पात्रातील मशाल मोर्चा, २००१ मधील मेंढा गावापासून जनावरांचा मोर्चा आणि आता गेल्या महिन्यात काढलेला वैनगंगेचा डोंगा-मोर्चा अशा अनेक कल्पक घटनांनी विलासच्या नेतृत्वातील गोसीखुर्दचे धरगणग्रस्तांचे आंदोलन गाजते आहे. विधानसभेला दर वर्षी त्याची दखल घ्यावी लागते आहे व प्रश्न पुढे सरकतो आहे.

गेल्या वर्षी नागपुरातील कस्तूरचंद पार्कवर महात्मा फुले स्मृतिदिनाला आम्ही १ लाख लोकांची अंगमेहनती कष्टकरी परिषद आयोजित केली व तीत विलासचा फार मोठा वाटा होता.

'ठिय्या' नावाचे वर्तमानपत्र चालवून विलासने असंघटित मजुरांच्या प्रश्नांना वाचा फोडली. १९९५ साली आम्ही मोर्चाने थेट विधानसभेत घुसलो तेव्हा नागपुरात खूपच खळबळ माजली. तेव्हापासूनच नागपूर अधिवेशनातला बंदोबस्त वाढविण्यात आला.



फक्त स्थानिक पातळीवर नव्हे तर देशपातळीवरील; राष्ट्रीय ग्रामीण मजदूर अभियान, महाराष्ट्र बांधकाम व लाकूड कामगार संघटना, राष्ट्रीय जनआंदोलनाचा समन्वय, हिंद मजदूर सभा यांच्याशी विलासचा जवळचा संबंध असून त्याचे देशभर दौरे सुरू असतात.

डॉ. भालचंद्र मुणगेकर, मेधा पाटकर, अरुणा राय, डॉ. भा. ल. भोळे, डॉ. बाबा आढाव, भाई वैद्य, स्वामी अग्निवेश, स्व. किशन पटनायक, निळू फुले, महंमद खडस इ. महत्त्वाच्या देशपातळीवरील नेत्यांसोबत व विचारवंतांसोबत विलासने अनेक आंदोलनांमध्ये भाग घेऊन विदर्भाचे नाव मोठे केले आहे. विलास व त्याची पत्नी सुजाता यांना मिळून 'जीवनविकास प्रतिष्ठान'ची स्थापना १० वर्षापूर्वी केली. याखेरीज 'रुईकर इन्स्टिट्यूट ऑफ लेबर स्टडीज' या संस्थेचा सहसचिव म्हणूनही विलास काम बघतो.

स्व. अरुण लिमये कार्यकर्ता पुरस्कार, अविनाश बी. जे. स्मृती पुरस्कार, जिजामाता सावित्री पुरस्कार, दत्ता देशमुख पुरस्कार, सा. कृ. नि.चा कार्यकर्ता पुरस्कार आणि आताचा हा महाराष्ट्र फाउण्डेशन पुरस्कार अशा अनेक प्रतिष्ठाप्राप्त पुरस्कारांचा विलास मानकरी ठरला आहे.

कार्यकर्त्यांमध्ये अत्यावश्यक असलेला सच्चेपणा, नि:स्वार्थ समर्पण, सातत्य, कल्पकता आणि कळकळ यामुळे विलासने सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये स्वत:चे असे एक स्थान निर्माण केले आहे. महाराष्ट्र फाउण्डेशनसारख्या मान्यताप्राप्त पुरस्कारामुळे त्याच्या उपक्रमशीलतेला प्रोत्साहन मिळाले आहे. त्याची कृतिशीलता उत्तरोत्तर द्विगुणित होवो आणि त्याला हे काम पुढे नेण्यासाठी उत्तम आरोग्य लाभो हीच आम्हां सर्व विदर्भवासीयांची हार्दिक इच्छा आहे. ❐

# लांजा, राजापूर, संगमेश्वर तालुका उत्कर्ष मंडळ

**मधू पवार** (सरचिटणीस)
९/५, आर्य नगर, ताडदेव, मुंबई - ४०० ०३४.
दूरध्वनी : २६९४ ४०३२

'देणाऱ्याचे हात हजार...' असे म्हटले जाते. मुंबई महापालिकेच्या नायर हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या मधू पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी अक्षरश: हे खरे करून दाखविले आहे.

मधू पवार, प्रदीप साळुंखे, गणपत देवरुखकर, राजेश इंगळे, विजय चव्हाण, विजया शिंदे हे सारे मध्यमवर्गीय. नोकऱ्या करून जगणारे. कुठलीही राजकीय महत्त्वाकांक्षा वा अन्य हेतू नसलेल्या या मंडळींनी एका निश्चित उद्देशाने राजापूर, संगमेश्वर आणि लांजा तालुक्यांतील तब्बल दहा ते बारा हजार विद्यार्थ्यांपर्यंत आपल्या मदतीचा हात पोहोचविला आहे.

१९९१ साली लांजा, राजापूर, संगमेश्वर तालुका उत्कर्ष मंडळ स्थापन करून गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी या मंडळींनी सुरुवात केली. आतापर्यंत त्यांनी ४५० हून अधिक शाळांतील विद्यार्थ्यांना मदत दिली आहे. या मंडळाची कार्यपद्धती अत्यंत सोपी आणि पारदर्शक स्वरूपाची आहे. या मंडळाच्या कार्यकारी समितीवर असलेले १९ जण दरवर्षी प्रत्येकी एक एक हजार रुपये काढतात. त्यातून मदत गोळा करण्याचा आणि त्याचे प्रत्यक्ष वाटप करण्याचा खर्च भागविण्यात येतो. काही ठरावीक वर्गातील लोकांकडे जाऊन मदत गोळा करण्यात येते. सरकारी मदत, एकरकमी मदत, धनदांडग्यांकडची मदत कटाक्षाने टाळली जाते.



या योजनेचा लाभ मिळण्यासाठी किमान पात्रता विद्यार्थ्यांची ९५ टक्के उपस्थिती व सातत्याने उत्तीर्ण होणे ही आहे. या मदत वाटपाच्या कार्यक्रमास लाभार्थीच्या पालकांना व शाळेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर गावकऱ्यांनाही बोलावण्यात येते. त्या वेळी हे मंडळ शाळा आणि गावकऱ्यांवर अशी जबाबदारी टाकते की मदत मिळालेला विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास संपूर्ण गावालाच मदतीतून वगळण्यात येईल. त्यामुळे त्या मुलाच्या विकासात सगळेच गुंतले जातात. त्यांनी पहिली काही वर्षे स्वत:च्या खर्चाने हा कार्यक्रम सुरू ठेवला. त्यांनी प्रसंगी कर्ज काढूनही, हे काम केवळ अपुऱ्या मदतीमुळे बंद पडता कामा नये, यासाठी चालू ठेवले.

आपल्या कार्याचा हळूहळू विस्तार करताना त्यांनी १९९४ पासून विद्यार्थी दत्तक योजना सुरू केली. आता पाचवीत असलेले विद्यार्थी दत्तक घेतले जातात आणि त्यांना पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. त्यांच्या गरजेनुसार दरमहा किमान १०० ते ३५० रुपये दिले जातात.

'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर प्रत्येक तालुक्याच्या मध्यभागी चालणारे संगणक प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा मंडळाचा यापुढील उपक्रम आहे.

❐

# समाजकार्याकरिता सत्कार २००४

## 'धुळे जिल्हा टँकरमुक्त झाला.'

**दिलीप बंड** (जिल्हाधिकारी)
**विलास ठाकूर** (मुख्य कार्यकारी अधिकारी)

मुंबईच्या भाभा अणुसंशोधन केंद्राच्या अभ्यासानुसार धुळे जिल्ह्याचा प्रदेश वाळवंटी प्रदेश बनण्याची शक्यता दर्शवीत होता. या जिल्ह्यात जानेवारीपासून पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत असे. जिल्ह्यातील १०९ गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत होता. त्यावर २००१ साली २ कोटी रुपयांच्या वर खर्च झाला.

वरील दोन अधिकाऱ्यांनी आपल्या सर्व कार्यालयांतील छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा मोठा साठा करून ते पाणी विहिरीत सोडण्यास २००२ साली सुरुवात केली. २८ फेब्रुवारी २००२ पासून महात्मा फुले जलभूमी अभियान सुरू झाले. हे अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हा पातळी, तालुका पातळी ते गाव पातळीपर्यंत पदाधिकारी, अधिकारी व ग्रामस्थांच्या बैठका घेतल्या. जिल्ह्यातील शहरे व गावे यांमध्येही पाण्याचा साठा करण्याची चळवळ पसरली. एक शाळा - एक वनराई बंधारा अशी चळवळ सुरू झाली. या कामामुळे २००२-२००३ या पहिल्याच वर्षी भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली. पिण्याच्या पाण्याची सोय झाली. १०९ गावांपैकी अनेक गावांचा टँकर बंद झाला. २००१ साली टँकरसाठी २ कोटी रुपयांच्यावर खर्च झाला होता, तो २००२ साली ७० लाख रुपयांपर्यंत खाली आला. या चळवळीमध्ये गावकरी, विद्यार्थी, महिला यांनी श्रमदान केले. या श्रमदानाचे मूल्य अंदाजे ९ कोटी रुपये आहे.

वनराई बंधारे, विहिरी पुनर्भरण, त्यांची खोली वाढविणे; जलसंधारणाच्या योजना वगैरे योजनांतून २००४ साली जिल्हा पूर्णपणे टँकरमुक्त झाला.

या टँकरमुक्तीच्या कामाला वरील दोन शासकीय अधिकाऱ्यांनी चळवळीचे स्वरूप देऊन लोकसहभाग वाढविल्यामुळे हे यश मिळू शकले. विशेष हे की चळवळीमध्ये केवळ नागरिकच सामील होते, असे नव्हे तर सर्व कार्यालयीन अधिकारी व इतर कर्मचारीही त्यात सामील झाल्यामुळेच धुळे जिल्ह्याला हे यश मिळू शकले.

❐

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार

## १९९६

समाजप्रबोधन (संस्था) : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा

समाजप्रबोधन (व्यक्ती) : विलास वाघ, पुणे

पर्यावरण-संवर्धन (व्यक्ती) : वासुदेवराव चित्रे, पालघर

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : विजया चौक, धुळे

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : रा. वि. भुस्कुटे, अंबरनाथ

## १९९७

स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, पुणे

समाजप्रबोधन (संस्था) : लोक विज्ञान संघटना, पुणे

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : शुभदा देशमुख, गडचिरोली

पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) : विजय नारकर, देवरूख

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : लीला पाटील, कोल्हापूर

## १९९८

पर्यावरण-संतुलन / संरक्षण (संस्था) : निसर्ग मित्र मंडळ, औरंगाबाद

समाजप्रबोधन (व्यक्ती) : जयंत गडकरी, मुंबई

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : बापुसाहेब नागाप्पा म्हेत्री, गडहिंग्लज

पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) : हुमायून अब्दुलअली, मुंबई

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : सुरेखा दळवी, पेण

## १९९९

प्रबोधन (संस्था) : समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी

समाजप्रबोधन (व्यक्ती) : मोहन हिराबाई हिरालाल, चंद्रपूर

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : रेहाना बैलिम, अमरावती

पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती): कुसुम कर्णिक, पुणे

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : भरत कावळे, नाशिक

## २०००

स्त्रियांचे प्रश्न (संस्था) : महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक

समाजप्रबोधन (व्यक्ती) : मनोहर कदम, मुंबई

पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) : चिं. धों. आसवले, पुणे

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : संजय संगवई, पुणे

## २००१

पर्यावरण-संतुलन / संरक्षण (संस्था) : ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स, कर्जत

समाजप्रबोधन (व्यक्ती) : मु. ब. शहा, पुणे

स्त्रियांचे प्रश्न (संस्था) : कुमुद पावडे, नागपूर

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : काळुराम दोधडे, पालघर

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : प्रभाकर म्हसकर, अंमळनेर

## २००२

समाजप्रबोधन (संस्था) : डॉ. पी. व्ही. मंडलीक ट्रस्ट, मुंबई

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : भुरीबाई मानसिंग शेमळे, नंदुरबार

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : रज़िया सुलताना, अमरावती

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : दत्ता इस्वलकर, मुंबई

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : डॉ. विवेक मॉंटेरो, मुंबई

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : डॉ. राम पुनियानी, मुंबई

## २००३

समाजप्रबोधन (संस्था) : कोयना जीवन हक्क संरक्षण संघटना, कोरेगाव, सातारा

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : रज़िया पटेल, पुणे

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : शेख वजीर पटेल, अमरावती

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : सुरेश शिपूरकर, कोल्हापूर

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : आनंद पटवर्धन, मुंबई

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : उल्का महाजन, रोहा, रायगड

# निवड / सल्लागार समिती (भारत)



**मृणाल गोरे**
अध्यक्षा
केशव गोरे स्मारक ट्रस्ट
महाराष्ट्र फाउण्डेशन
समाजकार्य पुरस्कार समिती



**प्रा. चंद्रकांत केळकर**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी
चळवळीचे अभ्यासक



**रवी देवगडकर**
निमंत्रक, महाराष्ट्र फाउण्डेशन
समाजकार्य गौरव
पुरस्कार समिती



**अर्जुन डांगळे**
साहित्यिक व
आंबेडकरवादी
चळवळीतील
कार्यकर्ते



**उल्हास राणे**
पर्यावरणतज्ज्ञ,
बॉम्बे नॅचरल हिस्टरी
सोसायटीच्या
कार्यकारी
मंडळाचे सदस्य



**प्रभाकर नारकर**
पत्रकार



**पन्नालाल सुराणा**
पत्रकार आणि समाजवादी
चळवळीतील कार्यकर्ते



**कुमार शिराळकर**
शेतकरी, शेतमजूर, आदिवासी
चळवळीतील कार्यकर्ते



**पुष्पा भावे**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी
चळवळीच्या अभ्यासक,
सामाजिक कृतज्ञता
निधीच्या विश्वस्त



**गजानन खातू**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी
चळवळीचे अभ्यासक व
सामाजिक कार्यकर्ते



**नागेश हटकर**
आदिवासी व
असंघटित
कामगार
चळवळीतील
कार्यकर्ते

# निवड / सल्लागार समिती (अमेरिका)



**सुनील देशमुख**



**सुनीता धुमाळे**
अमेरिकेमध्ये 'दक्षिण आशियाई महिलांचे प्रश्न' हे प्रमुख कार्यक्षेत्र. तेथील मराठी स्त्रियांमध्ये 'आत्मभान' जागविण्याचे कार्य. हॉस्पाईसारख्या संस्थेच्या सल्लागार. २००४ पासूनच्या 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या अध्यक्षा.



**प्रा. डॉ. जयंत लेले**
क्वीन विद्यापीठातील समाजशास्त्राचे अध्यापक, विविध सामाजिक विषयांचे चिंतनशील अभ्यासक व लेखक.



**शोभा चित्रे**
'गोठलेल्या वाटा', 'पानगळीच्या आठवणी' आणि 'गौरी, गौरी कुठे आलीस...?' या पुस्तकांच्या लेखिका. अनेक नियतकालिकांतून सातत्याने ललित-लेखन. अनेक सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यात सहभाग.





**अरुण गांधी**
भारतातील जातिव्यवस्था, अमेरिकेतील वंशवाद आणि दक्षिण आफ्रिकेतील वर्णसंघर्ष यांवर सातत्याने कार्य, 'एम. के. गांधी इन्स्टिट्यूट फॉर नॉन-व्हायलंस' या संस्थेचे संस्थापक



**डॉ. अरुंधती विनोद**
स्त्रीरोगतज्ज्ञ, टेनाफ्लाय, न्यूजर्सी
अनेक सेवाभावी संस्थांशी संबंधित

# महाराष्ट्र फाउण्डेशन

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे.

१९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

रुग्णवाहिका, एड्स चिकित्सा प्रयोगशाळा, ग्राम-दत्तक योजना वगैरेंसारख्या कल्याणकारी स्वरूपाच्या योजनांना 'महाराष्ट्र फाउण्डेशन' साहाय्य करीत असते. अलीकडच्या काळात 'कॉम्प्युटर सेंटर फॉर सोशल चेंज' या योजनेखाली संगणक शिक्षणाचा प्रसार व्हावा, म्हणून महाराष्ट्रातील विविध शिक्षण संस्थांना संगणकांचे संच भेट देण्याची योजना कार्यान्वित केली आहे. तसेच, नाशिक येथील 'रचना ट्रस्ट'च्या मार्गदर्शनाखाली स्त्रियांना फुलांच्या, फळांच्या प्रक्रियेचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळविण्याची क्षमता वाढावी, असे प्रयत्न सुरू केले आहेत. त्याकरिता 'महाराष्ट्र फाउण्डेशन' साहाय्य करते. आदिवासी व मुस्लीम स्त्रियांना उत्पन्नाचे साधन होईल अशा प्रकारचे जे प्रशिक्षण 'महात्मा गांधी लोकसेवा संघा'तर्फे दिले जाते, त्याकरिताही 'महाराष्ट्र फाउण्डेशन' मदत करते.

*Invest in future*
*of those*
*with no future...*
*So they can reinvest*

ही 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ची घोषणा आहे.

लोकशिक्षण, जनसंघटन, जनआंदोलन अशा विविध मार्गांनी प्रश्नांची तड लावू पाहणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल समाजाला वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी व अशा समाजकार्याला प्रोत्साहन मिळावे, या हेतूने श्री. सुनील देशमुख यांच्या पुढाकाराने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'समाजकार्य पुरस्कार योजना' कार्यान्वित करण्याचे ठरविले आहे.



केशव ऊर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यातील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार, तसेच असंघटित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला 'आंतरराष्ट्रीय समाजवाद' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८ साली त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर चळवळीतील त्यांच्या सहकारी व पत्नी मृणाल गोरे आणि केशव गोरे यांचे चळवळीतील सहकारी मित्र यांनी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ची स्थापना केली. ट्रस्टतर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोणातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबविले जातात. ट्रस्टचे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिक शास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ५,५०० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक, अभ्यासू कार्यकर्ते व संशोधन करणारे विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

संशोधनाच्या कार्याला उपकारक व्हावे म्हणून ट्रस्ट एक 'डॉक्युमेंटेशन सेंटर' चालवते. या केंद्रात सुमारे २०० विषयांवरील नियतकालिकांतील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनाच्या अनुषंगाने तसेच, २ फेब्रुवारी या केशव गोरे यांच्या स्मृतिदिनाच्या अनुषंगाने व्याख्याने आयोजित केली जातात. ट्रस्टतर्फे वेळोवेळी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबिरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम ट्रस्टतर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन ट्रस्टतर्फे अभ्यासिका चालविण्यात येते. आज ४०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या

# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

उन्नत नगर, गोरेगाव (प.) येथील दोन प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ट्रस्टने दत्तक घेतल्या असून तीन डोंगरी (गोरेगाव) झोपडपट्टी विभागात कल्याण केंद्राच्या इमारतीमध्ये बालवाड्या, २०० विद्यार्थी-विद्यार्थीनींकरता अभ्यासिका, क्षयरोग निवारण केंद्र, आरोग्य केंद्र, स्वयंरोजगार केंद्र असे उपक्रम ट्रस्ट चालवीत आहे.

वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिके व नियतकालिके यांचे नि:शुल्क वाचनालय, व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण वर्ग, असे अनेक उपक्रम ट्रस्टतर्फे चालविले जातात. स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे counselling करण्याचे 'स्वाधार' या संस्थेचे कार्य ट्रस्टच्या वास्तूतूनच केले जाते. 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने सुरू केलेल्या 'मराठी साहित्य पुरस्कार योजना', 'समाजकार्य पुरस्कार योजना', यांची कार्यवाही ट्रस्टकडून केली जाते. तसेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी कुटुंबीयांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या अनुवाद-अनुदान योजनेची कार्यवाहीही ट्रस्टकडूनच केली जाते. या योजनेखाली तर्कतीर्थांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथाचा 'Development of Indian Culture : Vedas to Gandhi' हा एस. आर. नेने यांनी केलेला इंग्रजी अनुवाद तसेच त्यांच्या 'जडवाद' या पुस्तकाचा अरुंधती खंडकर यांनी केलेला 'Spiritual Materialism' हा इंग्रजी अनुवाद असे दोन अनुवाद प्रकाशित झाले आहेत.

महाराष्ट्र फाउण्डेशनच्या साहाय्याने 'आगरकर विचार व्यासपीठ योजना' गेली पाच वर्षे 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'द्वारा कार्यान्वित झाली आहे. या योजनेखाली 'पुरोगामित्व म्हणजे काय? (श्रुती तांबे), 'गुजरात : सत्य आणि फक्त सत्यच' (संपादक : अंजली मुळे, किरण मोघे, विद्या कुलकर्णी) या पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या. त्याचप्रमाणे या योजनेखाली सामाजिक परिवर्तनाला साहाय्यभूत होणारे परिसंवाद, कार्यशाळा, नियतकालिके वगैरेंसारख्या महाराष्ट्रातील उपक्रमांना आर्थिक साहाय्य दिले जाते.

ट्रस्टच्या १९६० साली बांधलेल्या वास्तूमध्ये व १९९९ साली गोरेगावातील तीन डोंगरी येथील झोपडपट्टीत बांधलेल्या वास्तूमध्ये ट्रस्टचे कार्य चालते.

❖ विश्वस्त मंडळ ❖

श्रीमती मृणाल गोरे
श्री. कृष्णनाथ नेवरेकर
श्री. श्रीनिवास प्रभू
श्री. रवी देवगडकर
श्रीमती कुसुम सामंत
श्री. मधू आडेलकर
श्री. चंद्रकांत केळकर
श्री. प्रमोद निगुडकर

# सुनील देशमुख




सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी.केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम.एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमॉडिटी ट्रेडर म्हणून वॉलस्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज गिरीश, निशा व सुशील या तीन मुलांसह ते व त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा टिळक) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत. व्यवसायात नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा यांविषयी विशेष आस्था आहे. व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यापासून आठवड्यातील काही काळ ते सामाजिक कामासाठी आवर्जून देत असतात.



मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला एक कोटी रुपयांची देणगी देऊन १९९४ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' त्यांनी सुरू केली. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' आयोजित 'महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार योजने'मागेही सुनील देशमुख यांचीच प्रेरणा आहे.

Sunil Deshmukh
36, Northwind Drive
Stamford, Connecticut, U.S.A. 06903
Tel. : 203-322-0548 / Fax : 203-322-1936
email : sunild@aol.com

0698
2.10.2004


मंथन
२००४